
पु.वा.गोंवईकर




म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २४५८

REFBK-0023591

पु. वा. गोवईकर

# बिल्वदल

खंडकाव्य

पहिली आवृत्ती १९८२

कॉपीराइट-मालती पुरुषोत्तम गोवईकर

मुखपृष्ठ— सुभाष अवचट

प्रकाशिका
श्रीमती मालती पुरुषोत्तम गोवईकर
२१ मंगळवार पेठ, सातारा— ४१५००२

मुद्रक
शंकर सारडा
प्राकृती प्रिंटर्स
शनिवार पेठ, सातारा— ४१५००२

मूल्य पंचवीस रुपये

पु. वा. गोवईकर

खंडकाव्य

# बिल्वदल

REFBK-0023591

REFBK-0023591

पु. वा. गोवईकर
यांचे इतर साहित्य

| | |
|---|---|
| दि डॉन ऑफ इन्डिपेन्डन्स | (आवृत्ती संपली) |
| आग्र्याहून सुटका (संशोधनपर प्रबंध) | (आवृत्ती संपली) |
| स्वराज्याची प्रभात (संशोधनपर) | (आवृत्ती २ री) |
| स्वराज्य की प्रभात (हिंदी) | (आवृत्ती संपली) |

अप्रकाशित

स्कार्लेटपिंपर्नेल (अनुवाद)
स्फुट कविता

कै. एन. एम. कामटे

**भारताचे पहिले आय. जी. पी.**

---

मित्राच्या पुस्तकासाठी आपली प्रकृती, आपली प्रतिष्ठा सारे विसरून तुम्ही दारोदार हिंडून देणग्या गोळा केल्यात. आज हा ग्रंथ बघायला आमच्यात तुम्ही नाहीत आणि आमचे वडीलही नाहीत. त्यांच्या तीव्र इच्छेनुसार हा शिवग्रंथ आपल्या स्मृतीस सादर समर्पण.

---

**गोवईकर परिवार**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2758
23409
शाखा (स्थळ प्रत)

# बिल्वदल

## शिवशाहीचा अरुणोदय

प्रतापदुर्गी संध्यारविची सुवर्णकिरणे पडली
का रक्ताची गिरिगर्भातून कारंजी वर उडली ?
का दास्याची चिता पेटूनी उंच भडकल्या ज्वाला
आणि तयांची लाली चढली प्रतापगिरिशिखराला ?
स्वातंत्र्याची लक्ष्मी कोकणतळातुनी वर आली
लाल कुंकवाचा वाटे की भाली मळवट ल्याली
का जरतारी झूल झळकली गिरिगजपृष्ठावर ही
जरिपटका का भगवा झेंडा डोलत फडकत राही ?
संहाराया यवनराक्षसा अपुला बहु विक्राळ
काय उघडला शिवदेवाने डोळा तिसरा लाल ?

शिवरायांचा दिव्य पराक्रम हर्षवि काय सुरांस
आणि वर्षिली शिवशिरि त्यांनी ही सोन्याची रास ?

काय यावनी सत्तेचा हा झाला सायंकाळ ?
आणि हाच का शिवशाहीचा हो अरुणोदयकाळ?
प्रतापगडचा पाहुन वाटे अगम्य रूपाकार
मायेसाठी ब्रह्मचि आले होउन का साकार?
चल वर रसिका भूगोलाच्या आधाराने जाऊ
इतिहासाची दुर्बिण लावुन खरे काय ते पाहू.

वाट चालली भयाण काळचा कडेकपारातून
शेषाची बघ दिसेल टाळू चल तोल सावरून
जपुन टाकता पाऊल, रसिका, सांभाळाया तोल
हसेल बघ ती गौळण तुजला दौडतसे बिनतोल.
स्वर्ग दिसावा गिर्यारोहणि, अवरोहणि पाताळ
गमे गिळाया कंदरि बसला जबडा पसरुन काळ.
कडेकपारी डोंगरखोरी झाडेझुडपे भारी
वेळू–करवंदीच्या जाळ्या जांभुळ बाभुळ बोरी
वन जावळीचे घर हेरांचे शिव–सिंहाची कुहर
शोभे वनराणीचे भयाण भीषण ते माहेर
खेळवि निजमृगबाला जी वनदेवी मृदुहरितांकी
क्रूर लेकरे घनगुंफेच्या पदराने ते झाकी.

निरभ्र नभ तरि गमे वनांतरि दाटे जणु घनमाला
उजाडले का मावळले ते कळले कधी न कुणाला.
उघडुनि बारा डोळे भास्कर जाळी जरि जगताला
तरि कर त्याचे पळती भिउनी या घनवनतिमिराला
सृष्टिनियंता चक्र चालवी जगि या दिनरजनीचे
प्रभुत्व देवा! हरले तुमचे राज्य इथे रजनीचे.
दिसे न येथे शशिमुख म्हणूनी निशिदिनि झुरते रात
वृक्ष–वाटिकामधि ती शोधी अपुला चुकला नाथ.

जित्या जागत्या ज्योति चमकती किति वनपशुनयनांच्या
पाजळल्या दिवट्या रजनीने का शोधा रमणांच्या ?

सोसाट्याचा वारा बेसुर गाणी गाई लाख
किंवा चाले पति–विरहाचा हा रजनीचा शोक ?
काही केल्या नाथ दिसेना धुंडुन वनवन थकली
शोकाग्नीने करपुन काया झाली भेसुर काळी
घाटोघाटी वाट चढोनी थकून जाईल काया
तरी सांगतो, रसिका, अपुले कष्ट न जातील वाया.
लावु कपाळी शिवपदतळिची तेथिल पवित्र माती
तीच आपणा बिनमोलाची मोठी माणिकमोती.
कड्यावरुनिया उड्या घेउनी जलौघही झळझुळती
स्वातंत्र्याची गीते गाउन खिन्न मना रिझविती.

भूमातेच्या उरोभागि हे दुग्धामृत जणु वाही
प्राशन करून उद्धाराया काया तिजला वाही.
पूर्वपराक्रमिच्या त्या कथांस कोण विचारी आता ?
कुणी बोलती थकले खाउन जरि परक्यांच्या लाथा.
अंगि पराक्रम काही नाही हासती इतिहासाही
मढे नव्हे का बरे त्याहुनी जिते न तरि भिववीही ?
ते जाऊ दे; हा बघ आला प्रतापगडचा माथा
वंदुन त्याला तटावरोनी बघ चहुदिशांस आता.
इतिहासांची दुर्बिण बसली ना नयनांवर नीट?
तर मग बघ तू शतत्रयाब्दामागे जाउन थेट.

धर्म बुडाला वेदहि गेले आला उलटा काळ
श्रुतिशास्त्रांचा काळ जणू तो बळावला कळिकाळ
दुष्काळाचा राक्षस जबडा उघडुन खाया पाही
रत्ने शेरभराची देउन कणिकोंडाही नाही.

धर्मद्वेष्टे म्लेंछदैत्य ते पृथ्वीवर अवतरले
पाप माजले सुजन गांजले क्षत्रियतेज निमाले
प्रथमग्रासी काही पश्चिम, नंतर उत्तर गिळिली
पुढे पूर्व, मग त्या दैत्यांनी अजिंक्य दक्षिण जिंकिली.
दैत्यान्तक भगवान कृष्ण तो निजधामाला गेला
बुद्धहि मौन धरी पृथिवीला त्राता नाही उरला.

म्लेंछछळाने अशी धरित्रीदेवी व्याकुळ झाली
तिने विधात्यासमोर जाउन नम्र याचना केली :
"रक्षणकर्ता त्रैलोक्याधिपती अपणा म्हणवीसी
दुःखार्णवि मी बुडता माझी कशी उपेक्षा करिसी ?"
वदे विधाता –"तुजसाठी मी श्रीविष्णूस अळवीले
प्रसन्न होऊन वसुधापति मज भगवान विष्णु बोले:
'पुण्यश्लोक ती शहाजीची राज्ञी शिवनेरी राहे
विजयवर्धिनी साध्वी देवी जिजाउ जागत आहे.
ती तेजोमय राणी मजला उदरी धरील आता
तिचा पुत्र मी होउन सगळी तुझी निवारिन चिंता.

धर्म स्थापिन, यवनोच्छेदन करीन, रक्षिन देवा
यज्ञयागही तारिन, सांभाळिन गोधन, भूदेवा."
वचन घेउनी स्वर्लोकाहून अपुल्या लोकी आली
ती भूदेवी आशा धरुनी स्वस्थानी स्थिर झाली.
पुढे जिजाई देवीलाही दिवसमास तो गेला
तिने विष्णुचा दिव्य अंशही गर्भी धारण केला.
चंद्रमुखीच्या वर्णावे मग कोणी पांडुरतेला
तन्मुखचंद्राने लाजविले शुभ्र शरच्चंद्राला.
अंगि मंदता जडता आली दागीने जड झाले.
किती लागले सात्विक राजस तेजस्वी डोहाळे

बालरूपधारी श्रीविष्णूची मूर्ती तिज दिसली
चार करामधि चार आयुधे निजांकि घेउन बसली
मकरकुंडले कर्णि तळपली मस्तकि मुकुट झळाळी
त्यासन्निध अर्धांगी सुंदर लक्ष्मीही बसलेली.
घेउन करि तरवार लढाया वाटे तिज माराव्या
सुवर्ण-सिंहासनि बसुनि वर चवऱ्या ढाळून घ्याव्या.
मग देवीच्या प्रसूतिची ती मंगल वेला आली
राजसूतिकागृह सजवोनी सर्व सिद्धता झाली.
शोभे जैशी शरत्कालच्या नील नभाची राणी
तशी सूतिकागृहात शोभे ही राजाची राणी.

झुंबरझाडांभवती झुलल्या वर मोत्यांच्या जाळ्या
तशाच त्या विरयात सख्याही तिजभवताली डुलल्या
शुभ्र भित्तिते स्वस्तिकचित्रे नवपल्लव देती भा
मंगल दीपक अंतरि खुलविति कांचन-कलश-सुशोभा
शुभ्र मोहऱ्या विपुल फेकिती दासी दिशांस चारी
उत्तम हातगुणाचे वैद्यही बसले राजद्वारी.
एके रजनी शुभलग्नी पंचग्रह अतिशुभ झाले
जगदुद्धारक पुत्ररत्न तै त्या राज्ञीला झाले.
दशम दिनी त्या गिरिवर शिशुराजाच्या मंगल न्हाण्या
मोक्षप्रद नद पुष्कर सागर नद्याहि जमल्या साऱ्या.

शिवनेरीवर जन्म जाहला पावे शिवाइ देवी
म्हणुन मुलाचे नाव शिवाजी आनंदाने ठेवी.
मारून दर्याखाना भूप शहा शिवनेरी आला
पुत्रमुखा अवलोकुन त्याला अत्यानंदहि झाला.
हर्षनिर्भरे हिरेमाणके उधळि शहाजीराजा
ती वाटेवर वेचुन झाला याचक याचक राजा

शिवजन्मापासुन राजाचे वैभव वृद्धिस गेले
प्रभाव वाढे हत्तीघोडे राजद्वारी झुलले
रत्नामोत्याचे शोभे शिशुशिरी कुंचडे छान
सुंदर भाळी डुलले खुलले सुवर्ण–पिंपळपान

मातीचे गड करून खेळी मग चिमणा सरदार
मारि लढाई फिरवुन हाती लुटुपुटिची तलवार
गंभिर दुंदुभि–नाद करोनी गिरिकंदरही घुमवी
सिंहगर्जना गजचित्कारा करूनही कधि भिववी
चंद्रकलेसम वृद्धि पावता राजपुत्र–वय–विद्या
बालरवीचे तेज लागले अधिकाधिक तळपाया.

एके रजनी भूप शहाजी निद्रानिमग्न झाला
नितान्त अद्भुत स्वप्नामध्य चंद्रशेखर आला.
करी अनुग्रह पन्नगभूषण, नंदीगणही डोले
त्रिपुंड्रधारी, त्रिवस्त्रधारी, त्रिनेत्रमूर्ती बोले :

"दिल्लीपतीचा विनाश तुजला सध्या सुसाध्य नाही
त्याची पुण्याई पूर्वीची अजून सरली नाही
नाद लढाईचा राजा, तू आता सोडुन देई
पुत्र तुझा संहारुन यवना करील सगळे काही.
अकरा वरुषे झाली पुरती आता पुत्र शिवाला
माता पितरे त्याची तुम्ही ओळखिले न तयाला.
पुत्रशिवाजीठायी आहे भगवंताधिष्ठान
अवतरला धर्मरक्षणा भगवान विष्णु तो जाण
भक्तवत्सला ही गिरिकन्या सांभाळिल शिवदेवा
जाईल तिकडे जाऊ द्यावा, आटोप ना करावा."

बोलुन इतके स्वये घातला मौक्तिकहार कुमारा
निघून गेले स्वस्थानाला घेउन निजपरिवारा

आनंदाने शुभ स्वप्न हे निवेदिले सकळांना
पुण्यप्रांती एके शुभदिनि पाठविला शिवराणा
हत्तीघोडे, पायदळाची दिली सवे सेनाही
उच्च ध्वज, धन अपार, बुरुदे, अमात्य, अध्यापकही
सकलकलापारंगत, विद्याशास्त्रविशारद झाला
गुणी शिवाजी सगळे शिकला, गुरुही कृतार्थ झाला
परंतु ऐका, रसिका, इकडे ये रंग राजकाजा
कर्नाटकात राहुन करि तो काय शहाजी राजा.

नाना विक्रमयुक्तियोजना करून विजयी झाला
शूर शहाजीने तो सगळा कर्नाटकही जिणिला
जगदेवाने सत्ता त्याची सुमनासम शिरि धरिली
म्हैसुर–मदुरेच्या राजांनी स्वशिरे विनम्र केली.
सगळे कर्नाटक चाले ते या राजाच्या तंत्री
प्रताप–शल्ये सलू लागली अदिलशहाच्या नेत्री:
म्हणुनी महंमुदाने आज्ञा मुस्तुफखाना केली:
"काही करून शहाजीस त्या कैद करा या वेळी."
लगेच कपटी मुस्तुफ हत्तीघोड्यानिशी निघाला
घालीबजंग सेना घेउन कर्नाटकास आला.

राजाला नजराणे देउन तो दावी सलगीही
देउन उत्थापन अर्धासन हाती हात धरीही
कधी करोनी राजस्तुति, कधि करूनिया परिहास
हितगुजही कधी सांगुन अनुदिनि दावी तयि विश्वास.
एके दिनि अपरात्री बसला शिबिरि मुस्तुफाखान
सरदाराशी मसलत करुनी रचिले कारस्थान.
दुष्ट कपटपटु मुस्तुफ घाली त्याच पहाटी घाला
घालुन घेरा भूप शहाच्या निद्रावश शिबिराला.

विश्वासाची म्हणून घेतली पुत्राचीही आण
उलटुन परि दुष्टाने अंती उल्लंघिले कुराण

राजकारणी चतुर भूप परि कावा कळला नाही.
दुश्चिन्हे शिबिरी झाली तरि सावध झाला नाही
खड्‌ग गदा शर भाले घेऊन आलेही नृपवीर
धारातीर्थी पडले सगळे उरे न कुणि रणधीर.
महाप्रतापी भूप शहाजी रक्ताने रणि न्हाला
देह तयाचा जणु पळसाच्या लाल फुलांनी फुलला.
लढता लढता विन्धुन गेले राजभुजांतर पाही
मूर्च्छा येउन भूमातेला दिधले आलिंगनहि
झडप घालतो भक्ष्यावरती जैसा बहिरिससाणा
तसा धावला बाजी पकडाया पडलेला राणा

गाढ मूर्च्छना येऊन राजा उघडीना निजनयना
तरिही बांधुन त्या सोपविले बलाढ्य अफजलखाना.
बघुन दुर्दशा ही भूपाचे हत्तीघोडे रडले
ढग नभि दाटुन आले भरुनी बालरवीचे डोळे
बांधुन घालुन हत्तीवरून नेला विजापुराला
अदिलशहाच्या आनंदाला पारावार न उरला.
वृत्त ऐकुनी शिवरायांची आग मस्तका गेली
पितृमुक्तिची सूडबुद्धिने अशी प्रतिज्ञा केली.
“आत्मबळाने मीच जिंकुनी जयवल्लीच्या राज्या
तिथे स्थापिले तदभिलाषुका भूपति चंदरराया.

महंमुदाचे राज्य रक्षिले आज्ञावंदन केले
पूज्य पिताजींनी मम त्याचे अहित कोणते केले ?
तरि यवनाधम मुस्तुफ आला घेऊन बाजराजा
करुन अचानक हल्ला पकडी थोर शहाजी राजा.

दात पाडूनी महंमुदाचे मारुन चंदरराय
आता यवनाच्या नागाची करीन गोगलगाय.
यवनसंकटी धावुन घ्यावे जरी सतीचे वाण
संभाळावी दौलत त्याची ठेवुन जीव गहाण.
तरि त्या उपकारांचे डोंगर दूर झुगारून सारे
काळ्या राती गळा कापुनी ठेविल वरति निखारे.

"कपि बालांचे लालनपालन, संगोपन सर्पांचे
करुन तयांनी केले का कधी जगि कल्याण कुणाचे?
भुजंगमाला कंठि घालुनी कैलासी शिव राही
लक्ष्मीपतिही शेषांगावर निद्रा प्रशान्त घेई
म्हणुन धरावी मनुजानेही का सर्पांशी मैत्री
नाचलाच ना कालीयावर गोवर्धन गिरिधारी ?"

बारामावळ मुलुख मारिला पुंडही संहारीले.
जुन्नर अमदानगर घेउनी लष्कर रिपुचे लुटिले
कोंडाणागड, दुर्ग पुरंदर, प्रचंडगड हे जिणिले
एक दोन ना असे जिंकिले एकुण चाळीस किल्ले

मुसेखान मारून लढाई पुरंदराची जिणिली
महानदी रक्ताची टाकित उड्या तटाहुन गेली
मोंगल दरबारी संधाने बांधुन किल्ली पिळली
आणिक कोंडाणागड देउन पितृमुक्तिही केली.
तळकोकण कल्याण भिवंडी मारुन खजिना लुटिला
अदिलशहाचा सहज जिंकिला माहुलिचाही किल्ला
मुरबादाचा डोंगर तटबंदी करुनी मग वसवी
तयास अजरामर झाले ते नाव राजगड ठेवी.
परंतु चंदरराय मारिल्याविना स्वराज्यद्रोही
पाहुन आपुले नीटनेटके स्वराज्य साधत नाही.

स्वराज्यवांछा भागविणारी ती जणू अमृत वल्ली
मारुन चंदररायां दुर्जय जिणिली ती जयवल्ली
विजापुरा या शिवरायांच्या पराक्रमाच्या खबरा
भिडता बसला दरबाराला भूकंपाचा हदरा
घेता डोंगर किल्ले आला विजापुराहुन दाब
जाब मागता अदिलशहाला ऐसा दिला जबाब :
"दुरून दिसते डोंगरकाया मोहक हिरवीगार
प्रजेस लुटिती याच वनांमधि राहुन पाळेगार,
म्हणुन घेतला मुलुख रक्षणा खातरजमा असावी
मांडलिक मी खाविंदांचा शंका मुळी नसावी."

तरीहि बाजी शामराज जावळीस चालुन आला.
पारघाटी परी शिवबांनी खडे चारिले त्याला
पाहुन दुजा न कोणी समर्थ जिंकाया राजाला
युद्धधुरंधर अफजलखाना अल्लीशहा म्हणाला :
"द्विजदेवांचा कट्टा द्वेष्टा कळिकाळा लाजविले
रामराजवंशातिल राजे युद्धामधि तू जिणिले.
प्रचंड दुंदुभि ऐकुन जगती तुझिया पराक्रमाचा
पळे पाठ दावुनि तो राजा श्रीरंगपट्टणाचा.
ज्याच्या राज्याच्या लक्ष्मीला बटीक तू बनवीली
वीरभद्र तो विसरुन गेला छत्रचामरे आपुली.

सिंहल–लंकेचेही राजे वदती विनम्रवाचे
फळ हे केवळ अजिंक्य वीरा तुझिया पराक्रमाचे.
अंगावरुनी जाता तुझिया पराक्रमाचे वारे
दुर्ग जळीचे, दुर्ग स्थळिचे डळमळती बघ सारे.
असा वीर तू दुर्जय असता शहाजिचा तो बेटा
निशिदिनि करितो माझा कैसा हेवादावा मोठा ?

तुझे पराक्रम ऐकुन दिल्लीपतीस निद्रा नाही
आणि शिवाजी इकडे माझा अंमल मानित नाही.
क्रमाक्रमाने विक्रम करुनी आक्रमिलेहि अरण्य
सह्यशैल तो त्याच्या हाती! होई शल्य असह्य.

प्रतापशाली पिता महंमुदशहा सहाय्या गेला
म्हणून दंडापुरिचा राजा प्राणसंकटी तरला.
वीरावरती वीर धाडिले त्याला जिंकायाला,
परि गेला तो कायम गेला परतुन कुणी न आला
खासा खासा वीर धाडिला वर तोडुन भवपाशा
अखेर उरली अफजलखाना तुझ्याच ठायी आशा.
मित्रत्वाचा डौल घालुनी जिवे शिवाजी मार."
म्हणुन बोलली हळूच मागुन बेगम बडी चतूर
आधि अहंभूताने होते खाना पछाडलेले
त्यात मिळाले हे स्तुति-मदिरेचे उन्मादक प्याले.

गर्वभराने डोले, पाही विस्फारुनही डोळे
अल्लीशहाला ठोकुन मुजरा अफजल गर्जुन बोले:
"सेवा करणे या प्रभुची हे एकच ठाउक जीवा
प्राणपिंड हा खाविंदांचा काय तयाची पर्वा ?
हां हां म्हणता शिवसैन्याचा पार उडवुनी धुव्वा
पकडुन आणिन इथे पळपुटा तो दख्खनचा चुव्वा.
जिवंत आणिन अथवा त्याचे शव त्या मारुन ठार
तरिच खरा मी अजिंक्य अफजल नावाचा सरदार.
यास धराया पहा निघालो असाच हा लवलाही
टांग टाकिली घोड्यावर ही उतरणारही नाही

इतुके बोलुन डौलाने तो बघून त्या दरबारा
विडा उचलुनी करुन निघाला अल्लीशहाला मुजरा.

प्रसन्न होऊन नवरत्नांची कट्यारही आनंदे
अल्लीशहाने दिधली अपुल्या अंगावरची बिरुदे.
रत्नखचित खोगिरे घालुनी दिधले अबलख अश्व
हां हां म्हणता घालतील जे पायाखाली विश्व.
उंटावरती घालुनी दिधली मोत्ये रत्ने दिव्य.
तसेच सुंदर साज घालुनी भद्र मतंगज भव्य
अंबर, याकुत, मुसेखान, तो बर्बर, रणदुल्लाही
तसेच जाधव शूर घाटगे काटे घोरपडेही
महापराक्रम करणारे हे शूरवीर असलेली
खानामागे निघे रणा चतुरंग चमू बलशाली.

घोडदळाची पायदळाची बाविस हजार फौज
पाच हजार खलाशीही ते जवान हिंमतबाज.
ऐंशीनव्वद तोफा मोठ्या चारपाचशे छोट्या
शस्त्रे अस्त्रे दारूगोळा यांच्या कितीक पेट्या
वर्षे तीन पुरेलचि इतुका चारा दाणागोटा
घेउन संगे विजापुराहुन खान निघाला मोठा.
वेळि अवेळी इनामपत्रे कोणा देणे ठरलें
तरि ती द्याया स्वारीतहि अधिकार घेतले सगळे

कोरे कागद शिक्कामोर्तब मारुन तयार केले
बादशहाच्या फर्मानांची अशी घेतली डौले.
पुसुनी ज्योतिष्याला प्रयाणमुहूर्त निश्चित केला
दर्शन आशीर्वच निजगुरुचे मस्तकि घ्याया गेला.
त्या अवलियास खानाचे धड मस्तकविरहित दिसले.
"या रणि तुजला नाही यश" हे भविष्य त्याने कथिले.
तरिहि निघाला खान दिलावर, निघता तलवारीने
अपुल्या त्रेसष्टही बिब्यांची शिरे छाटिली त्याने.

प्रयाणसमयि अमंगलसूचक दुश्चिन्हे त्या झाली
घालुनि डावी काकांनी बहु कर्कशवाणी केली.

वारा प्रचंड उलटा सुटला ध्वजही भंगुन गेला
आणि निशाणाचा हत्तीही वेडा होउन मेला.
धुंद जाहल्या दाहि दिशाही दिनमणि धूसर झाला.
आणि विजेचा कडकडाटही पयोधराविण झाला
पूर्वेला किति भयाण भीषण ओरडल्या त्या कोल्ह्या
मोठ्या उल्का आकाशातुन एकाएकी पडल्या.
मजला मारित मार्गी स्वारी तुळजापुरास झुकली
सुरसंहारक दैत्यवृत्तिही तिथे न त्याची चुकली.
घाव घालुनी शिवकुलदेवीचेही तुकडे केले
दुष्टाने जात्यामधि भरडुन पीठ तियेचे केले

हा! हा! ऐका परंतु, रसिका, नीटपणी निजकर्णी
मूर्ति भंगता कडाड उठली कसली अद्भुत वाणी:
"अफजलखाना नीचा कसले घोर कर्म हे करिसी
पचेल आता कैशी तुजला ही पापाची राशी ?
सत्वर एके दिवशी तुझीहि चरचर कापुन मुंडी
संतृप्तवीन मीही देवी चामुंडा रणचंडी."
यवनदैत्य हा देवस्थाने भ्रष्टवि बेदरकार
तळमळला जीव शिवरायांचा ऐकुनि हाहाकार
स्वप्नी आली शिवरायांच्या मूर्तिमंत त्या रात्री
तुळजापुरची भक्तवत्सला जगदंबा वरदात्री.

कनकनुपुरे रत्नकंकणे किति मंजुळ रुणझुणली
शिरी मुगुट सोन्याचा शोभे मंगल कुंकुम भाली
अंगी झळके नीलांबर, कंठी नवरत्नांचीही
शोभे सुवर्ण-सुमनांकित किति काळी कंचुलिकाही

गमे नासिका चंपक–कलिका रत्नजडित नथ त्याली
नव्या पोवळ्याची जणु खुलली अधरावरती लाली
रत्नकर्णिका चमके कानी मंदस्मितहि कपोली.
अशि विश्वाची मंगल माता इंदुमुखी त्या दिसली.
दिव्य रूप पाहुन राजाचे मन भांबावुन गेले
पुन्हा पुन्हा अतिविनम्रतेने तिज अभिवादन केले.

जगज्जननिही बघता राजा थोडा गोंधळलेला
पद्महस्त शिरी धरुनी बोले अभय देउनी त्याला:
‘ विजापुराहुन यवनश्रेष्ठी अफजलखान निघाला
दुष्ट कपट मनि ठेवुन आला तुजला मारायाला.
मानखंडना केली माझीही त्या चांडाळाने
अघघट पुरता भरला आता मरेल निजकर्माने.
भिऊ नको यत्किंचित तू माझ्या बाळा भूपाळा
तुझीच आई तुळजापुरची मी आले लडिवाळा.
कृष्णजन्मिही असेच जेव्हा तुजवर संकट आले
आठवते का तुझ्या सहाय्या नंदाघरि मी आले.

महिषासुरदैत्याने संत्रासविले देवा तेव्हा
धावुन आले ना हाकेला मीच तुझ्या शिवदेवा.
तशीच आले आताही मी सांभाळाया तुजला
आणिक मारिन तुझ्याच हाती आता त्या दुष्टाला.
त्याकरिता मी होईन, राजा, स्वये तुझी तरवार.
ही बघ शिरले नीट तीत मी वेडर कर त्या वार.”
इतुके बोलुन मायभवानी पावे अंतर्धान
स्वप्न संपले तसे नृपाळाला आले अवधान
मातुःश्रीना, सरदारांना, अपुल्या पुरोहितांना
निवेदिले बोलावून राजांनी या सुवर्तमाना.

नांदत होता राजकारणी संत एक त्या काळी
धर्मस्वातंत्र्याची देई रामघळीतुन हाळी.
वागवि अंगी छाटी भगवी खांद्यावरती झोळी
धुंडुन जगभर राजकारणी सूत्रे गुपचुप चाळी
निवृत्तीचा प्रवृत्तीचा शक्तीयुक्तीचाही
महामंत्र तो स्वजना द्याया टाहो फोडुन राही
थोर हिंदवी स्वराज्यकार्या त्यागी यागी हेर
देई धाडुनी शिष्य हजारो देशामधि चौफेर.
स्वराज्यकार्या झटले निशिदिनि होते जरी विदेही
'रामदास गुरु माझे आई' म्हणुनि नमी शिवबाही.

संचरुनी आसेतुहिमाचल गुप्त बातमी घ्यावी
शिष्यांकरवी शिवरायांना चतुरपणे पुरवावी.
ओविबद्ध वृत्तामधि लिहुनी यवनवृत्त ते धाडी
तत्त्वज्ञानद्वारा सल्लामसलत त्यामधि मांडी.
ओव्या लिहिल्या अर्थ जयांचा अद्याक्षरात राहेः
"हुशार! विजापुरचा सरदारहि खान निघाला आहे."
स्वारी निघता विजापुराहुन वृत्तयोजना केली
सद्गुरुनी ती शिष्यांकरवी शिवबांना कळवीली.
धन्य खरोखर शिवरायांच्या नजरबाज खात्याची
शोधुन धाडी विजापुराच्या गुपिते दरबाराची.

"देउन शंभूस काळटोला करून त्याचा खून
विजापुराहुन निघे तुझ्यावर दगेबाज तो खान.
तू लाखाचा पोशिन्दा तू स्वातंत्र्याचे आशास्थान,"
सांगुन धाडि शहाजी– "शिवबा, वागा सांभाळून."
येई शिगणापुरास इकडे पंढरपुरमार्गाने
आणि गाठिली थेट मलवडी तेथुन त्या यवनाने.

थांबा रसिका इथे सांगतो खानाची चतुराई
काय जाहले फलटणास ते जाउन घडिभर पाही
तेथे होते शूर बजाजी शिवरायांचे व्याही
खान तयासी पकडुन आणी ठरवुन राजद्रोही.

खान बोलला–"बादशहाचा मांडलीक तू असता
शिवाजीस का सहाय्य होसी ? लाज न वाटे चित्ता ?"
रागाने फर्मान सोडिले : "करून याची सुंता
गळ्यात याच्या तोफ घालुनी द्या हत्तीच्या लाथा."
केला नव्हता बजाजींनी त्या काहीही अपराध
परंतु नुरला विचार तेथे कोण करील विरोध ?
वार्ता कळली या विघ्नाची दख्खनच्या सिंहाला
चरफडला किती जीव तयाचा ? इलाज काय तयाला ?
नाइकराजे नाम ज्यास त्या मलवडीच्या सरदारा
पत्रे धाडुनि मुक्तियुक्ति योजिली जहागिरदारा.

मलवडिच्या त्या जहागिरीचा खाउन पाहुणचार
झाला होता खानहि त्याचा बहु मिंधा लाचार.
करि रदबदली मलवडिचा तो पराक्रमी सरदार
मुक्त करविली होन देऊनी खाना साठ हजार.
काही तरी ते खुसपट काढुन कैद बजाजिस करता
मुक्तियत्न तो करिल शिवाजी खानहि जाणुन होता.
खानाने हे सगळे नाटक केले धनलोभाने
दंड लादुनी मोहीमेचा खर्च काढिला त्याने.

राजगडी या खबरी येता सर्व म्हणाले, "रावा!
विषमबळाशी झुंज न देता सल्ला भला करावा."
शिवरायांची ढळली नाही धैर्यपराक्रमवृत्ती
डगली नाही विशाळ त्यांची शिळेसारखी छाती.

द्विजदेवांचा निजधर्माचा धेनुरक्षणाचाही
विचार करूनी राजा बोले : "सल्ला करणे नाही.
राहो जावो प्राण रणी मी गनिमी करिन लढाई.
जावळीस ती तारिल मजला तुळजापुरची आई
मिळता जय रणि वरेल अपणा स्वराज्यलक्ष्मी अंती
अथवा मरण रणामधि येता होइल दिगंत कीर्ती.
दुर्दैवाने पडलो रणि तर तजविज एक करावी
संभाजीला मातु:श्रींना राजगडावर ठेवी.

राजे संभाजी यांना हे राज्य सुपूर्त करावे
आणि तयांच्या आज्ञेमाजी सर्वांनीच रहावे
संभाळा या संभाजीला प्रसंग आला बाका
त्याला हाती धरा आणखी स्वराज्य अपुले राखा
काही केल्या पायाखाली यवनांच्या न पडाव्या
म्हणून मम देहाच्या अस्थि प्रयागतीर्थी न्याव्या
आशीषांचा कोट लेकराभवती उभा करावा
मासाहेबा ! येतो आता, निरोप मजला द्यावा."
मातु:श्रींच्या पवित्र पायी भूपति ठेवी डोई
आशीर्वादहि दिला तिने त्या, 'शिवबा, विजयी होई.

माय बोलली: "बाळा, अंबा सांभाळिल तुज, ऊठ.
तूच सांग परि कशि मी सोसू असली ताटातूट ?
स्वारी थकली, ती तरि आता काय करील दुरून ?
गत गोष्टींच्या आठवणींनी येतो ऊर भरून.
मोंगल घोड्याची चहुमुलुखी ऐकू येई टाप
मिळुन मोंगला सुखात राहू"—मला म्हणाला बाप.
"बाप मानिला अभिमानाने मी अपुला दुस्मान
आणि राखिला थोर मराठी जरिपटक्याचा मान.

स्वतंत्र अपुल्या बादशाहिच्या उभवायासि निशाणा
दिला झुगारुन भीमगडाहुन मोंगलचा नजराणा

बाबांच्याही आयुष्याची दोरी मग ती तुटली
माहेराची मायाममता हरपुन करपुन गेली
तशात शिरला मुरारपंतहि अपुल्या जहागिरीत
'दौलतमंगळ' बांधुन वसला घेउन अपुला प्रांत
लूटमार किति झाली शहरोशहरीहि जाळपोळ
जन्मकाळि तव खाया उठला सकळा काळ दुकाळ.
भाकर मागे दारोदारी दानशूरही हात
घाली भाकरिचे म्हणुनी त्या कुणि हाडाचे पीठ !
ऐन भुकेला खाई, बाळा, बाप मुलाचे मांस
देव ठाउक कसे कसे मी जपले तुझ्या जिवास !

त्यातुन दर्याखानावरती गेली होती स्वारी
तरिहि राहिले तुजसाठी एकटीच मी शिवनेरी.
ती आई मी तुझी तुझ्याविण कशी एकली राहू ?
चल दोघेही प्रतापदुर्गा धावत दौडत जाऊ.
जा कान्होजी, घाला घोड्यावर माझ्याही जीन
आणि ढाल तरवार घरातुन येते झणि घेऊन.
बेलरोटिच्या शपथेचीही इथे न गरज शिवाजी
शपथेविण तव जन्मापासुन मीच तुझा तान्हाजी.
रक्षाया तव काया जमले जरि जिवलग सरदार
तरिही वीरमाता म्हणुनी तो माझाही अधिकार.

पाणी पाजिल यवना माझ्या कट्यारिचे पोलाद
तरिच मराठ्याची सांगिन मी खरोखुरी अवलाद
सुत अंजनिचा जाइ कोटि उड्डाणे घेउन गगनी
गतीत मागे मनास टाकुन सागर उल्लंघोनी.

कपिकुलभूषण कथा ऐकुनी बालपणी उसळून
तूहि अंतराळामधि जासी तसाच झेपावून.
नाव रावणाचे घेताक्षणि राग कसा तुज येई
होऊन राम धनुर्धारी तू त्यावर धावुन जाई.
तसाच यवनासुरसंहारासाठी घे उड्डाण
आणिक गिरिवर जाउन दोघे करु रिपुची धुळधाण.

स्वराज्य-संकल्पक ठरले स्थितिगतिने माझे राजे
स्वराज्य संस्थापक तू होउन पुरवि मनोरथ माझे."
पुत्रासंगे प्रताप दुर्गा रणा निघाली आई
हे वर्णाया व्यास-वाल्मिकी का कुणि जन्मला नाही ?
रणाहुनी तिज निवारिता किति तुफान भडकुन येई
काय सांगु मी हृदय आईचे कुणास ठाउक नाही ?
हुशार राजा निजराज्याची करी व्यवस्था बरवी
आणिक उरल्यासुरल्या केल्या सगळ्या निरवानिरवी
प्रतापगड ते राजगडाच्या मार्गी खडी शिबंदी
जागोजागि पहारे चौक्या ठेवुन केली बंदी

कुडेसराच्या उंच पठारी नेमुन नेताजीला
पंचहजारी घोडदळाचे दिधले रणबळ त्याला.
आणि आणिला युद्धधुरंधर झटपट बोलावुन
शूर पेशवा आपुला मोरोपंत कोकणातून.
सोंडा खोंडे खिंडी खोरी कडे डोंगरातील
खडान्खडा ठाउक त्या तज्ज्ञा कोनाकोनांतील
प्रतापगडचा किल्ला मोरोपंतांचे हातून
खडा जाहला लढावयाला तटकवचा चढवून.
लोहदंड करि घेऊन बघ जा तो गिरितट ठोकून
"पंत" "पंत" हे नाद उमटती दगडादगडांतून.

लढतील सगळे शूर शिपाई परि मारुन संगीन
सांभाळिल का पारघाट कुणि मोरोपंतावीण? ”
दुर्गरक्षणा, राज्यरक्षणा, असे शूर अधिकारी
नेमुन राजा प्रतापदुर्गा मारी गरुड भरारी.

मार्ग पुण्याचा टेकुन इकडे वाईप्रांती आला
खान छावणी ठोकुन तेथे तळ देउनिया बसला
दंड दाउनी दाम देउनी भेदनीति तो खेळी
आणि मावळी सैन्याचीही बडी उभारणि केली
भेटिस आला कुणी तिमाजी वाई प्रांती येता
म्हणे देशकुलकरण्याचा मी एक गुमास्ता मोठा.

मालक मेला पत्नी त्याची मरणादारी बसली
वतन गिळावे आपण त्याचे म्हणून लटपट केली.
दिले देशकुलकरण करोनी झटपट त्याच्या नावा
आणि घेतल्या त्याचेपासून नव्या तीनशे नावा
मोठ्या भीमाडोण नद्यांवर खड्या ठेविल्या होड्या
वर्षाकाळी ऐलपैलही अखंड जाया याया
स्थळजळमार्गावरची ऐशी सर्व निवारून विघ्ने
प्रथम जावळी जिंकायाचा चंग बांधिला त्याने
शोध घेतला दूत फेकुनी करुनीहि हेरफेर
बंदोबस्त गडाचा दिसला कडेकोट चौफेर

कळले रायगडाहून राजा प्रतापदुर्गी आला
शिवागमनाने दुर्गम गड तो अधिकच दुर्जय झाला
आणि खान जरि गर्वे बोले दळही तयाचे डोले
तरी त्यास तो त्याच रानचा धीट मावळा बोले:
“आधी आकाशाला घाला गच्च गवसणी कोणी
मग जा शिवरायास धराया उघड्या रणमैदानी.

किंवा वाऱ्याची कोणीही मोट बांधुनी आणा
नंतर खुल्या रणामधि जाऊन पकडा तो शिवराणा
वाटे खाना रणाविना मग राजा हाती यावा
भीती दावुन राजभेटिचा टाकून डाव पहावा.

पत्र देउनी मग कृष्णाजी भास्कर हेजीबाला
धाडी शिवाप्रत त्याच्या मनिचा ठाव पुरा घ्यायाला
कृष्णाजीही आले वरती चढून डोंगरमाथा
राजा बोलवि अपुल्या वकिला पंताजि गोपिनाथा
खानाच्या वकिलास रहाया दिला गडावर वाडा
रात्री गेले राजे भेटीला त्याच्याच बिऱ्हाडा
तो खानाचा लांब लखोटा राजाहाती आला
वाचुन बघता त्या खानाचा हा संदेश मिळाला:
"अजिंक्य अफजलखान असे मी अलिलशहाचा कलिजा
माहित आहे ना तुज राजा प्रताप लौकिक माझा ?

चंद्रराव मोऱ्याचे सगळे राज्य गिळंकृत केले
आप्त अमात्य सुमंत्री त्याचे धुळीस तू मिळविले
त्याच्या विस्तृत राज्याची ही जी मोठी गुरुकिल्ली
गिरितटि वसलेली जयवल्ली तू अन्याये जिणिली
तू कारागृहि घालुन मुलूख काबिज केला ज्याचा
तोहि जळफळे निशिदिनि राजा दंडाराजपुरीचा
पदोपदी नवविक्रम करुनी परराज्ये तू हरिली
औद्धत्याची उच्छृंखळतेची परिसीमा झाली
चक्रवर्ति राजाची चिन्हे अंगी धारण करिसी.
छत्रचामरे सुवर्ण-सिंहासनि बसुनी मिरविसी

काळकंटका! शल्य तुझे हे निशिदिनि टोचे हृदयी
म्हणून धाडिले अल्लीशहाने ससैन्य मज या ठायी

सिंहगडाचा, लोहगडाचा, पुरंदराचा किल्ला
तसाच चाकणचाही, प्रदेश भीमानिरामधला
रण नच करिता शरण येउनी दिल्लीश्वरास द्यावा
आणि जावळीचा हा किल्ला अदिलशहाला द्यावा.
या क्षणि सगळे किल्ले–मुलुख देउन संधी करावा
नातरि रणदेवताच जो देईल तो निकाल घ्यावा."
राजे वदले: "अलबत आता मुलाजमतही घेऊ
खाना–अगळे नाही आम्ही मुलुखही त्यांचा देऊ

तहरहासही तयार आम्ही व्हावी कशी लढाई
निर्मळ मन गंगेसम अमुचे काही कपटही नाही
कृष्णाजी परि आण शंभुची घेउन तुम्ही बोला
ब्राह्मण तुम्ही पाहू द्या मज सत्याचा पडताळा
राहिल जाइल मुलूख त्याला, संधिहि होइल बरवा
खराच सांगा पडदा खोलुन परि खानाचा कावा.
देवधर्म विध्वंसून अमुचा मत्त यावनी सत्ता
निशिदिनि गोवध करूनी घाली विप्रमस्तकी लत्ता
गुलामगिरिच्या गर्तेमाजी आम्हा गाडुन टाकी
खाया कुळीथ नाही दख्खन–दुनिया बुडली शोकी

धर्मस्वातंत्र्यासाठी या हिंदूंच्या रणगाजी
पर्वा नाही रणि मेले तरि असले लाख शिवाजी
देवद्विजगोधर्मरक्षणासाठी झालो राजा
यात असे का तुम्ही सांगा अपराध काहि माझा?"
कृष्णाजीवर दिव्य शिवध्येयाची पडली छाप
खुल्या दिलाने त्यांनी कथिले यवनमनातील पाप
दुसरे दिवशी राजनीतिपटु राजे सदरी बसले
दरबाराचे मुत्सद्दी अधिकारी सगळे जमले

खलबत झाले मसलत ठरली, निरोप देणे झाले
देउन वस्त्रे कृष्णाजींना परत रवाना केले.

कळू नये ते निजरहस्य या कानाचे त्या काना
म्हणुन काहि एकांती वदले राजे पंताजींना:
"आता व्हावे खाली तुम्ही खानाकडे रवाना
आणभाक त्या देउन घेउन जावळीस त्या आणा.
अटी भेटिच्या वेळ दुपारी, गुरु–दिन निश्चित ठरवा
प्रतापपर्वततलस्थलीवरती तो भेटिस यावा.
तुम्हावर या दरबाराचा पुरा भरवसा राही
वकील अमुचे चतूर तुम्ही कराल सगळे काही.
सावध राहुन वागा जाणुन खलयवनाचा कावा
वकिलासंगे जाऊन खाना निरोप माझा द्यावा :

'बाहुबळाने जिणिले आपण कर्नाटकचे राजे
जगात अपुली जिकडे तिकडे प्रतापदुंदुभि गाजे.
मज गरिबाच्या भेटीसाठी स्वारी दुरून आली
भाग्यवंत मी किती दयाळा कृपा जाहली अपुली
समुचित वाटे मजला आपण गड हा चढून यावे
जावळिचे वनवैभव सुंदर येउन इथे पहावे
तेणे मम वैभव वाढुन मज येईल निर्भयताही
भूमिभूषणा! आणिक अपुल्या ठायी कपटहि नाही
स्वर्लोकीची मधुर सुधाही जीस मनी लाजावी
अशि गरिबाची कृष्णथडीची कोंडाभाकर खावी.

मार्ग भीतिचा म्हणून आपण दक्षपणाने यावे
मागितलेला मुलूख घेउन जाणे तिकडे जावे."
राजाज्ञा शिरी धरुनी झडकरी यवनतळा जावोनी
निरोप दिधला नम्रपणाने खाना पंताजींनी.

आणि बोलले: "खाविंदांच्या या बळवान तळाला
भेटिस येता शंका धरितो राजा कच्चदिल झाला."
निरोप ऐकुन हुरळुन गेला खान आपुल्या चित्ती
मनात मसलत भरली राजा भेटित येईल हाती.
"जावळि जागा कुबल असे हा डाव दिसे नच साधा
कपट मनामधि ठेवी राजा काफर हरामजादा"

असाही संशय मनि खानाच्या क्षणभर चमकुन गेला
निरसन केले आण घालुनी पंताजी वकिलाला
चतुर शिवाजी राजाने भेटिचे टाकिले जाळे
खानाचे मन त्यात गुंतले पाहून मंत्री बोले:
"उभे राहिले दैव कराया जिथे आपुली करणी
उगाच तेथे खाविंदांनी नकार द्यावा कोणी ?
गंगेसम मन निर्मळ म्हणतो नाही हेवा दावा
मग भेटिया वनातुनी हा बाहेर का न यावा ?
देवाखेरिज कुठे कधी शिर ज्याचे नमले नाही
नम्रतेत या त्याच्या वाटे दुःसाहस बहु राही

कडेकपारावर वसलेला दुर्गम गड हा पाही
वाट डोंगरी गजाश्वसैन्या जाया सुखकर नाही."
ऐकुनि मंत्र्यांचे वच हे जरि होते बहुमोलाचे
खानाचा क्रोधाग्नि भडकला गर्जून बोले वाचे:
"खणून काढिन वर पाताळा स्वर्गहि पाडिन खाली
कथा काय या प्रतापगडची चिरडिन टाचेखाली
दुर्गमदुर्ग असे हा म्हणून दुर्गावरी न जाणे
माझ्या पराक्रमी सैन्याला मलाहि लाजिरवाणे
त्रिभुवनि दुमदुमते साऱ्या या खानाची रणकीर्ती
तरीही त्याच्या पराक्रमाची पुनरपि पहा प्रचीती.

इतुके बोलुन जावळिवनास सरदाराची स्वारी
निघे पंधरा हजार घेउन गजाश्वसेना भारी
परि चढवेना गजहयसैन्या करिताही मारपीट
वनदेवीही सुमने हसली पाहुन ती तिरपीट !
सोंडा सुळके घाट खडे ते चढून जाता पैल
मोठ्या मोठ्या गजराजांचे झाले गुडघे सैल
शेंडे बुंधे झाडांचे ती गजसेना कवटाळी
वृक्षशिलानुचरासह कधि कोसळून पडली खाली.
जरी दरीदरडीवर उतरति घोड्यावरुनी स्वार
तरि त्यांच्या देहाचा त्यांना असह्य झाला भार.

बघुन चालले रत्नराशिवर काही सांडणीस्वार
तेही शहाणे उंटावरले; कंटकि रुतले फार.
वनवेलींच्या वंशतरूंच्या कंटकमय घनजाली
छत्रचामरे ध्वजपट ही गुरफटुन फाटुन गेली !
सखी पाहते वाट खालती पवित्र कृष्णामाई
म्हणून जेथुन भेटिस धाव त्वरे कोयनाबाई.
तेथे गाजत वाजत आली अशि खानाची स्वारी
ससैन्य बसली पारघाटी त्या कुमुद्वतीच्या तीरी.
तिथे पुसाया क्षेमकुशल ती पंताजींची मूर्ती
घेउन ठरवी खानासह या राजभेटीच्या शर्ती:

" सेना जिथल्या तिथे ठेवुनी शिबिकेतून निघावे
खानाने एकाकी वरती सशस्त्र भेटिस यावे.
सेवेसाठी सवे दोन वा तीनच सेवक घ्यावे
दुर्गतळावर सभामंडपी वाट पहात बसावे.
तसाच राजा सेवक घेउन नंतर सशस्त्र यावा
आणिक त्याने त्या अतिथीचा बहु सत्कार करावा.

संरक्षणार्थ दोघांच्याही शूर सुसज्ज असावे
शरांतरावर दहा शिपाई मागे उभे रहावे.
भेट जाहल्यावरती व्हावी रहस्यचर्चा बरवी
संधिसाधनानंदकारिणी देणीघेणी व्हावी."

दूर कोयनाकाठी जरि ही यवनछावणी पडली
तरि खानाच्या इतमामाची पुरी व्यवस्था केली.
वाण्यांची हलवायाची भडभुंज्यांची जणु पेठ
उभी बसविली यवनतळापर्यंत गडाहुन थेट.
उघड्या मार्गावरती केली गोमांसाची विक्री
म्हणुन कसायाचे शिर छेदी अदिलशहाच्या शहरी
त्या शिवबांनी यवनसैनिका तेहि मिळावे खाणे
म्हणुन थाटली त्या यवनप्रिय वस्तूचीहि दुकाने.
गडापासुनी तळास जाउन गुप्त पहाणी केली
दृष्टि लष्करी ठेवुन तैशी बंदिस्तीही केली.

झाडे तोडुन खड्डे खोदून वाटा बंद अनेक
करून आता वाट गडाला खुली ठेविली एक.
खानाच्या फौजांचे तळ नी धोरण हेर निहाळी
त्या रोखाने तोफांचीही नीट मांडणी केली.
हुकूम केला प्रारंभाला पांगुन सैन्य रहावे
जाळी जाळी येथे तेथे ऐसे सज्ज असावे.
परि भेटीची वेळ ठेपता गडास वेढा द्यावा
चहुबाजूंनी अवळत आणुनि घेरा पुरा करावा.
संधिसूचक ध्वनि आणिक रणसंकेताचे वार
ठरवुन गुपचुप दिला इशारा सेनापतीस थोर.

ठेवि गडाच्या उत्तरभागी ढवळ्याघाटि शिबंदी
चंद्रगडासन्निध चौक्यांनी केली नाकेबंदी.

महाड गाठिल राजा खाली पळून घाटातून
म्हणून घ्याया पारघाट तो बसला खान टपून.

वेळ वाकडी पडता यावे गाठावया महाड
म्हणुन रोखि राजाही घाटावर तोफेचे तोंड
घाटातोंडी योजी यवना करावया प्रतिबंध
अडसर दारा तसाच घाटा पंतांचा भणिबंध
तोफ धडाडे तोच चढविण्या कळवी नेताजीला
जावळिवनात रिपुसैन्याच्या उजव्या बगली हल्ला.

जेधे-मोरोपंतांनाही हुकुम दिला, त्यावरती
तत्क्षणि चाल करावी वेगे डाव्या बगलेवरती.
प्रसंग पडता नेताजीने धावावे कुमकेला
नातरि हेरत हेरत रण ते जावे वाईतळाला
अशा एक ना दोन करोनी युक्तियोजना नाना
तहास अथवा होईल तर त्या रणास सजला राणा.
खानासंगे मंबाजीसम बडे बडे पाहूणे
आले म्हणुनी द्याया त्यांना मोठाले नजराणे
हिरेमाणके जडजवाहिरे पहावया घेऊन
यवनतळावर ते व्यापारी आणिले बोलावुन

मिळेल नवलाखाची दौलत म्हणुन हर्षले तेही
परि दुर्दैवे कोंडी झाली हे त्या कळले नाही
जन्मजोडिचे लोभी पोपट झुकले प्रताप-भुवना
कनक-पंजरी पडले! कुठला मेवा ? कुठली मैना ?

खानाच्या या भेटीसाठी पसंत केले स्थान
गडाखालचे सुंदर हिरवेगार खुले मैदान
त्यावर सुंदर मांडव घालुन छान बिछायत केली
छतास झालर मोतीयांची ! सुंदर सुशोभित केली.

भान जिवाचे हरपवि असला अतिसुंदर गालीचा.
अंथरिला मृदु अस्मानासम निळ्याच मखमालीचा.

नानारंगी बाडे लोडे तक्के तिवासियाही
घालुन गाद्या पडगाद्या मधि मांडी उच्चासनही
बऱ्हाणपुरचे रुचिर चिटांचे रंगित पडदे रुळती
हिरे हासती ठायी ठायी दिपवुनि रविची दृष्टी.
चहुकोनी सोन्याच्या समया खुलविति दिशांस चारी
तसा चांदवा जडिताचा करि झगमग झगमग भारी.
अफजलमुखमंडली पडावा लालबुंदसा लोळ
असे लाविले छतास मोठे सुंदर माणिक लाल
मणि मोत्यांच्या नयनी मांडव नटनी नृपासमान
टकमक पाही वाट अतिथिची करून वरती मान.

अखेरीस तो दिन भेटीचा उजाडला गुरुवार
माय भवानी संचरुनी ती स्फुरवी शिवतरवार.
स्नान करून भगवान शंकराचे मग पूजन केले
राजर्षींनी जगदंबेचे क्षणभर चिंतन केले
अंगि चपळता रणी रहाया अतिमित भोजन केले.
आचमनासम परिमित जळही पुनः पुनः ते प्याले
वज्रशरीरी अभेद्य घाली कठिण जिऱ्याची कुडती
चढवि केशरी शिडकावाचा अंगरखा त्यावरती
पायि घातला सुबक चोळणा कासहि कसली मोठी
बिचवा खोवुन वाघनखेही चढविली डाव्या हाती.

जिरेटोप शिरि घालुन सुंदर तुरा खोविला वरती
भेटिस सजली शिवरायांची अशी सावळी मूर्ती
कुणी सांगति पूर्वशिरस्ता धरून याही वेळी
दिधली अपुली तरवारहि त्या जिऊ महाल्याजवळी.

कुणि सांगती तरवार भवानी-पट्टा अपुल्या जवळी
घेऊन राजस्वारी अफजलखाना भेटिस गेली
नित्य दानविधि करुनी स्पर्शी दध्याक्षतादिकांना.
सवत्स धेनू सुवर्णसहिता दिली द्विजा गुणवाना
निजमुख मुकुरी पाहुन घेई दर्शन रविबिंबाचे.
नमुनि पुरोहित शुभ आशीर्वच शिरी घेतले त्यांचे.

पारतळाहुन खान निघे गरजत परजत तरवार
सवे घेतले निवडक लष्कर हजार दीड हजार.
शर्त मोडुनी सवे घेतली सेना खानाने ही
तरी शहाणा पंताजी तो काही वदला नाही.
नदीनिर्झरांचे वनि वाहे मधुजळ निर्मळवाणी.
परि खानाच्या मनि पापाचे खेळे काळे पाणी.
कपट पाहुनी दुहीबाजुची राई खवळून गेली.
खाना वाटे ती त्या मुजरे करुनी चवऱ्या ढाळी.
अवतीभोवती डोंगरखोरी पाताळी वसलेली.
अशी खोल ती जनीटेंबची दरी भयंकर आली.

उत्तर भागी उभी धावणीच्या टेकाची सोंड.
दक्षिण अंगी पसरे कुमठ्याच्या ओंढ्याचे तोंड
त्यातून तेथे जाळी जाळीत शूर मराठी सेना
छपून बसली त्याच दरीच्या दोन्हीही बगलांना
स्थळ अवघड हे हेरुन सेना खानाच्या कोंडाया
बोले पंताजी तो आता मुत्सद्दी लढवय्या:
"अवघ्या दोघातिघानिशी येईल भेटाया राजा
तर मग कशास खाविंदांनी या वर न्याव्या फौजा ?
करार भंगुन नेता सेना होइल गाजावाजा.
मग भेटाया येइल तरि का भेकड भितरा राजा ?

परतुन अथवा पळून जाइल खाइल दहशत राजा
डाव बिघडता येइल अपयश अदिलशहाच्या काजा

म्हणुनी विनंती : "खाविंदांची सेना इथे रहावी
रक्षक सेवक घेउन अपुली शिबिका वरती न्यावी.
लपुन रहाया सेनेला ही जागा दिसते छान
काय बघाया मिळेल असले दुसरे सुंदर रान ?
उपभोगाया मिळेल शीतळ पाताळाची छाया
आणि गडावर कळणारहि हे नाही आम्हुच्या राया. "
राजभेटिच्या मोहाची अशि घालुन वेसण खाशी
विजापुराचे अस्वल नाचवि दख्खनचा दरवेशी !
ठेवुन सेना शिबिकेमधुनी खान मंडपी आला.
संगे कृष्णाजी पंताजी सेवकगणही आला.

अद्भुत मांडवशोभा पाहुन पुन्हा पुन्हा वदलाही :
"असा बिछाना अशी बिछायत बादशहाची नाही.
अदिलशहाचा दौलत खजिना मीहि पाहिला सगळा.
परंतु येथिल मोतीदाणा दिसतो मोलाअगळा. "
मोतीलग सदरेची शोभा बघुनी मत्सर दाटे
खानाच्या मनि, पाहुन बोले तयास पंताजी ते.
"माणिक मोत्याच्या या धनदौलतिची कसली चिंता ?
बादशहाची बादशहाच्या घरास जाईल आता. "
अता निघाली राजस्वारी प्रार्थुन जगदंबेला
सवे घेतले संभाजी कावजी नि जिऊ महाला.

पाठोपाठ निघाला राजाचा खास बारगीर
तो रणगाजी तानाजीही घेउन करि तरवार
मंडप यावा दृष्टिपथामधि आपण दिसू नयेही
अशाच धोक्यामोक्याच्या परि गुप्तस्थानी काही

निवडक चाळिस शूर शिपाई देउन घळिमाझारी
खडी ठेविली वीर हिरोजी फर्जंदाची स्वारी.
चौघेही गड उतरुन गेले मंडप समीप आला
शिवरायांच्या पंताजींच्या मोल न चातुर्याला.

सदरी होते कोण कोण ते निहाळिले शिवबांनी
आणिक काही कुजबुज केली तानाजीच्या कानी
ज्याला पाहुन मोठे योद्धे फोडित रणि हंबरडा
तो मर्दाना पंचहत्यारी दिसला सय्यद बंडा.
घडेल सदरी जे जे काही दिसेल ऐशा स्थानी
तानाजीला उभे रहाया सांगुन गेले निघुनी.
आणि थांबले मधेच घोडे, स्वारी पुढे निघेना
सदरेमधून बोलावुन झणि अणिले पंताजींना.
आणि बोलले, " काही करुन खाना जाउन कळवा
सय्यद बंडा दूर करावा सदरेबाहिर न्यावा."

हजरजबाबी पंताजीही लगबग सदरी गेले
चातुर्याने विनम्रतेने खानासंगे बोले:
"भेटीसाठी आले राजे परंतु बहु घाबरले
बंडा दिसता काळीजाचे पाणी पाणी झाले.
प्रचंड शक्तीचा हा बुरुज कापवि अमुच्या रावा
म्हणुन विनंती सय्यद बंडा सदरेबाहिर ठेवा.
खाविंदांना 'भतिजा' व्हावे बालशिवाजीराजे
आणि मानिती तेहि आपणाठायि शहाजीराजे.
किति तरि जुळवाजुळवी करुन भेटिस आणिले राया
थोड्यासाठी सुवर्णसंधी न जाऊ द्यावी वाया."

इतुक्यामाजी इकडे तिकडे बघता खाली वरती
खाना दिसली उभी ठेंगणी ठुसकी श्रीशिवमूर्ती

विचार आला बेगुमान त्या गर्विष्ठाच्या चित्तीः
"काय वाकडे करील असली खुजी बावळी मूर्ती ?
त्यातुन त्याने पहा ठेविले तानाजीला दूर
दोन सेवकाविना कुणी ना, उरे न मुळि हुरहुर."
सन्निध होता सय्यद बंडा फर्माविले तयाला,
" जाउन येथून खडे रहावे त्या दुसऱ्या सदराला."
सय्यद बंडा निघुन गेला शिवसिंहही निघाला
आणि झपाझप लांब पाउले टाकीत सदरी आला.
पुढे चौथरा चढून वरती राजस्वारी आली
खानही आला सामोरा दृष्टीस दृष्टी मिळाली.

किंचित गाली हसून त्यांनी कृष्णाजींना पुसिलेः
" खान हेच का भेटिस आले बडे विजापुरवाले ?"
तसेच खानांनीही वळून पंताजींना पुसिलेः
"हेच शिवाजीराजे का गड उतरुन भेटीस आले ? "
एकामेकां दोन्ही पक्षांच्या त्या हेजीबांनी
" हेच शिवाजी, " "खान हेच," या दिल्या ओळखी करुनी
राजाचा विश्वास जडावा म्हणून गुप्त कटयार
ठेवुन खानाने निजदासा दिली दुजी तरवार.
अखेर भिडली खान-शिवाजीच्या भेटीची वेळ
वाटे सकला होइल तह परि न्यारा विधिचा खेळ

खानाने वर हात पसरले पुढती राजे सरले
कवळुन दो हाती राजाला छातीशी भिडविले
दोन सेवकाविना कुणी ना बघुनी राजाजवळी
खाना वाटे आता सावज आले आपुल्या जाळी
येइल का कधि काळी पुनरपी सुवर्णसंधी असली ?
म्हणून योजना क्षणि खानाने अपुल्या मनात केली.

घाव घालुनी मारावे वा घायाळ त्या करावे
त्वरे कोयनापार विजापुरि घेउन निघून जावे.
आलिंगनात राजग्रीवा डाव्या हाती धरिली
कवटाळुन ती दाबुन धरिली डाव्या काखेखाली

कट्यार म्यानातून काढिली झटपट करून मोठी
अन् राजाच्या कुशीत डाव्या खुपसे उजव्या हाती.
अभेद्य कवचाने राजाची काया रक्षण केली
मुळि न लागली कटारिका ती वरच्यावर खरखरली.
अभेद्य कवचावर हा कपटी कट्यार मारी फसली
म्हणुन शिवाच्या कमरेवरची मनात नागिण हसली.
क्षणात हसडुन मुंडि काढिली बगलेतुन शिवबांनी
अन् भोसकली आरपार तरवार कराल भवानी.
विशाल उदरी शिरून पाठीबाहेर ती निघाली.
जणु खानाच्या मागे लपले कोठे कोण निहाळी?

कपट–सर्प तिज अंतरि दिसला डूक धरुन बसलेला
कापुन आली घेउन बाहिर त्याच्या अंतर्माळा.
तोडि शिरासहि विद्युत्सम ते तरवारीचे पाते
खाली पाडी धड लवता लवता नयनाचे पाते.
बेइमान त्या मुसलमानभाईस मराठी पेच
अखेर उमगुन पडला खाली रत्नांचा शिरपेच.
कुणी सांगतो कुशिवर पडता खलयवनांचा घाव
समर्थ-जगदंबा मनि आणुनि केला हा प्रतिडाव.
वामकरातिल वाघनखांचा खुपसुन केला मारा
विद्युद्वेगे पोट फाडुनी काढि कोथळा सारा.

आणि उपसुनी उजव्या हाती कमरेवरचा बिचवा
पुरा विंधला खानाचा अणि उदरविभागहि डावा.

युद्ध निपुणी निपुण शिवाजीने केली चतुराई
अंग अकुंचित करुन आता कंधर काढुन घेई.
निमिषोन्मेषी उभे राहिले कोठे कोण निहाळी
उडी ठोकिली वनराजाने लांब चौथऱ्याखाली.
खानाने इतुक्यात कोंबला आत कोथळा अपुला
झटपट त्यावर काढुन अपुला घट्ट बांधिला शेला.
पाठोपाठ उफाळुन घाली झडप शिवाजीवरती
केले वार कडाडुन त्याच्या अंगामाथ्यावरती.

शिरस्त्राण शिरि कवचहि अंगी धारण करि शिव वीर.
म्हणुन वार जमदाडीचे ते झाले न कारगीर.
गोब्राह्मणभूपालक राजा द्विजास मारिल कैसा ?
म्हणुन रणामधि निविष्ट केला ब्राह्मणयोद्धा खासा.
करुन हुद्देदार त्यास वकिलाचया नावाखाली
जवळ ठेविले माराया राजाला भेटीवेळी
तोही ब्राह्मणयोद्धा आज्ञा होता धावुन आला
तरवारीचा हातहि त्याने राजावरती केला.
ब्राह्मणयोद्धा गुलामबंदा खानाचा अभिमानी
तो कृष्णाजी जरि पडला तरि लढला तसा इमानी.

हुकवित चुकवित वार तयांचे डाव हूलिचा खेळी
राजस्वारी जाउन भिडली जिऊ महाल्याजवळी.
अंति आतडी गळून पडली खाना मूर्च्छा आली
'धावा! धावा! दगा जाहला!" खान असा किंकाळी.
हा खानाचा हंबरडा झणि सदरेबाहिर गेला
वाऱ्यासरसा सय्यद बंडा मंडपि दौडत आला.
धनि भूमिवर पडलेला दिसताक्षणि मनि चरफडला
व्याघ्रासम चवताळुन राजावरती चालुन आला

तत्क्षणि अपुली जिऊजवळची हुद्याची तरवार
आणिक पट्टा घेउन राजे झाले रणा तयार

पट्टातरवारीने कातर करून वर उडवीले
सय्यद बंडाचे ते प्रचंड चार वार चुकवीले.
हात पाचवा करून आता बंद्याला मारावा
तोच मध्ये शिरुनी जिउ बोले–" देह न हा श्रमवावा.
या मर्दाचे हात शत्रुचे नरडे फोडायाला
भाल लाल रक्ताचा त्याच्या टिळाच लावायाला."
तोच जिऊची फिरंग बंद्याच्या खांद्यावर आली
खाप हत्यारासह हाताची खांडुन पाडी खाली.
खानाच्या उरलेल्या हुद्देदारावरही हल्ला
करुन जिवाजी संभाजी त्या धाडिति यमसदनाला.

अफजलरक्षक अन्यवीरही शरांतराहुन आले
शिवरायाला संहाराया तुटुन तयावर पडले
किती शोभली श्रीशिवमूर्ती अशाहि संकटकाळी
अलातचक्रासम फिरली तरवार तयांची काळी.
शिवखड्गाच्या अखंड तेजोवलयातून कुणाही
स्वकीयपरकीयांना ती शिवमूर्ती दिसली नाही.
आणिक आईबाप देवदौलत ती सगळी काहीं
वसति जयाची एक होउनी शिवरायांचे पायी.
तोहि जिवाचा जिवलग मैतर ताना धावत आला
शिवरायांच्या जीवावरचे आक्षण उतरायाला.

धन्य शिवाजी! धन्यचि तानाजी! रिपुसैनिक तोडी
काय बघाया मिळेल असली एक जिवाची जोडी ?
कंक, कावजी, शूर मुरंबक, करवर, गायकवाड
इब्राहिम शिद्दी शिवरक्षक घुमविति सर्व पहाड.

तशात भोई तिथे पालखी घेउन धावत आले
झटपट घालुन तीत खान ते सदरेतून निघाले.
सेवक संभाजीची स्वारी पाठोपाठ निघाली
पाय कापुनी भोयांचे क्षणि पाडि पालखी खाली.
आवेशामधि मरणोन्मुख खानावर फिरंग घाली
खानाचे शिर कापुन आणुन दिधले राजाजवळी.

रणघाईचा वखत म्हणोनी राजा वदला नाही
परी कृती ती संभाजीची त्याला रुचली नाही.
पंताजींनी निवेदिले आता राजाच्या कानी
सेना यवनांची राहे ती उभी जनीच्या रानी.
आता मंडपि खानाचे कोणीही उरले नाही.
म्हणुन हिरोजी फर्जंदाला फर्मावी लवलाही:
" द्या उपराळा जेधेबांदल लोका " बोले शिवबा.
शब्द निघाला तोच गाठला हिरुने जनिचा टेंबा.
घडि न दवडता दुर्गरक्षणा वरती परत निघाले
खानाचे शिर घेउन राजे तडक गडावर गेले.

दात पडाया नागीणीचा, व्याघ्राक्ष वा फुटावा
तसा दिसे अफजलाविना तत्सेनासागर रावा.

मंडपि झाला कर्णा, पडली रणभेरीवर टिपरी
रणघोषाने दुमदुमली ती डोंगरखोरी सारी.
तोफ पावणेपाच वाजता सायंकाळी झाली
तत्क्षणि " हरहर महादेव " ही आरोळी वर उठली.
कुडेसराहुन अश्वदळासह चतुर वीर रणगाजी
वाईला भरधाव दौडला सरनोबत नेताजी.
आणि गडाची सोंड धार ओलांडुन वाऱ्यावरला
तीर सुटावा तसा चमूपति मोरोपंत निघाला.

घोडवनाला आला तेथे शूर ढमाले याला
जनीकडे दौडाया सांगुन वेगे पुढे निघाला.
महारवाड्याचे टेंक नि ती जनीटेंबची सोंड
यामधि बसवी जेधे धरून ते खाड्याचे खोंड.
युद्धज्वाला भडकुनि वनि पेटले जनीचे टेंब
क्षणात उसळे तिथेच पहिला प्रळयाग्नीचा डोंब.
आग लागता मेंढघरा मेंढरे मरावी ज्वाली
तशि यवनांची सेना जनिच्या दरीत भाजुन मेली.
ओढा कुमठ्याचा नि पारचा वेगे उतरुन गेला
निघून निवळीतून पेशवा पारतळावर आला.

ओढे खोरी दऱ्या खळग्या मधि दाट भयंकर झाडी
काटुन आला अर्ध्या घंट्यामधि वाट नागमोडी.
तसाच घेउन सहस्रपंचक रणपटु पायदळाला
महाप्रतापी ब्राम्हणयोद्धा नारायण रणि आला.
येसाजी, तानाजी, कोंडाजी, रामजि, कमळोजी
पंचाग्नीसम वीर भडकले रणकुंडी रणगाजी.
यवनतळाची आघाडी नी डाव्या उजव्या बगला
येउन अवचित तिन्ही बाजुंनी प्रचंड हल्ला केला.
पारतळावरचा हा हल्ला किती अचानक झाला
खोगिर घोड्यावर घालाया अवसर त्या न मिळाला.

त्यातुन घोड्यावरी स्वार होऊनही कोणी लढले
सैन्य कोंडले घोडे अडले स्वार धडाधड पडले.
पारघाटचे यवनसैन्य हे वाइस मिळण्यासाठी
पळेल तर ते जिथल्या तेथे रोखुन धरण्यासाठी
पारघाट ते वाई यामधि बोचेघोळी घाटी
ठाण मांडुनी बाबाजी भोसला बैसला वाटी

मोरोपंतांच्या हल्ल्याने जशी जशी पळ काढी
तशी तशी यवनांची सेना तीही कापुन काढी.
वेगे मागे धावत आली तितुकी कत्तल केली
मोरोपंतांच्या काबूमधि परतवुनी कधि घाली.

भव्य गजांच्या मत्त हयांच्या धांगडधिंग्याखाली
पाषाणांची पर्वतभूमी गदगद हदरुन गेली.
वाद्य–शस्त्र–भट–गज–हय–नादे दिग्मंडल दुमदुमले
महावनातुन वाघनागही रणात खवळून आले.
प्रचंड वीरश्रीचे सुटले उलटे सुलटे वारे
समरभूमि समविषमगुणांनी गजहय उलथवि सारे.
अवजड गजहय यवनांचे शिवपदातिपति निर्दाळी.
अंति यावनी गजाश्वसेना पदातिसेना बनली.
रणगगनी भट–मेघ धडकुनी खड्गतडित चमचमली
नररक्ताच्या अभिषेकाने समरदेवता न्हाली.

भीषण रणकंदन पाहुन दिनमणिने मिटले
दचकुन तारामंडल सगळे थरकन वरती सरले.
नवल कशाचे मग ते तुंग तुरंगमतगंज खजिना
यवनहि पळती सैरावैरा टाकुन सर्व जनाना.
लाख लढाया झाल्या ठरवुन कुठे लढावे कोणी
परि सेनापती रणभूमी अशि निवडावी शिवबांनी.
मोरोपंतांची ती सेना पायदळाची सगळी
पिटता पिटता पाठलागही करिता थकून गेली.
परंतु बाबाजीची तुकडी घोडदळाची सगळी
होती ताज्या दिलादमाची मोठी हिंमतवाली.
त्यातुन आली उजव्या बगली रघुनाथाची तुकडी
तीही तिकडुन घाव घालुनी कंबर रिपुची मोडी.

घ्यावी पलटी उजव्या बगली खावी पीछेहाट
तरि तो तिकडे कुडेसराहुन सुटला झंझावात !
टप्पे लावुन निघता झाली नेताजीला सांज
धावत आला हिंमतवाला तो नर हुन्नरबाज.
येता वाईतळापूर्विचे मग अंत्यावस्थान
तिथे थांबला घडिभर घ्याया शेवटचे अवसान.
कोणी कुठला विध्वंसावा यवनतळाचा भाग
सांगुन सेनापतिना सुटला सह्याद्रीचा वाघ.

अता वाइच्या यवनतळाचे उभे राहिले पाप
उठे खडाखड नेताजीच्या रणघोड्याची टाप.
तळपत किति तरवार तयाची वाइतळावर आली
खड्ग नव्हे ते ! आकाशातुन वीज कडाडुन सुटली
कोण वदे येइ सव्यसाची स्वारी नेताजीची ?
दौड नसे ही सरनोबतची ! झडप असे काळाची ?
झेप पन्नगावर आली ही विष्णूच्या गरुडाची !
पापपर्वतीं फेक सोडिली इंद्राने वज्राची !
किती भयंकर घोडदौड ही करी दिशांना धुंद
मार्ग–मासिचा सात कलांचा लपला चिमणा चांद !

रणावेश तो पाहुन कलिपुरुषाची स्वारी भ्याली
निजमुख झाकी घेउन काळोखाची कांबळ काळी !
अश्वखुरांच्या आघातांनी उठति विजेचे लोट
अधुनमधुन ते स्वारा दाविति घोडदौडिची वाट.
इकडे कळता तोफ, हर्षली ती यवनांची सेना
वाटे तिजला सन्मानाची दिली सलामी खाना ?
संगर–सूचक विजयध्वनि कथि खान निघे निजधामा
परि वाटे तो यवना झाला दोघांचा तहनामा ?

त्यातुन गुरुदिन मंगल म्हणून रंगुन गेल्या फौजा
गात बजावत करीत बसले कुणि कबरीची पूजा

अशात लोटे तिथे मराठी घोडदळाचा लोंढा
करित ओरडा–"गनीम पाडा, फोडा, झोडा, तोडा."
असा अचानक हल्ला होता एक कालवा झाला
अल्ला ! अल्ला ! करित धावला सगळा दाढीवाला.
तरि रणमद संचरुनी घोडे घोड्यावरती सुटले
सशस्त्र योद्धे विजयेच्छेने परस्परांशी भिडले.
भाले भाल्यावरती पडले गदा गदावर आल्या
बाणहि बाणावरि समशेरीवरि समशेरी पडल्या.
तुरंग सुंदर मत्त मतंगज यवनांसह किति पडले
उरले सुरले धावत सुटले रक्ताने भिजलेले.

त्यातुनही शर नेताजीचा स्वर्गी रिपुशिर नेई
कधि भूगर्भी त्यासह घुसुनी शेषदर्शना घेई !
शिराशिरस्त्राणांसह रक्ताची कारंजी उडली
कवचासह किति यवनकबंधे भूमीवर कोसळली !
कधि जो अवयव शस्त्राघाते देहापासुन तुटला
उलटुनि तत्क्षणि तो त्वेषाने प्रहारकावर आला.
गगनमंडळा भेदुन गेल्या वीरगर्जना मोठ्या
डोंगरखोऱ्यामधुन वाहिल्या लाल नद्या रुधिराच्या.
तुटक्या हातापायांचा नि धडांचा डोंगर उठला
तसाच रक्तामांसाचा रणि भीषण कर्दम झाला !

नसेल कधिही झाले रण ते रंगुन गेले
शिवसैनिकही जिवाजिवाची तमा न धरिता लढले.
खोगिर नाही, घोडा नाही, स्वारहि उरला नाही
योद्धा नाही, शस्त्रहि नाही, हाती ध्वजही नाही !

तंबू नाही, कनात नाही, मेखहि नाही उरली
अशी अवस्था अफजलखानाच्या शिबिराची झाली !
मृतवीरांचे मणिमोत्यांचे सावयवालंकार
अंगी घालुनि नटली रणभू भयाण तो शृंगार !
रक्त उडवुनी नाचति डाकिणि रणि कोल्हयांच्या झुंडी
दंताग्रांनी प्रेते फाडुन भेसूर सूर काढी !

हार घालुनी तुटक्या फुटक्या विद्रुप मुंडक्याचे
रक्त माखुनी मुखी रणचंडी समरी थयथय नाचे !

जिकडे तिकडे यवनांच्या अशि उडली दाणादाण
चिंध्या बांधुन पायि पळाला बेटा फाजलखान !
पळता झाली भुई थोडी तरि लागे ना वनि ठाव
गोरा मोरा समोर दिसला मोरे प्रतापराव.
मुसेखान अन् फाजलखानहि करिति तया अटकाव
क्रोधाग्नीच्या उठल्या ज्वाला–" कुठे निघाला राव ?
चंद्रराजपद मिळवायाची, दुष्टा, धरून आस
इरेस घालुन तू आम्हांला दिलास हा वनवास.

सांगुन चुगल्या, बोलुन मिथ्या, छपवुन निजकपटासी
प्रळयाग्नीच्या मुखात आहुति दिलीस अमुची खाशी.
जयवल्लीचा वेल निराश्रित म्हणुनी विजापुरास
येउन, कवटाळुन वाकविले तू त्या वृक्षवरास
विद्युद्वेगे पोचवि आता विजापुराला थेट
मार्ग दाविसी, अधमा, का घेऊ नरडीचा घोट ?
भिरभिर वनभर फिरुन भागला थकला भारी जीव
दाट जंगलातून वाट तू विजापुराची दाव.
केले जे ते झाले थोडे म्हणुनी अपरंपार
वैभव देऊन तुजवर करुंही अनंत नव उपकार !

दिल खचला बघ तिळभर आता उरला नाही त्राण
पाया पडतो, प्रतापरावा, वाचवि आमुचे प्राण. "
तो वाघाच्या डरकाळ्या वनि उठल्या भीषण फार
हरिण-उड्या घेउन त्या नेले अचूक जंगलपार.
नेताजीचा घोडा लागे पाठिस रातोरात
तरि त्या चकवुन छपवुन नेले तसेच हातोहात.
अल्लिशहाचे वजीर लष्कर शहरहि दिलगिर होई
बादशाहजादी ओरडली रडली धाई धाई !
अदिलशहाच्या अंतःपुरात उठला शोकाकान्त
बडेसाहिबिण बोले मारून शुभ्र कपाळी हात.

" दुष्ट मराठी मनगट त्याचे पोलादाचे हाड
अदिलशाहिच्या डोक्यावरती मारी आज कुऱ्हाड !
काढुन अमुचे राज्य कापुनी सम्राटाचा हात
अल्ला टाकिसी काय मराठेशाहीच्या पदरात ?
अन्न न खाई ती पाण्याचा थेंब न घेइ मुखात
सुवर्णमंचकी अशि हळहळली तळमळली दिनरात !

युद्ध संपल्यानंतर

निशा निवळली, दिशा उजळल्या, रविकर नाचत आले
स्फटिकासम ते नद्यानिर्झराचे जळ निर्मळ झाले.
हिरव्या पानावर वेलींच्या थेंब दवाचे हसती
का स्वर्गातुन सुरांगनांनी उधळिलि माणिकमोती.
मयूर कोकिळ कुक्कुट पोपट गोड गळ्याच्या मैना
मंजुळ गाणी गाउन मोदे घुमविति सगळ्या राना.
सृष्टिसुंदरी हसली डुलली अनंत सुमगण फुलला
चंदनचंपकसुगंध पवनी गिरिपरिसरि दरवळला.
अनाथ रिपुसैनिक राजांनी धरून पोटाशीही
करुन दिलासा वेतन देउन लेका चालविलेही.

खानाचे शिर बुरुजामाजी सन्मानाने पुरले
महासमारंभा जणु लाजुन दृष्टिआड ते झाले.
खानाचे धड पडले त्यावर कबर उभवि टुमदार
करी दफनविधि इतमामाने तो राजा दिलदार.

आनंदाने कबरीसाठी दिले निरंतर वतन
दाविल का कुणि केला असला मृत रिपुचा सन्मान ?
कौतुक केले स्वसैनिकांच्या अतुल्य मर्दुमकीचे
कडी चौकडे तोडे दिधले हिरे तुरे मोत्यांचे
पंताजींना गौरविले देउन वस्त्रालंकार
उदंड हीरक माणिकमोती आणिक धनहि अपार.
झाले पंताजी वकिलांचे जगि अजरामर नाव
बहाल केला त्यास रहाता त्यांचा हिवरेगाव.
गाजत वाजत गंडकीतुनी अणिला शुभ पाषाण
घडविलि त्यावर मूर्ति भवानी देवीची किति छान !

अष्टभुजा ती दुष्टशासना अष्टायुधासि धारी
श्यामांगी झळकती स्वयंभू सुवर्ण–रेखा भारी.
मूर्ति मंदिरि स्थापुनि केला महोत्सवाचा थाट
सुंदर सोहाळा तो गाता थकतिल सारे भाट.
ओजतेज ओसंडुन चाले असे विनटले ध्यान
झाले प्रतापगड देवीचे जागृत वसतिस्थान.
दिला मंदिरावरती भगवा झेंडा फडकावून
मंगलवाद्ये दुंदुभि घुमल्या, डुलले सगळे रान.
स्वराज्य आले, सुराज्य झाले, भगवा झेंडा डोले
आणि महाराष्ट्राचे आनंदवनभुवन ते झाले.

यवनात्याचारावर जर नसता राजाचा रोष
उरता का हिंदूंच्या देवाधर्माचा अवशेष ?

धर्मोद्धारा अवतरलेला शिव देवाचा दूत
स्वधर्म रक्षुनि मानी गुरु फकिरा बाबा  याकूत.
कधी कारणाविना न केला यवनांचा विद्वेष
प्रेमे काजी हैदर झाला राजाचा चिटणीस.
तरी पन्हाळा किल्ला वेढुन कुणि त्या कोंडुन  घाली
कुणि कपटाने पकडाया त्या दाविति आग्रा दिल्ली !
मयूरसिंहासनासमोरी कोण कसा त्या आणी ?
पुढे सारजा साधी माझी सांगिल तीहि कहाणी.

गाइल कधितरि बादशहाची स्थिति ती केविलवाणी
थांब मराठी मैना माझी झाली थकल्यावाणी.
अंति प्रणाम जगदंबेला समर्थ–शिवरायाला
प्रणाम करुनी भूमातेला रसिका चला घराला.
परराज्यातिलही घर अपुले होइल भास कुणाला
तर मग कुठे कसे जायाचे पुस गडच्या दगडाला !

# बिल्वदल

भाग २

## शिवशाहीचा मध्यान्ह

ऐका कसला घोर गलबला भिडला वर गगनाला
चिवचिवणाऱ्या चिमण्यांनी अभि वेढियले गरुडाला !
दात पाडला म्हणुनि खवळुनी फडा उभारुन पिवळी
शेषशायिच्या कटिभवताली भुजंग विळखा घाली !

मोहरलेल्या आम्रतरुवरा नमवायाला खाली
सुक्या वाळक्या वेली घालिति वेढे त्या भवताली !
मेरु गिळाया जमला सेनासमूह किति मुंग्यांचा
जलधीमाजी मत्स्य जिणाया जमाव किति झिंग्यांचा.
धावु लागल्या लांब सावल्या ! झाल्याही तिनिसांजा
म्हणति वनांतरि मृग-वृंदांनी कोंडियले वनराजा !
जंगलचे हा कोण चालवी राज्य एकटा रात्री
म्हणुनी सुटली वनराजावर असंख्य कोल्ही कुत्री !

मांडुनि दौलत कोण एकटा राज्य करी गगनात
म्हणुन उसळले त्या दिपवाया किति खद्योत वनात !

प्रभात समयी विरल तयाच्या विरलेल्या पटलांनी
अडवुन धरिले बालरवीला वरवर येता गगनी !
सुंदर सुंदर सुमनफलांना वारा लुटुनी नेई
म्हणून होई चिंता-व्याकुळ यवनांची वनराई
तया धराया वृक्षलतांनी पसरिलि रानोरानी
पर्ण-सुमांची हिरवी पिवळी जाळी गोजिरवाणी.
शिवगुण मौक्तिक दिपवित नयना मूल्य कसे मी मापू ?
गुणा न अतन छिद्र मौक्तिका हार कसा मी गुंफू ?
इतिहासाच्या वृक्षतळिही बसुनि पुढिल कहाणी
गाइल माझी अता मराठी सुरेल मैनाराणी.

छेडून वीणा साथ तुझी म्हणुनि दे शारदाबाई
शिव-यश मोठे परंतु माझी लहान चिमणाबाई
गगनभराऱ्या मारुन जीवा गुंगी आणित नाही
म्हणुन राग कुणी करू नका निज पंखहि फुटला नाही!
त्यातुन लागे तिच्या जिवाला खरेपणाची गोडी
रुचेल कितीशी इतिहासाला कल्पकतेची जोडी ?
काय करु मी वेडी झाली शिवरायांचे पायी
माझी साधी सुरती परि लडिवाळ सारजाबाई.
गाऊ द्या की खुशाल तिजला वृक्षांच्या ढोलीत
बसेल ऐकत गाणे तो ज्या रुचेल त्याचा अर्थ.

आले का कुणी गेले का कुणी तिचे न तिकडे ध्यान
भाग्याची ती तिज ऐकाया बसे शिवाचे रान
कुणी बोलतिल जुनी पुराणी एक चाल ती बोले
भावगीत नवनवचालींचे बालमुखी बहु खेळे.

बालमुखी कुणि नवगीतांची खेळवि गंगामाई
तरी कुणाशी या मैनेचा राग न रुसवा काही.

मैना माझी नच बाळगते भावगीत–वैराग्य
गाते येथे ते ती इंदुर–चाफळ–वनिचे* भाग्य.
मनि आले शिव-गुण-मणि-माला गुंफाव्यात अनेक
परि आवडिचे गमले माझे वृत्त असावे एक.

ब्रह्मासम निर्विकार माझे साकीवृत्त विशेष
वीर करुण वा बघ कुठल्याही बने रसाची मूस
गायक मोहक विविध चालीवर गाई तेहि सुरेख
आळवितो तो त्या मधि नवरस रंगत रसिका ऐक.
शिव-विभु-गानी प्रौढगभीरा सरस्वती जी बोले
चरणी तिच्या का नर्तकिचे मी घालू पैंजण-वाळे ?
ज्ञानेशांनी मक्तेशांनी नाथ-समर्थांनीही
धर्म विवरणा ओवी ओवी काय गाइलि नाही ?
महापंडिते, मयूरपंते रचिलि आर्या लाख
विठ्ठलि रंगलि ना तुकयाची अभंगवाणी एक ?

कृष्णाकाठी कुंडल हे ही याच चालिचे गीत
जणू शारदा-मंदिरि शोभे नंदादीपज्योत.
आणि आपुला महाराष्ट्रिचा किर्तिवंत 'यशवंत'
विशाल 'बंदीशाला' गाई निवडून साकीवृत्त
वसंतसमयी आम्रवनी चल रसिका जाऊन पाहु
भार सृष्टीचा तिथेहि गाई एकच कूहू कूहूं
चंडोलाची शीळ खडी नभि एकच चाले ऐक
गिरिवर नाचत मयूर गाती सुरात केका एक

---

* इंदुर – कवी भास्करराव तांबे
चाफळ – राजकवी यशवंत

तेच तेच ते साळुंकीचे चाले मंजुळ गीत
त्याच त्याच त्या शब्दी रंगे वनि मैनेची प्रीत.

तोच तोच मधु बनात चाले गुंजारव मधुपांचा
कडे कपारी एकच घुइं घुइं शब्द निघे पवनाचा
गाती निर्झर वनि वनि एकच झुळझुळ मंजुळ गीत
सदाच गंभिर गाणे गर्जे सागर उंच सुरात
फेरा एकच ठेका एकच चालहि एकच एक
असे चाले नभात संगित तारांचे ठिकठाक
अशी चालली ज्याची त्याची एकच साधी तान
परि हरपवि ती युगे युगे ही कवीकवींचे भान.
तशि माझ्याही चिमणीची शिव-वनि एकच चिवचीव
फुलविल ना मग रसिका, तुझिया जीवाचे राजीव ?

त्यातुनि उपवनि कुणी कुणाच्या ठेवुन गाली गाल
इथे नाचणे गाणे नाही नाजूक नखरी चाल !
खंड काव्य हे इतिहासाच्या डोंगरकड्यांत खेळे
तोल न जाईल त्यांनी या; हे स्वर्गावरचे झोले !

मरून अफजलखान उगवला असेल दिन अठरावा
तोच लागला अली कराया पुन्हा खुदाचा धावा.
फोल जाहाली बड्याबड्यांची रणिही बडो बढाई
बादशहाच्या बहादुरीची उघडि पडे उणवाई.
असेल सेना अदिलशहाची मोठी लाख करोड
तरि येई शिव-मनि मोडावी पुरी तियेची खोड.

टापा टाकीत नेताजीचा घोडा बेदम सुटला
किल्ले चंदन वंदन जिंकुन कोल्हापुरास आला

तळकोकणचे नाके घ्याया शिवबा तिकडे वळला
पंख उभारुन उंच भरारुन गरुड पन्हाळी आला.
पन्हाळगडचे शुर गडकरी गर्जत गिरितट आले.
जन्माचे ऋण परत कराया देवाघरला गेले!
अफझल घाताऽघाते डोळा अल्लीने मिटलेला
उघडून बघतो तो त्या दिसले पन्हाळगडही गेला.
अदिलशहाच्या राज्यरथाचा कणाच भंगून गेला.
मत्सेनापति पळून गेला भिऊन नेताजीला.

मुसेखान अन् फाजल याकूत अंकुश कर जोडून
उभे राहिले धन्यासमोरी घालुन खाली मान.
वदने त्यांची काळवंडली नयनी पाणी आले
“या या” उसन्या अवसानाने धीर धनी त्या बोले.
“अफझल सरला सोने झाला गेला नाही वाया
निजबलिदाने भरला त्याने साम्राज्याचा पाया.
वर्णिल धृति ती कोण? एकटा गेला रिपूच्या गोटी
साहस पाहून ओवाळा त्या नवरात्राच्या ज्योती.
एकटचास त्या जयवल्लीच्या नेउन निबिड वनात
दुष्टाने त्या कपटी त्याच्या जिवास केला घात.

बुद्धिबळाची युक्ती बळाची जोड जयाला नाही
साहस असले सहसा कोठे यशास पावत नाही.
घालून चिलखत सैन्यहि होऊन देता कमरी पाय
तर माराया दुष्टांची का त्याची व्याली माय?
अंतर्यामी जीव जळफळे पाहुन त्याचा दर्प
कोण शहाणा जिवंत ठेविल असा उशाशी सर्प ?
डोंगर मुलखी अडव्या तिडव्या उड्या शिवाजी मारी
कडेकपारी होते अल्पही जळ उच्छृंखल भारी.

फराद पुत्रा उमगे पुरता रिपुचा गनिमी कावा
म्हणून सेनानायक आता रुस्तुम जवान व्हावा

सेनानायक अपुले प्रांताप्रांतातोनी आणा
आणी सहाय्या घ्या दिल्लीच्या बादशहाची सेना
पन्हाळगडाच्या वज्रांगाला थरथर कंप सुटावा
असाच दुंदुभि रणशिंगांचा प्रचंड नाद घुमावा
राज्यामध्ये माझ्या झटु द्या प्रचंड नौबत घाई
आणी दौडु द्या स्वार भयंकर ओळखुनी रणघाई
गर्जत चाले मग शस्त्रास्त्रे लखलखणारी सेना
जसा कडाडत भडकत वणवा जाळित जातो राना
गज नक्रांनी हय मत्स्यांनी अंतरि गजबजलेला
गरजे तारस्वराने सेना सागर खळबळलेला

घेऊन संगे दौडत सुटला रुस्तुम करवीराला
व्यूह मांडुनी शिवसेना ही सजली संग्रामाला
शिवसेनेला पाहुनि बोले रुस्तुम निजसेनेला :
"कमरबंदगी करून लढावे पुजून रणदेवीला
बलरामासम विक्रमशाली वीरानन रविबिंबे
लखलखती जणू शिवराजांची अनेक ती प्रतिबिंबे.
'पाव पराभव' शब्दघोष हा गर्जत दौडत, घाव
घालित बघ तो तिकडुन येइल तरुण जाधवराव.
सेना आपुली विध्वंसिल ही मनात हुरहुर वाटे
घेउनिया निजसुत हणमंता प्रचंड वीर खराटे

रणासि तुंबळ सज्ज जाहला उपसुन खड्ग कराल
प्रलयाग्निसम गमे भयंकर हिलाल तो कळिकाल
वाघ, इंगळे, पवार, मोठा गोदाजी जगताप
मूर्ति सहाव्या अवतारांच्या उडविति बघ थरकाप.

गनिम घाला अवचित घालिल जिव होई वरखाली
दलादलांचे व्यूह मांडुनी दक्ष रहा भवताली.
शूर घाटगे सर्जेराव नि घोरपडे संताजी
सांभाळू द्या तळ अपुला चहुबाजूंनी रणगाजी.
मध्यभाग मी रक्षिन, रक्षिल फाजल वामविभाग
आणिक योद्धा मालिकहि मोठा रक्षिल दक्षिण भाग.

महाप्रतापी अजीजपुत्रा सन्यामागे धाडी
मुल्ला ह्यास घेई सहाय्या रक्षिल तोहि पिछाडी."
इकडे शिवतळि वीररसाचा सागर उसळून राही
रण रचनेच्या आज्ञा सुटल्या तशाच राजाच्याही.
जाऊ द्या अधिपति नेताजी फाजलखानावरती
मुल्ला हयास रोखुन फोडिल वाघ तयाची घाटी.
खराट पांडर डुक्कल रिपुची बगल विनाशिल उजवी
विध्वंसतील दोघे जाधव हिलाल बाजू डावी.
करिल इंगळे चालून जाउन मलिका शीर्ष–विहीन
आणी महाडिक मानी माझा उडविल फत्तेखान.

शूर सिधोजी पवार मिळविल धुळीस सादाताला
बळी, घाटगे, घोरपडेही पडतिल गोदाजीला.
आघाडीवर तळपत राहिल ही माझी तलवार
आणिक सेनानायक रुस्तुम करीन मी रणि ठार.
मृदंग कर्णे ढोल नि दुदुंभि कडकडली रणशिंगे
रणघोषांनी थरथरली शिव–सिंहाचीहि भुजांगे
सीमापारचि उचंबळोनी सेनासमुद्र लहरी
पूर्वापर जलधी सम भिडल्या परस्परांशी समरी.
राजरत्न निजखड्ग तडित्सम फिरवि दिशांना चारी
असिपत्राच्या तेजाचे त्या कोंदण शोभे भारी.

यवनगजांच्या उकडे गंडस्थळी मदाची हुंडी
लुटावयाला सुटल्या वेगे शरभृंगांच्या झुंडी.
यवन चर्चुनी सर्वांगाभर लाल उटी रुधिराची
घेउ लागले शरशय्येवर निद्रा अमर सुखाची.
रणयज्ञी बळी पडता पसरे धूम्रछटा ती काळी
त्या योगे का यवनांची द्युति काळवंडुनी गेली ?
जेत्या मरत्या जिवांचे रणि उठता निनाद घोर
म्लेंच्छ धावले दिशाश्रया पार त्याही पळाल्या दूर.
नेताजीला पाहून फाजल लागे पळु शिखंडी
गाउ लागला पलायनाच्या जणु नाटयाची नांदी.

यवन पलायन नाटकातली सोंगे खुलली सारी
परि उपनायक त्यामधि शोभून दिसले भारी.
बघुन शिपाई जिव घेउनिया पळून जाता जो तो
सावरिती रण रुस्तुम कसले ? पुराच बावरला तो.
सांडुनि शस्त्रे पळुन गेला फाजल घाई घाई
सादाताला समरी त्राता मुळीच उरला नाही.
दिले टाकुनी रणी धन्याने म्हणुनी मनि चिडलेले
अदिलशहाचे गजहय राजाश्रयार्थ धावत आले.
भिउन पळाला रुस्तुम अगदी राजाच्या जवळून
न्यून न यावे कुलाशीलाला म्हणुन दिले सोडून.

उभे टाकुनी शिवसिंहाने पन्हाळगडाच्या माथी
नजर फेकली अदिलशहाच्या अफाट मुलखावरती.
तीच शिवाज्ञा जाणून सुटला सरनोबतचा बाजी
शिवरायाला झेलायाला खडा सदा नेताजी.
कवठे कुंडल मिरज सांगली कागल कुरुंदवाड
धारवाडची बडी गढी ती तसेच ते मुरबाड.

कोल्हापूर नि रायबाग अन् अथणी आणि तिकोटे
नेताजीने सर केले हे मुलुख छोटे मोठे.
असा चालला चिवट करारी कडवा मराठमोळा
मिळेल तसला हिरवा पिकला खाउन आला पाला.

नेताजीच्या मुलुखगिरीचा असा सपाटा चाले
विजापुराचे धावे तिकडे पुरे दणाणुन गेले.
भरे कापरे विजापुराच्या सिंहासनास देख
म्हणून अल्लीशहाहि मारी दिल्लीकराला हाक.
वेळ लागला दिल्लीला ह्या हाका पोचायाला
परि दम कुठला नेताजीच्या तुफान घोडदळाला?
विजापूराच्या दरबारातिल जमले सर्व वजीर
पन्हाळगडचा विडा मांडिला उचलेना कुणि वीर
बंडखोर तो करिल अपुल्या या कार्याची सिद्धी
म्हणुन आणिला बोलावुन बलाढ्य जोहर सिद्दी.

माफ करोनी अलीशहाने त्याचे हजार खून
गौरविले ही किताब देउन तया- 'सलाबतखान.'
प्रचंड सेना समूह घेउन सिद्दी जोहर सुटला
शिव सिंहाच्या पंजामधल्या पन्हाळगडाला आला.
पूर्व वेढिली जोहर रुस्तुम फाजल सरदारांनी
पश्चिम अवळून धरिली बाजी मसुद सादातांनी.
दक्षिण–उत्तर दिशा वेढिल्या करुन छातिचा कोट
ऐसे दल बळ बांधूनि केला उभा दुजा गडकोट.
गडाभोवती खडे ठेविले अगणित घोडे हत्ती
हत्ती कसले झुलत्या डुलत्या प्रचंड पर्वत–पंक्ती

उंच गडावर गरुड बैसला न्याहाळित भवताली
आणि तयाचि शिकार करण्या जमल्या चिमण्या खाली.

हिंमत बांधुन लढला सिद्दी सरले महिने चार
तरि गिरि शिखरी बसलेला तो गरुड खाइ न हार

परंतु ऐका रसिका देउन देवगिरिकडे कान
स्वारीचे शिव मुलखावरच्या शिजले कारस्थान
'धाव दिल्लीच्या देवा ! तु तरि धाव' ओरडे अल्ली
त्या हाकांनी आता अवघी दिल्ली जागी झाली.
दिल्लीपतिने झटपट आणिला अपुला बलाढ्य मामा
आणिक गिरितल सेना देउन धाडियले शिव-धामा

रणगर्वाने फुगलेले ते मोगल दल घेउन
कलीयुगिचा तो रावण सुटला प्रचंड शास्ताखान
शिवमुलखावर तळपत आली मोगलची तलवार
सुटले दौडत सत्याहत्तर हजार घोडेस्वार
हत्ती घोडे नि तोफखाना खजिना असा अपार
आली उसळत खवळत सेना-सागर अपरंपार.
मेघ गडांना करुन भिववितो भद्र जातिचे हत्ती
पदातिमाजी आघाडीवर गर्जती बक्सर जाती
शिवराज्याची शीव गाठुनी अल्लीशहाचा त्राता
भीमा उतरुन आला जो चतुरंग चमूचा शास्ता

देवायतने विध्वंसुनि मठ-मठचा मोडिल्या साऱ्या
बागा नगरे उजाड केली संहारुनि अधिकाऱ्या
पडला अडकुन पन्हाळगडला शिवराजा पाहून
किल्ला त्याचा हा ना तो जिणि रणि गडकरि पकडून.
भव्य तयाचे होते किती ते अवघे तंबू दोन !
हत्ती लागत तया सहाशे करावया ने आण !
तीस गजांची लांब, कापड भरजरतारी उंची
कनात होती मजबूत मोठी दहा गजांची उंची.

विशाल ऐशा शिवराभवती कितितरि तऱ्हेतऱ्हेच्या
थाटवि कृत्रिम फुलझाडांचा सुंदर बागबगीचा

रोषणाइ ती बघून दिव्यांची गमली कुणा दिवाळी
का त्या लाजून तारामंडळ आले उतरुन खाली ?
अशीच इतरहि उमरावांनी सजविलि अपुली शिबिरे
नव्हत छावण्या, परि गमली ती गजबजलेली नगरे
हत्ती घोडे खाद्ये पेये अद्‌भुत तो इतमाम
शिबिर कोठले सम्राटाचे सजले दुसरे धाम.
नित्य जागत्या तलवारींची रांग उभी भवताली
नाजूक सुंदर दासी झुलती तशाच हाताखाली
आवेशाने जोहरला मग लिहिले पत्र तयाने–
"ठेव शिवाजी कोंडून पन्हाळि असाच संगिनीने."

सुपे सासवड पुणेहि गेले इंदापुरही पडले
प्रदेश चाकण चौऱ्यांशीचे ते शत्रूने गिळले.
राजगडावर वृत्त वृत्त हे जिजाबाईला कळले.
प्राण पन्हाळी अडकुन पडला काळिज करपुन गेले.
'कुणि सरदारहि शिवा न सोडवि ?' असा मनी कल्लोळ
उसळुन उठले क्रोधाग्नीचे शोकाग्नीचे लोळ.
राजगृह न ते अग्न्यागारचि भासे तिज निजधाम
वर्णु कसे मी ते आईचे जळते अंतर्याम ?
भालप्रदेश अर्धचंद्रसम ! मुखमंडल जणु सूर्य
नेत्र अग्निसम भृकुटी करिती शरसत्राचे कार्य.

हृदयी तियेच्या सुतविरहाचा चाले तीव्र विलाप
पाठीवरती गडबड लोळे काळा केशकलाप!
स्फुंदत होती रत्न कंकणे शिव विरहाच्या शोके
रक्तकमळी शिरि का ते उकळे क्रोधभराने डोके ?

कर्णकुंडला गमले अपुला जिव टांगल्यावाणी
ललाटी होती गाळित रत्ने निजनयनातुन पाणी!
कोपभराने शोकभराने स्पंदत होते दंड
आवरत होते अति अदबीने तयास बाजूबंद

कनकशुक्तिसम कर्ण प्रवालसम अधरहि ते लाल
पद्म करांगुलगण का उफाळति अग्निशिखाच विलोल ?
गमे नासिका लड सोन्याची अनली पिवळी लाल
तशीच लालट झाली वदनी कुंदकळ्यांची माळ!
उसळती नयनी ज्वालामुखिचे ज्योतिष्कणही लाल
चिंता मेघ व्याप्त मुखी करि जिव्हा चपला खेळ!
मातृमूर्ति अशि चिंता-शोक-क्रोधे दिसली व्यग्र,
प्रगट जाहली नृपमंदिरि का अग्निदेवता उग्र ?
मेघडंबरी गगनि पसरली मंद दिसे मध्यान्ह
पदकमली परि अधिकच विलसे राजलक्ष्मीचे चिन्ह.

स्थितीत या तिज निमिष निमिष ही प्रदीर्घ गमले अब्द
त्यातहि निजमंत्र्यांना कथी ती उपदेशाचे शब्द.
अंतरि भडके वडवानल तरि सागर दिसे प्रशान्त
तशीच राहून शांत करी ती चतुर बंदोबस्त.
जगदंबेशी भाषण करुनी जी स्वर्गाचे द्वार
प्रार्थनाहि ती भक्तियुक्त मनि करि तो वारंवार.
अशात जिंकुन नेताजी तो शाहपुरासम ठाणी
राजगडावर शिवराजांच्या आला वसतिस्थानी.
शिवबासाठी अंतर्यामी तळमळणारी माता
समोर दिसता भीत भीत तिज मुजरा करि तो नेता.

दृष्टीस पडता शिवशाहीच्या गडचा बुरुज थोर
वीर-अंबेच्या अंतरि आला उसळून रणरस घोर!

वीज कडाडे तशि बोले त्या सेनापतीस मोठ्या
"घेउन काळे तोंड इथे तू कशास आला नेत्या ?
पन्हाळगडला टाकुन माझा पंचप्राणचि आज
झुकला इकडे तू तुज वाटे मनास काही लाज?
धन्यास संकटि टाकुनी आला धरुन जिवाचा लोभ
महाशुरता असली होवो तुझी तुला लखलाभ !
कुणी ठेविले सांगशील का नाव तुझे नेताजी ?
वृथा मानिले मनि तुजला मी माझा दुजा शिवाजी
मिळून सगळे लपा पळा वा खुशाल खेळा येथे
पन्हाळगडला फेकुन घोडा जोहरशी मी लढते.

आल्या सरसा दे मज ती तव शोभेची तळवार
आणि बांगडी घेउन माझी घाल करि हळुवार
घोरंदर रण कितीही झाले तरि त्या युद्धातून
कटारिकेने शिर जोहरचे आणिन मी कापून !
शिवबा वाचुन दहा दिशाही दिसती मजला शून्य
देशोद्धारक सत्पुत्राविण दिसे न काही अन्य."
असे गर्जता सात्विक कोपे निर्मळ चरिता माता
बोल जिव्हारी लागुन बोले जिव कळवळुनी नेता.
" सह्याद्रीचा स्वामी तो करि पालन विश्वाचे ही
साह्याची त्या यत्किंचितही कधी अपेक्षा नाही.

अंगा अंगुलि लावायाला माय कुणाची व्याली ?
त्यात भवानीमाता त्यावर सदाच पाखर घाली.
लोभ जीवाचा धरि मी ही का तव मनि आली पाल ?
चिरून आई तलवारीने हृदय पहा हे खोल.
मनी मानसी हनुमंताच्या जशि रामाची मूर्ती
तशीच अंतरी दिसेल माझ्या निशिदिन ती शिवमुर्ती.

होई शिवाज्ञा म्हणून फेकला घोडा विजापुराला
भिववून ते पुर आलो आता मोगल माराग्याला
मोगल दौडे अपुल्या मुलूखी मुरगळ मान तयाची
धनीच सांगे म्हणुनी आलो घेउन भाला बरची.

लोभ जिवाचा अणूभर नाही ही अंबेची आण
जसा तुझा तो तसाच माझा शिवबा पंचप्राण !
करपवि माझा जीव इमानी आग तुझ्या शब्दांची
आई ! तुज का वळख न पटली अजून या हृदयाची ?
नाहि जळाचा घोट घेतला घासहि नाही गिळला
तोच मिळाला हा अंबेचा प्रसाद ऐन भुकेला
पदरी बांधून तो नेताजी आला तसा निघाला
टाच मारिता क्षणात पाहिल माझा अश्व पन्हाळा.
राज्यविमोचन सुकर कराया जीव उतावीळ झाला
स्वप्नी ध्यानी मनि शिवाजी; पाहिन कधि मी त्याला?

सैनिक अपुले घेऊन रिपुशी झुंज इथे तू आई
गड हे घ्याया मोगलच्या ही मनगटि ताकद नाही.
मुजरा करुनी घोड्यावरती तशिच टाकिली झेप
ढाल फिरंग नि बाहूवरचा सावरिला निजचाप
अश्वमुखावरि हात फिरवुनि पुन्हा पुन्हा कुरवाळी
ठेवुनि निजमुख मानेवरती कानगोष्ट ही केली.
" चपल विक्रमा रुंदव छाती, घे गति बिजलीवाणी
राजावरती कोसळली बघ अस्मानी सुलतानी.
नाही पाहिली कधी कुणी अशि दाव तुझी चपळाई
भुमिस खूर-स्पर्श न करिता पन्हाळगडला नेई.

शब्द ऐकता अश्वहि लागे थै थै नाचायला
टाप ठरेना खिंकाळोनी दे हुंकार धन्याला.

क्षणात मारुन टाच सोडला बलाढ्य आपुला वाजी
दौडत सुटला पन्हाळगडला नेताजी रणगाजी.
स्वार दिसेना अश्व दिसेना हरले महेंद्रचाप
पडे जगाच्या कानी नुसती ती घोड्याची टाप.
शूरवीर तो हिलाल त्याचा महाप्रतापी बेटा
वाह वाह ही सर्व घेतला युद्ध धुरंधर मोठा.
थोर कुळातील विक्रमशाली त्या सरदारामागे
षड्विश्व सेना सुटली दौडत विद्युत् वेगे

जोहरचे ते सिद्दी भालेवाले पट्टेवाले
ढाल फिरंगा विशाल धनुही घेउन धावत आले.
ती शिवसेना व्यूहावर ती जोहरच्या आदळली
खणखणली रणशस्त्रे फारच मोठी दमक झाली.
महाबाहु तो वाह वाह म्हणि शत्रुव्यूही घुसला
रिपुवीरांचे वक्ष विदारित रक्तविभूषित झाला.
हिलाल सुत तो जवान मानी लढता झाला लाल
रणात शर कर चापल्याची केली खूप कमाल.
कारंजीही हजार फुटली रक्ताची त्या देही
तनुवर जागा व्रणाविना बघ तिळभर उरली नाही.

अश्वावरुनी भव्य वीर तो अखेर पडला खाली
थोर दयाळू भूमाता त्या बाहुमध्ये कवटाळी.
पकडुनि रिपुंनी शुद्धिरहित त्या छिन्नभिन्न शरिराला
विव्हल झाल्या त्या वीराला सहर्ष शिबिरी नेला.
नेता अपुल्या आत्म्या उघड्या नेत्री हिलाल पाही.
लढला त्वेषे सुसरीच्या माणिक उदरी जाई.

तळहातावर शीर घेउनिया लढला नेताजीही
परि गडावर जाया त्याला वाट मिळाली नाही.
झुंज खेळता थकून गेल्या नरविरांच्या पंक्ती
काळझोप त्या घेऊ लागल्या रक्तनदीच्या काठी

धरणीपासुन लोट धुळीचा अखंड गगनी भिडला
स्वर्गा जाया वीर करिति जणु तयास सोपानाला.
पाहुन योद्धा नेताजीसम असा पराजित होई
शांत मनाने सुटकेची नृप करी भली चतुराई.
नेमुन रणपटु गड रक्षाया त्र्यंबक भास्करजींना
बोले राजा सभेत रात्री जमवुन सगळी सेना :
चैत्रापासुन झाले महिने चार दीर्घ युद्धास
आणि पातला शुभश्यामल आता श्रावणमास
तरीहि आपुला शत्रू अबाधित शैलतलावर राही
तलवारीला तुमच्या जोहरशिर ते नमले नाही.

नेताजीचा मोड जाहला उठली वार्ता लोकी
किंतू रिपु-परिधि अजुनही तसाच बळकट राखी.
पुण्यात माझ्या मोगल घोडा घालितसे थैमान
म्हणुनी निघतो तिकडे आता पन्हाळगड सोडून.
भिस्त तुझ्यावर आता रोखुन धर जोहर बलशाली,
त्र्यंबक भास्कर ! गड हा देतो तुझ्याच हाताखाली."
बोलुन इतुके तसाच गेला वसतिस्थानि निघुन
दूताकरवी दिधला खलिता जोहरला धाडून.
" वीर जोहरा, लढाइची तू मजला दिली समासी !
परि पळभरही वेळ न मजला इथे रहावयासी.

पाहुन छोटे आक्रम-विक्रम माझे कोठे कोठे
अदिलशहाने मागविलेले मोगल रागिट मोठे.

दीन-दीन त्या घोर गर्जना घुमवित सिंहावाणी
आडदांड ते घुसले तिकडे दौडत माझ्या रानी.
म्हणून मजला घोडा फेकून तिकडे जाणे आहे
युद्ध तुझ्याशी खेळायाला सेना माझी राहे.
मीच तुझ्याशी द्वंद्वयुद्ध वा खेळावे ही मौज
पहावयाची असेल तर तू मुकाट ठेवुन फौज.
यावे गिरितळी ह्या युद्धाचे पाळुन सर्व रिवाज
शस्त्रास्त्रांचा रणमर्दाचा चढवुन सगळा साज.

आनंदाने लढु दोघेही खड्ग करी घेऊन
बहारिची ती मौज आपुली पाहिल सैन्य दुरून."
विस्मित झाला, स्तिमित जाहला जोहर मनात भ्याला
शिवसिंहाच्या ऐकुन असल्या बेडर डरकाळीला.
लगेच आज्ञा जोहर सोडी - राखुन करडी शिस्त
" घेरा बळकट ठेवुन रात्रंदिन घालावी गस्त."
वेढ्यामाजी कुठेहि गिरितळि तीळभर अंतर नाही.
असा शिपाई मगरमिठी मग गडास मारून राही.
आणि पहारे चौक्या ठेवुन जोहर खडाच राही
मार्गहि नव्हता बाहिर जाया पिपीलिकेसहि काही.

अंगि सिद्दिच्या द्वंद्वरणाचे नव्हते मुळी अवसान.
स्वीकारीना तो दोघांतिल लढाईचे आव्हान.
पुढे पन्हाळा उडवायाला उपाय नाना केले
त्यासाठी त्या अंग्रेजांनी दिलेहि कुलपी गोळे
परी मधल्यामधि लटपट झाली! कारस्थानहि केले!
रुस्तमने ते सगळे गोळे मधे गिळंकृत केले
शिवरायाने औदार्याने त्याला रणि दिले जीवदान
म्हणुन राखिले गोळे दडवुन त्याने थोर इमान.

जोहरने किति हल्ले करुनी केला रणकल्लोळ
बुरुज फुटेना, तटहि तुटेना: प्रयत्न झाले फोल.

अंती थकली जोहर सेना रणी बसेना मेळ
त्यातुन होता तरीही तोहि भयंकर बरसातीचा काळ.
जाणुन हे शिवदूत तहाचे हाती धरुन निशाण
रिपुशिबिरामधि आला खाली लगबग गड उतरून.
आणि बोलला जोहरला तो– " अमुचा श्री शिवराया
किल्ला देऊन तुमच्या स्वाधिन ठरविल शर्ती साऱ्या."
येउन नंतर सिद्दिस वदली समक्ष राजस्वारी:
"देईन किल्ला उद्याच तुजला खरा न मी तव वैरी
अवघड गड घे तूच जोहरा स्वतःच आपुल्यासाठी
अथवा चाहिल तर तो बांधी अदिलशहाच्या गाठी.

अदिलशहाशी तू कुठला रे बसशिल एका सूत्री
मग त्या पायी का बिघडावी तुझी नि माझी मैत्री ?"
पर्जन्याचे यौवन उसळे मुसळधार बरतुन
बिजली बादल गर्ज कडकड डोंगरखोऱ्यातून.
याहि कारणे जोहर गेला रणास कंटाळून
बोल तहाचे ऐकुन गेला अतिशय आनंदून.
'उदइक येतो' सांगून गेले राजे गडा निघुन
जौहर सैनिक धुंद जाहले करुन मदिरापान.
वन तिमिराने नभ मेघांनी झाले काळे काळे
तरी गडाहुन राजे रात्री पहिल्या प्रहरी निघाले.

प्रयाणसूचक मंगल मधुर ध्वनि गिरिशिखरी होई
मेघनाद का दुंदुभि रव ते रिपुस कळले नाही
गिरी गर्भातुन रिपु शिबिरातून शिबिकेमधुन गेले
नवल नव्हे का शूर सहाशे पदाति संगे गेले.

राज्य नभाचे भरात आले होते जरि ते व्योमी
तरी हेरांनी ठेविलि होती हेरुन ती वनभूमी
प्रासादांगणि इंद्रही विद्युद्दीप आपुला लावी
चंचल चपला ज्योत तयाची प्रवास पथ त्या दावी.
त्या मार्गाने विशाळगडला शिवराजा जायाचा
म्हणुन तेथिल वनप्रदेशही नटला सगळा साचा.

निसर्गराजा राजस्वागत करण्या रानोरानी
सुमन सुशोभित लतालतांच्या उभवी उंच कमानी.
शिंपिति सुमने गुलाबपाणी राजशिरी वनवासी
कुडाकेवडा कुंद कळंबहि सुखविति राजमनासी
प्रेम कौतुके पहावया त्या दख्खनच्या वाघाला
लहानमोठ्या व्याघ्रांनी पथ भरून सारा गेला.
पथ तो आले वारुळातुनि ते फणि मारायला
धावत आलेल्या मोरांच्या टाहोंनी घुमलेला.
स्वागत गीते गावयास तो निर्झर निर्झर आला
त्यांच्या मंजुळ आलापांनी मार्ग निनादून गेला.

असा चालला दौडत राजा विशालशैला वेगे
हेरांकरवी कळता हे तो जोहर बोले रागे-
''पन्हाळगडला दिधला होता वेढा मी चोगीर्द
कसा पळाला हाती देऊन तुरी मराठा मर्द ?
नृप कोंडाया केला होता किती भगीरथ यत्न ?
ग्रंथि मारिल्या थैलीतुन परि गळून पडले रत्न
काय सांगु मी अदिलशहाला असल्या कृष्णमुखाने ?
झाले आता माझे मजला नबाब शास्ताखान.
हर हर देवा! कसा निसटला शत्रु व्यूहातून?
दौडुन मसुदा पाठोपाठचि आण तया पकडुन.

क्षणी पेटल्या चंद्रज्योती धडधडल्याहि मशाली
आणि निघाली जोहर सेना शिवशोधा अवकाळी.
रात्र चांदणी परि मेघांनी अंबर झाले काळे
तशात डोंगरखोरी कडकड वीज भयंकर चाले
मसूद–सेना गांगरली ते ऐकुन नादनिनाद
अपरात्रीची भीषणता ती वाढविती पडसाद.
मार्गि जलाशय कोठे कोठे अवघड मोठे घाट
तशात तिजला ठाऊक नव्हती मुळीच डोंगर वाट.
मसुदाचे हय कोठे रुतले स्वारासह चिखलात
तसे पदातिहि अडकुन पडले कठीण शेवाळचात.

विशालगिरिला पोचायाला अवधि मिळला देख
शिवरायांनी रचिलेली ही गंमत रसिका, ऐक
मिरवित ठेवी शिवसेनेचा विभाग मार्गी दुसरा
त्यात सजविला एक शिवाजी, कोण तयाचा तोरा !
पकडून शिबिका रिपुसेनेने यवन तळी ती आणली
हर्षे जोहर बघुनी ती शिवमूर्ति सावळी काळी !
जोहर हर्षे परि मनि थरथर कापे त्याची काया
समोर येता सह्याद्रीच्या सिंहाची ती काया.
हातावरती तुरी देउनी फसवुन गेला राती
हरामखोरा, अणुभरही तुज लाज न वाटे चित्ती ?

" उभाच का रे मुकाट मसुदा, उडव तयाचे शीर,
क्षण न घालवी." जोहर बोले भ्याला अपरंपार.
"लाज वाटते मज गरिबाची शिबिका तुम्ही वहावी.
खरा शिवाजी मी न ! तयाचा त्याच नावचा न्हावी."
केली जलाविण गुळगुळीत त्या कारागिरिचे नाव
कशास येणे कवनी ? रसिका, ठेवशील मज नाव.

सोंग शिवाचे तिथेच टाकुन जोहर सेना दौडे
परत शिवाच्या पाठिमागे त्वरित सोडिले घोडे.
निशा संपली, रविराजाची स्वारी क्षितिजी चढली
समोर बघता मोठी घोडखिंड ती आली.

शिवराजाने केले होते सेना विभाग दोन
एक ठेविला मिरवित दुसरा बसला खिंड धरून.
त्या खिंडीच्या दुसऱ्या तोंडी रिपूस यावया कोप
होति डागिली शिवरायांनी बाजी प्रभुची तोफ
अदिलशहाच्या सैन्याचा क्षणि लोंढा घुसला तीत
तया घाली बाजी उभवुनि तिथे छातिचा कोट.
ओलांडाया खिंड यत्न किति केले आटोकाट
मसुदाने, परि बाजीनेही रणात केली शर्थ.
अभेद्य वक्षस्थळी झेलले तलवारीचे वार
टाकु न देइ पाउल तिळभर रिपूस खिंडीपार.

स्वामिभक्त तो अद्भूत त्याच्या जिवासनुरली शुद्ध
केले त्याने शिवबासाठी तुफान तुंबळ युद्ध.
लढता लढता रणि रक्ताने सगळी काया भिजली
का उसळे तत् शौर्याग्नीच्या ज्वालांची ती लाली ?
पाहुन ही त्या महाप्रतापी झुंजाराची झुंज
डोळे दिपले इंद्राचेही सहस्त्र तेजःपुंज.
दिनेश बोले तो गिरिकंदरि शिरति न करहि तयांचे
घोडखिंडिमधि मग तळपति हे कर कुठल्या सूर्याचे ?
क्षणि दिनमणिची का इंद्राची दृष्ट लागली भाली
का रिपुची उरि लागुन गोळी बाजी पडला खाली?

पडता पडता विशालगिरिहून ऐकू आले बार
आता मरतो सुखैचि ... बोले ... होइ धनी बिनघोर.

बोलुन इतुके मुदे ठेविला देह जरी खिंडीत
मारि भरारी राजरक्षणा आत्मा पाठोपाठ !
असा दौडला विशाळगडला शिवबा अंधारात
पाच योजने क्रमून गेला तो सप्त प्रहरात!
खिंड मारुनी मसूदाचीही सेना दौडत गेली
गर्जत गर्जत वनावनातुन विशालशैला आली.
पालीचा नृप शृंगाराचा राजा दौडे तेथे
सैन्य घेऊन करावयाला शिवाजीचा निःपात

मागे लागुनि रिपुसेनेचे राहू केतु सतावी
शिवचंद्राला विशालशैली ग्रहण घेऊनी लावी
मस्तक राहू, धड केतू, जो बनवी मारुन दैत्य
त्या विष्णुस ती छलके धरुन गिळतिल हे का सत्य ?
झटपट सीमा प्रांतावरचे सैन्य आपुले तेथे
दूरदृष्टिच्या चतुर नृपाने आधिच आणिले होते.
गिरिशिखराहुन शिवसैन्याचा सुटला झंझावात
गिर्यारोहणि करू लागला रिपुची वाताहात.
अडवुन बोले शिव त्या–गिरिवर नाहि जात ही वाट
फिराच मागे, वाइट यमपुरिला जाते थेट!

तरुवर पाहून जो गर्जती विद्युत पयोद
असा भुजंगा मारीन करितो गरुड गंभिर नाद.
तसे मराठे गर्जति करुनी म्लेंछांचा बीमोड
शौर्याग्नीने विशालाद्रिचे चेतवुनी रणकुंड.
शृंगाराचा साज शैलभू टाकून हिरवागार
ल्यालि शीर्ण-कर-पवशीर्षाचा लाल भयद शिणगार.
मसूद आला परत पन्हाळी धन्या जोडिले हात,
'इथे कसा तू ?' जोहर पुसतो उपहासेचि पहात.

त्या सिद्दीच्या नयनी मसुदा बघवेना ती तिणगी
बहुत घाबिरा होउन बोले-सोडुन पडली नांगी.

आलो नाही विशालगिरिहुन युद्धातून पळून
आलो अपुला मुठीत धरुनी जिव वैकुंठाहून.
रण भीषण ते रणमर्दाने खेळियले ज्या तो ही
बोले प्राण बचावुन आलो हाच पराक्रम होई.
घोडा उडवित सह्याद्रिप्रभु राजगडी मग जाई.
ठेवीच डोई पुत्रदर्शना तुज जननीच्या पायी.
दुंदुभी वाजु लागल्या राजगडाच्या शिखरी,
दिल्लीपतिचा मातुल झाला मनात कातर भारी.
त्रास टळेना शाइस्त्याचा जरि झाली वरुषे तीन
म्हणुन शिवाने ऐका कसली मसलत रचिली छान!

एके दिवशी शाइस्त्याहाती आला एक लखोटा,
लेखांतिल त्या बाण बहाणा भेदित वेधित होता.
शुर इमानी मूळ असे मी शिवाजीचा सरदार
त्याच्यासाठी लढलो निशिदिनि विसरुनिया घरदार.
भर दरबारी वा करिताना रिपुची काटाकाट
कुठल्याही रणि शिवराजाचा होतो उजवा हात.
नाहि मानिली भूकतान वा कधि कष्टाचा केवा
नाही केली त्याच्यासाठी कधी जिवाची पर्वा.
कधि भीषण रणकंदनि घालुन इरेस माझे प्राण
वार शत्रुचे झेलुन अंगी जपली त्याची जान.

असा इमानी शूर शिपाई मी किल्ल्यावर एका
असता कानी आल्या राती दरवाजातुन हाका.
"ए हैबति ! ए दौलति ! येरे धावत दारी राजा.
ओळखे न का हाका मारी तव मुलुखाचा राजा ?

दौड मारिता रात जहाली जीवहि थकला माझा
शिवराजा मी ! या किल्ल्याचा उघड मला दरवाजा.
कुणी गडावर नाही का ? का मेला किल्लेदार ?
वरडून हाका लाख मारिल्या तरि कुणि उघडि न दार.
गनीम माझ्या पाठिस बाका ऐकू न ये का हाक ?
खोल दार ना तरि जिवाला मुकशिल रे हकनाक.

कापु लागला पाय उचलता मनि शिस्तीचा धाक
विचार कसला करणे येता शिवराजाची हाक,
अडसर सारुन झडकरी काढिलि लोहशृंखला जाड
अंतरि आला नृप परि त्याच्या नाहि जिभेला हाड.
दार उघडता क्षणि अंगावर आला चवताळून
वाटे मस्तकी पडली बिजली जणु गगनी गर्जून.
घाली मोगल माझ्या मुलुखी रात्रंदिन थैमान
म्हणुन सोडिले, निमकहरामा, होते ना फर्मान ?
सूर्य डोंगरापल्याड बुडुनी पडताक्षणी अंधार
नाही कुणाही उघडायाचे कुणी किल्ल्याचे दार.

बाप तुझा तो मोगल माझ्या मुलुखि धुमाकुळ घाली
तरि राजाची ती आज्ञा तू तुडविली पायाखाली.
कर पद बांधून कड्यावरोनी, देऊ का ढकलोन !
अथवा माझ्या राज्यातून या क्षणि देऊ का हकलून ?
मनी आगीचा भडका उडला बोल जिव्हारी घुसले
दुष्टाने त्या कैसे केले हे काट्याचे कोल्हे ?
असा गुन्हा तरि काय जाहला ? शिक्षा कसली केली ?
उलट्या सुलट्या फर्मानांच्या कोलांट्या किति खेळी.
असा चढवुनी खासा उलटा शिस्तीचा गळफास
केला जगि या सरदाराचा जन्माचा उपहास.

राजाज्ञेने दार उघडले हे का झाले पाप?
असेल तर ते घाला कुणिही माझ्या पदरी माप.
सूड तयाचा उगवायाचा मनि करुनी निर्धार
दया भाकुनी करुनि घेतले मी मज सीमापार.
क्षणी प्रतिज्ञा केली मी शिवराज्य–रंगभंगाची
त्यासाठी मी करिन इमाने खिदमत बादशहाची.
रान जिवाचे केले माझ्या त्याच्या जीवासाठी
परंतु आता बत्ती लागो त्याच्या पोटीपाठी.
मनात माझ्या शिवनाशाची आता एकच आस
नाही दुसरा मज कसलाही जगात मायापाश.

म्हणुनी विनंति या सरदारा अपुल्या पदरी ठेवा
मोगल दौलत सांभाळुन मी करीन अपुली सेवा.
खाविंदांनी खरिच पहावी माझी सत्त्वपरीक्षा
नक्षा उतरुन करिन शिवाच्या मुलुखाची मी रक्षा.
असा परस्पर शिवनाशाचा मोका जुळुनी आला
म्हणून शास्ता हरवून गेला परि मनि शंकित झाला.
परंतु आले सरदाराचे अर्जावरती अर्ज
म्हणून तयासी सोपविले शिव-संहाराचे काज
आणि शिवाच्या मुलुखाचा किति केला त्याने नाश
प्रसन्न झाला शास्ता बघुनी ती राखेची रास.

शास्ता विक्रम बघुन जिवाची दुनिया करी बहाल
त्यास नेमिले रक्षायाला अपुला रंगमहाल.
खडा पहारा सरदाराचा या ठेवुनिया दारी
शांतपणाने शास्ता निजला रात्री अपुल्या शिबिरी.
सरदाराने हेरांकरवी घेउन इकडे गाठी
नृपास होते बोलावियले त्या ठरलेल्या राती.

तांब्राचे दळ थोर म्हणोनी चार शंकडे शूर
आले घेउन राजे तेथे झटपट पायउतार.
जीवाला जिव देणारे करि कडवे वीर पसंत
सवे घेतले नेताजी, चिमणाजी, मोरोपंत.

अष्टकलांचा चैत्र-चंद्रमा सोडुनी गगनी गोल
गेला रजनीदेवीवरती घालुन काळी शाल.
रत्नखचितसा निळसर शालू अंगी पांघरलेली
विश्वमंचकी रजनी देवी निवान्त झोपी गेली.
काळोखाचा दरिया पसरे भलता त्याचा जोस
तारामंडळतेजाचा वर उसळत होता फेस.
कापु लागल्या गगनि चांदण्या पाहुन भेसूर रात
रातकिडेही गाउ लागले एकच कर्कश गीत.
सृष्टिदेवीचा खडा पहारा दिनि करुनी शिणलेले
उंच देवडिवाले डोंगर उभे उभे निजलेले.

भयाण राती तसल्या नव्हते काहि करायाजोगे
म्हणुन आपुल्या तिमिरमंदिरी पापहि नव्हते जागे
रणांगणावर नाचनाचुनी रक्त धुंद प्यालेल्या
पोलादाच्या घरात होत्या बिजल्याही निजलेल्या.
सुवर्णमंचकि बादशहाचे मातुल निजले होते.
सुगंधी अत्तरतेलतुपाचे दिवेहि पेंगत होते.
झालरिमाजी माणिक माणिक डोळे मिटून घेई
रौप्यकरंडी निजलि चमेली, गुलाब शेवंतीही.
तसेच निद्रासम्राज्ञीचे गुलाम झालेले ते
भवती चाळीस सरदारांचे कडेहि पडले होते.

अशी शांतता पसरुन झाली सगळी डाराडूर
निजले सेवक, निजले रक्षक, निजले सगळे शिबिर.

परंतु रसिका ! बघ ती एकच सरदाराची स्वारी
वाट कुणाची भिरभिर पाही पुढे उभ्याने द्वारी.
इतुक्यामाजी झेपा टाकित ये शिबिराच्या द्वारी
चोरचालिने सह्याद्रीच्या ती सिंहाची स्वारी.
जिवाजिवाच्या नजरा जमल्या क्षणात पटली खूण
नबाब निजला होता तेथे आले सदरेतून.
सात सात बाडांचे फेरे डेरे डेरीयात
होते तरि ते तलवारीने चिरून शिरले आत.

कोण कोठले लोक तुम्ही ?' हे पुसता कोणी कोणी
कथितिः 'पहारे संपवुनीया आलो चौक्यांवरुनी.
मोडायाला आजुबाजुचे ते बंडाचे खूळ
गेलो होतो बादशहाच्या अम्हीहि फौजेतील.'
आणिक कोठे कोठे पटवुन परवलिचाही शब्द
मध्यरात्रि त्या रिपुशिबिरामधि घुसले ते बेदर्द.
भवतालीच्या सरदारांचे कडे कापुनी शीघ्र
पुढे दौडला उड्याउड्यांनी सह्याद्रीचा व्याघ्र!
किंचित गलगा होता दाया दचकुन उठल्या आत
तयांस कळले चालुन आला गनीम डेरीयात

दायाबाया धावु लागल्या गलगा झाला तोच
गारद केले चिमणाजीने तिथेच खोजे पाच.
बहुत घाबरा नबाब होउन उठला शय्येवरुन
समया आणिक मेणदिवेही टाकियले विझवून.
आणि तडित्सम वेगे गेला निघून शास्ताखान
लालमहाली शिरला मागेतील डेऱ्यांतून.
दिशादिशांतुन विभागलेले शिवसैनिकगण काही
वाड्याभवती शिबिराभवती शिवबाला मिळलेही.

सैन्य ओळखू न ये म्हणोनी युक्त्याकरी अनेक
रचिली होती गमतीची ही त्यातच मसलत एक.

ब्राह्मण अपुले हुशार धाडुन शास्त्याच्या शिबिरात
फितुर केले दोन मराठे करुन ओले हात!
ठरवियले त्या मराठियांनी लग्ने काढुन दोन
छाप्याराती वाजत न्यावी वरात नगरीतून.
लग्ने काढुन ठरल्या दिवशी पडता पहिली रात
नवरानवरी मिरवित गेली काढुन भव्य वरात.
वरातिमागे शिपाइ चढवुन पगडचा शिरि डौलात
शस्त्रे घेउन मिरवायची प्रचलित होती रीत.
अशा वराती मागि चालता करुनी मोठा थाट
इकडुन तिकडुन शिवसैनिक हे हळुच शिरले त्यात.

मिरवित मिरवित पुढे चालले व्याह्यांच्या डौलात
तलवारीवर कधी मिशीवर फिरवित अपुले हात.
लालमहाला वळावयाची होता त्यांची वेळ
सुटले घेऊन मग चोराची लपती छपती चाल.
लालमहाली शिवरायाच्या वाटा गुप्त अनेक
पाकगृहाच्या भिंतीत मुजल्या खिडकीतुनही एक.
वाडा होता शिवबांचा! ते बिनचूक आले तेथ
उकरुन खिडकी करून मोकळी लगेच शिरले आत.
अन् खानाच्या रंगमहाली भिडले जाऊन थेट
थरथरला नखशिखान्त 'मामा' होता डोळेभेट.

बसला होता शास्ता जनानखान्यामध्ये दडून
अंतःपुरि शिव शिरे न ऐशा गेल्या घटका दोन.
तलवारीने शिवबा धरि त्या पुरतेपणि रोखून
संधि साधुनी परि उडि घेई धावत खिडकीतून.

निमिषोन्मेषी नजर चुकवूनी सावज घेई धाव
व्याधाचा परि पळता पळता बसला घसरा घाव.
क्षणात दुसऱ्या गाठित होता शास्ताही निजधाम
शिवबाने तरी धरला होता अचूक दुसरा नेम.
तोच बोलला पुत्र पित्या, 'का झाला डावाडौल?
भिऊ नको तू, पळू नको तू, सावर अपुला तोल.

कसा न जाणिसि कोणासाठी हा उठला कल्लोळ?
चाले केवळ माझ्यासाठी हा हुल्लडिचा खेळ!
द्वंद्वयुद्धि या शिवाजिचो मी करीन बढाई फोल
मी नावाचा शास्ता त्याचा बघून घेतो डौल.''
तोच शिवाची बिजली आली मुरडुन शिरि वरतून
क्षणात केले तिने मुलाचे चिरून तुकडे दोन!
नृपास गमले शास्ता आता गेला पुरा मरून
परंतु शास्ता घेऊनिया उडि गेला खिडकीतून,
तरी तयाची झाली खाशी फजिती, वाताहात
तीन उडाली बोटे! झाला थोटा उजवा हात.

आणि मेहुणा ज्येष्ठ पुत्र यमराजाच्या दरबारा
गेले त्याच्या आवडत्या त्या बिब्याहि मेल्या बारा!
रणाग्नी भडके घडिभर शिबिरी उठला हलकल्लोळ
काळिज सगळच शिबिराचे त्या थरथरती तो काळ!
कधि न थांबले सम्राटाचे चिंतोद्वेगोद्रेक
जिवंत होता तोवर, वाटे असा जयाचा धाक.
जोधपुराच्या त्या राण्याचा घोडा दहा हजार
टकमक पाहत राही भयंकर छापा असा समोर.
नगारखान्या सुटले गर्जत शिवसेनेचे वारे
''नबाब सांगे–दणदण बडवा तुम्ही नगारे सारे.''

प्रचंड दुंदुभिनादाने त्या बधिर जाहले शिबिर
स्तिमित स्तंभित झाले सगळे खानाचे सरदार.
शिवबा शिबिरा लुटून, बाटुन मेला शास्ताखान
घरा निघाले देउन झटपट परतायाची खूण.
दार गडाचे उघडणार तो गुन्हेगार सरदार
गेला संगे परतुन अपुला खरा इमानी स्वार !
" गनीम आला ! गनीम !" शिबिर दणाणुन गेले
शोधाया त्या चहुतर्फांनी लष्कर दौडत आले.
" गनीम कोठे," " गनीम कोठे" गर्जत त्यांच्या संगे
शिवसैनिकही बाहिर पडले सांगुन, करुनी सोंगे.

यवन मराठे मिसळुनी गेले एकच गर्दी झाली
" गनीम गेला पळून " गर्जत शिवसेनाहि निघाली !
सोंगांना त्या फसून केला नाही कुणी विरोध
सैरावैरा ! यवनहि करिती या छाव्याचा शोध.
तोच धावत्या मशालि दिसल्या कात्रज घाटातून
म्हणुनी मोगल फौज दौडली त्यांचा रोख धरुन.
दौड घेऊनी घाट गाठला फौज कुठे नि मशाली?
दृश्य विनोदी पाहुन त्याच्या दिलास खंती आली!
जळते पलिते बांधुन शिंगा सोडियलेले बैल
धावत सुटले होते तेथे बुजून रानोमाळ !

शिवराजाने रिपुसेनेची त्या छाप्याच्या राती
करावयाला दिशाभूल ही युक्ति योजिली होती.
अशि हुलकावणि दावुन करुनी उजेड त्या घाटात
आपण गेले सिंहगडाला निघून अंधारात.
निशा निवळली, तिमिर लोपले दिनमणि आला गगनी
परामृषाला लगबग आले वजीर शास्ता-सदनी.

पाहतात तो खाविंदांची तुटली बोटे तीन
“ जीवावरचे ” बोलति ‘ गेले बोटावरति निभून.”
“ सांत्वन कसले करिता ?” गर्जे नबाब संतापून
‘‘ मर्द संपला ! कायम गेली कट्यार हातातून.

गनीम खाशा डेऱ्यावेरी आला तरी वजीर
नवल वाटते ! मुळि न राहिला कोणी कसा हुशार.
दिलात भरली दहशत ! शिबिरी होई फितवा फार
लव न राहिला आता माझ्या लष्करचा इतबार.
आज अकल्पित नेली माझी बोटे तोडुन तीन
उद्या न जाणो नेइल राजा शिर माझे कापून !
त्यात पुन्हा त्या अधमाचा हा येइ लखोटा हाती
पाहून घेइन दोन दिसांनी तू जरि सुटला हाती.
खास जिवाचा घात करिल जो माझ्या हरामखोर
आता येथे थांबायाचा निघे न मजला धीर!

हाथी घोडा सब लष्करभी लेकर डालीडोली
देर न करके निकलो, भागो, चलो यहांसे दिल्ली.”
तिसरे दिवशी नबाब गेला दिल्लीकडे पळून
भरुन भांडी उधळी राजा साखर हत्तिवरुन.
खबर ऐकुनी बादशहाही अतिशय बेदिल झाला
आणि बोलला स्तंभित होउनि पुनः पुनः या बोलाः
‘‘ तोलदार किति फौज मातुला मी ही होती दिधली
तरी तिची त्या दुष्टाने अशि कशी फजीती केली !
मातुल शिबिरी शिरून मारिले! कसले कारस्थान ?
अरे शिवाजी नव्हेच आदमी बडाच तो सैतान.

मातुलदर्शन वर्ज्य करोनी भाषण सोडुन देई
तयास कधिही येउ न दिले ना घरात भेटायाही.

आणि परस्पर होता तेथे आज्ञा धाडुन देई
" पाउल नगरी न टाकि ! अपुल्या हवेलिमाजी राही. "
अपमानियले बरोबरीच्या वजिरांनाही सगळ्या
सरंजाम नी दौलति त्यांच्या साऱ्या बातल केल्या.
असा जाहला बादशहा मनि भारी गिलेगुजार
जिवास लागे शिवबाच्या निशिदिनी भयंकर घोर.
वजिर बोलले एक वेळ ही घालि दयेची भीक
खाविंदांच्या मातुल-हस्ते न कळत घडली चक.

परतायाचा हुकुम केला का न अम्हां ठाऊक
देउ जिवाला जिव परि पडलो हुकुमाचे पाईक !
चूक तरी कुणि कशी म्हणावी, राजा मोठा द्वाड
कोणावरती येइल केव्हा नेम न त्याची धाड !
खास शिवाजीपाशी आहे जादूटोणा काही
जातो येतो कैसा कोठून कुणाहि उमगत नाही.
शरीर त्याचे असे वायुमय तया असावे पंख
दिसे कसा तो नातरी एकावेळी गावी लाख !
काही केले तरी अम्हां हे उकलत नाही गूढ
वजीर मोठे खरेच, झालो परि पुरते दिङ्मूढ

प्रचंड भरवुन वीरसभा अन् दिल्लीचा दरबार
जयास पाहुन वर लाजावा इंद्राचा दळभार.
बिनमोलाचा बिनतोलाचा बाका शिपाइ थोर
प्रचंड अद्भुत दुर्दम दुर्जय निवडावा सरदार.
खाविंदांना शब्द आमुचा मग टाळीपटकीचा
क्षणात पंजरि पकडुन आणु उंदिर सह्याद्रीचा. "
शब्द ऐकुनी वजिराचे तो शंकात्माही डुलला
डुलला, परि नच भुलला, काही विचार नाही याला.

अता येइ शिवमनि उपटावी सम्राटाची दाढी
म्हणुन शिवाजीराजा मोहिम सुरतेवरची काढी.

झुलवित होता सकल जगाला तो सुरतेचा झोक
सुंदर बंदर होते मोगल साम्राज्याचे नाक.
सौंदर्याचा कळस मानिती यवन आपुली दाढी
तशीच होती सुरत मानिली साम्राज्याची दाढी.
तिच्यासारखे वैभव नव्हते मिळत पहाया कोठे
असले होते सुरत जगाचे उतार बंदर मोठे.
चालत होत्या व्यापाराच्या नौका अपरंपार
गजान्तलक्ष्मी नांदत होती हेच तिचे माहेर.
भव्य किनारा मलबाराचा, गुजराथेचे सदर
भरवित होती निजवस्तूंचा सुरतेला दरबार.

आणि पाटणा, आग्रा, लाहुर, काश्मिर, गोवळकोंडा
सन्मुखचंद्री घोळत होते सौदागिरिचा गोंडा.
एक एक त्या चिनी फारशी अरबी अद्‌भुत चीजा
तऱ्हेतऱ्हेच्या सजवित होत्या तो सुरतेचा सज्जा.
जगात कोठे चीज कितीही अपरूब झाली पैदा
तरी तिचा ही क्षणात नगरी करी खरेदी सौदा.
सुखवित होती नीटनेटकी टापटीप नगरीची
अंगि रेशमी झळकत होती वस्त्रे उंची उंची.
शिखरे भव्य प्रासादांची अचाट सुंदर सारी
नानारंगी कलागुणांनी अंगें नटली चारी.

अंतरि हासत डोलत होत्या फळाफुलांच्या बागा
बघुन लाजल्या इंद्रपुरीतिल सुंदर नंदन-रांगा.
देह सुखाचा, शेज सुखाची नित सोन्याचा धूर!
वाहत होते तिच्या घरोघरि संतत सौख्य-समीर.

जिंकत होती सुरत जगातील सौंदर्याच्या पैजा
संबोधिति तिज सूर्य-पुरी, कुणि मक्केचा दरवाजा.
त्रिखंड गाजत होती असली ज्या नगरीची कीर्ती
तिची लुटाया कोशागारे विचार ये शिवचित्ती.
करावयाला हेरगिरी त्या नगरिस धाडियलेला
शोध घेऊन चतुर बहिर्जी नाइक जासुद आला.

आणि बोलला: चालविली जर तरवारीची धार
पाच पोवळी, कांचन, मोती मिळतील अपरंपार.
दानधर्मरत, लोभी, दुर्जन, सज्जन, गरीब कोण
सर्व माहिती पुरवि बहिर्जी उरवि न कसली वाण.
गुपचुप घेउन निघे शिवाजी लष्कर हजार आठ
सवे घेतले अण्णाजी अन् निळोजी, मोरोपंत.
धावु लागले नामोशाचे पराक्रमी सरदार
झाले त्यांना दिसते केव्हा ते सुरतेचे दार.
शिवरायांच्या घोड्यांची गति होति किती बेफाट
लांब लांबची मारी एका दमात गावे सात.

इतुक्यामाजी 'सबूर' झाला ह्या नृपाचा बोल
तेथुन होती सुरत राहिली अवघी बारा मैल.
तशात होती प्रशांत मोठी ती रात्रीची वेळ
सुभेदारही निजला होता घालुन कानी तेल!

आले तेथे दौडत दौडत दूत शिवाचे दोन
सुभापतीला शिवसंदेशहि सांगितला गर्जुन:
" सुरतेचा तू सुभेदार! परि मी जंगलचा राजा
आलो आहे बघ निकडीच्या काही काधा काजा.
सम्राटांचा 'मामा' आला होता माझ्या मुलुखा
असता पन्हाळगडि मी त्याने लुटिले माझ्या लोकां.

देश जाळिला माझा आणुन घालीबजंग फौजा
आणिक माझ्या प्रतिक्रियेचा करिता गाजावाजा.
तुझ्या धन्याने लुटून नेला मुलूख सारा माझा
अन् हिंदूंच्या जीवावरती चालविता या मौजा.
म्हणून आता निर्वाणीचा हा घे निरोप माझा
भरपाईला खुला करावा सुरतेचा दरवाजा.
धर्म हिंदूचा, द्रव्य हिंदूचे, त्यांचे प्राण स्थान
हरण करोनी जगी मिरविती काढुन वरतो मान.
पाठित काठी तरी शेपटी हलवी तुकड्यासाठी
हिंदू जन्म का त्या खानाचे जीवन जगण्यासाठी ?

असेल मती परधर्माविषयी अल्पही उदारता ती
तर ये अजुनी शांतिसुखाच्या करुहि वाटाघाटी.
हिंदूच्या या गोधन–धर्म–प्राण रक्षणासाठी
जिझ्या म्हणुनी दे धन मोठे आणिक ठरवा शर्ती.
सुभेदार तू सुरतेचा ये स्वयेंचि घ्याया आण
ओलिस घेऊन यावे मोठे सौदागरही तीन.
नगराबाहिर भेटुन मजसी कर काही तडजोड
ना तरि दोनच्च दिसांत बंदर करीन मातीआड.
संदेशाने सुभापतीचे काळिज उडुन गेले

शक्तिधृतिही खचुन गेली प्राणही कंठी आले.
बादशहाच्या शूल भीतीचे भिववी सुभापतीना
म्हणुन खंडणी द्याया त्याचे चित्तही मुळी धजेना.
धमकही नव्हती परतविण्याची शिवसैन्याची धाड
असे जहाले त्यास इकडे विहीर तिकडे आड.
सम्राटाच्या धाकाने मुळि भरवेना हुंकार
म्हणुन तयाने भीत भीत शिवराया दिला नकार

आणि पळाला परिवारासह घेउन निजगजबाजी
भेकड भित्रा जाऊन बसला लपुन किल्ल्यामाजी.
व्याघ्रप्रवेशि हंबा उठतो धेनुच्या कळपात
तसाच येता शिव सुरतेला उठला घोर आकान्त!

शिवसिंहाच्या डरकाळीने उडली न्यायकचेरी
तसाच उघडा पडला राती खजिनाही सरकारी.
मुले माणसे धुम पळाली लावुन घरची दारे
आणि कुबेरहि टाकुन गेले अपुली कोशागारे.
फकीर फुकरा लावुन गेला दार जुळे मशिदीचे
गोरगरीबा भान न उरले चिमण्या संसाराचे.
घेऊन मचवा होडी झटपट वेळि मिळाली जी जी
लपुन बसले नदीत कोणी दडले दरिया माजी.
गजबजलेल्या सुरतेची अशि दो लाखाची वसती
कुठल्या कोठे क्षणात गेली उठुन जीवासाठी.

सकल कला तीज सोडून गेल्या उदासवाणी झाली
उरली एकच प्रेतकळा अन् स्मशान शांती आली.
होता बारा मैलावर तरि नुसते 'शिवाजि' नाव
लावि कराया सुरतेला कशि तुरंत धावाधाव.
भले भले ज्या भिऊन पळती यवनांचे रणगाजी.
अशि चाले त्या शिवनामाची अद्‌भुत गोलंदाजी.
विचारार्थ ते लगबग बसले वखारीचे अधिकारी
करावया रण मागविली ही तिथे जहाजे सारी.
रतिभर चालू नये तिथे त्या शिवराजाची टाप
म्हणुन डागिली एक वखारीसमोर जंगी तोफ.

होता नव्हता तितुका केला सगळा बंदोबस्त
आणिक बसले ठेवून देवदैवावरती भिस्त.

आश्रय घेउन कुणी राहिली वखारिच्या भवताली
तरी तयांचा अंतर्यामी जीव होई वरखाली.
शिवराजाने निजसेनेचे केले चार विभाग
चौखुर दौडुन धरिले रोखुन सगळे नगरी–मार्ग.
आणिक किल्ला रोखायाला छोटासा दळभार
करित ठेविला किल्ल्यावरती अखंड गोळीबार.
सुभापतीच्या प्रचंड तोफा ओकु लागल्या आग
ज्वालांनी त्या त्यांच्या भडके ती सुरतेची आग.

डोंब आगिचा उसळून उडला प्रचंड हाहाकार
होमकुंडि त्या सुरतेचाहि झाला स्वाहाकार.
सुरतेवरचे राज्य उडाले सहजी दिल्लीपतीचे
आणि फडकले प्रलयाग्नीचे निशाण त्या दिवसांचे.
तशात पार्शी अग्निस मोठे उपास्य दैवत मानी
विझवायाला त्यावर त्यांनी नाहि घातले पाणी.
अग्निदेवता प्रसन्न व्हावी म्हणुनी उलटे काही
तेल घातले का त्यांनी ते ठाऊक मजला नाही !
अश्व नृपाचा अपरात्री त्या होऊनिया बेभान
प्रकाशात त्या घालु लागला सुरतेभर थैमान.

हाजी कासम–बहारजीच्या प्रासादांना आग
लावुन लुटला तो सौदागर हाजी सय्यद बेग.
बहारजीचा वाडा सगळा धुवून नेला पाक !
लूट मिळाली त्याच्या एका घरात ऐंशी लाख !
मापुन बघता भरलि एकटचा बनियाच्याच घरात
पुरि अठ्ठाविस शेर पेंडकी मोत्यांची वजनात.
ोने चांदी अमोल रत्ने माणिकमोती पाच
चंड नेली अशी संपदा लुटून कोटी पाच.

कुणी कितीही उपसुन न्यावी माळावरची माती
तशि शिवबांनी इथून नेली लुटुन माणिकमोती.

सासुरवाडीस येता शिवबा--विष्णूचा अवतार
नवलात गेली माहेराहुन निघुन लक्ष्मी थोर.
वखारिवरचा मुख्य मुकद्दम नदी किनारी आला
तोहि 'अंथनी स्मिथ' शिवबाच्या शिबिरी कैदी झाला.
म्हणुन शिवाला आक्सिन्डनचा सवाल ऐसा आला :
" कुणी ठोकिल्या हाती पायी लोहशृंखला त्याला ?"
दिला खुलासा –" दगा न देइल त्याच्या कुणी जिवाला
काही खंडणी घेऊनिया मग सोडुन देतिल त्याला.
आलो नाही संहाराया येथे अंग्रेजाला
परि सुडाची सम्राटाला चुणुक दावायाला."

भरपाईला जरि हा केला सुरतेचा संहार
तरिही तो शिवराजा होता खरा दिलाचा थोर.
सोडुन नीती नाही केला त्याने अत्याचार
नाही सुटला शिवबाचा कधि विचार सारासार.
दीन दरिद्री सुजना केला अन्यायही न घोर
दिल्या होत्या सुभापतीला संधिस घटका चार.
होते नगरी दीन दरिद्री जन जे तिथे समीप
संतोषविले तयांस देऊन लुटिचे द्रव्य अमुप.
तेथिल धर्माध्यक्षाची ह्या अंग्रेजाची किर्ती
ऐकुन नाही लुटिले त्यांनी आश्रम त्याचे खिस्ती.

उलट तयांना दान देणग्या दिधल्या नाना रीती
होति शिवाची परधर्मीही खरीच मोठी प्रीती.
तसाच तेथिल दानशूर जो परेख मोहनदास
तत्प्रासादा नृपे न केला अंगुलिचाही स्पर्श.

तरि अंग्रेज त्या म्हणति 'लुटारु, चोर, दरोडेखोर
बंडखा, द्रोही, बेबंद नि बेईमान दंगेखोर.'
असे तयांनी दूषविले त्या द्वेषाच्या वेडात
खराखुरा इतिहासची त्यांच्या मारिल थोबाडात.
हे सांगाया इतिहासाचा मी कुणी पंडित नाही
परंतु खोटे खरे कळाया लेख–लखोटे पाही.

काही असो ते, साम्राज्याची दाढी निखळुन पडली
कधि न जाहली अशि सुरतेची पुरी बेसुरत झाली.

आता ऐका रसिका, देऊन इथे जरासा कान
सुभापतीने रचिले होते कसले कारस्थान.
निज दूताच्या नावाखाली मारेकरी बलाढ्य
शिवराजावर धाडुनि करी तो तहारहाचे नाट्य
उभा राहिला शिवासमोरी सुभापतीचा दूत
शिवराजाला निवेदिली ती एकच कसली शर्त.
शर्त ऐकुनी राजा बोले होऊन मती अशान्त:
"असल्या गोष्टी शिकवायाला कशास आला व्यर्थ?

बागुलबोवा उभा करोनी भीती दाविता का ही?
सांग धनी का तुझा समजतो अम्हाही भागुबाई?
बडबड करिते माजघरामधी बसुन थेरडी आजी
तशाच बाता मारि फुका तो लपुन किल्ल्यामाजी."
दूत बोलला: "धनीही माझा कांकण घालत नाही
सांगाया परि आलो, राजा तुझ्याच कानी काही."
आणि पापणी लवली नाही तोच मारुनी झेप
खड्ग उगारुन निघे कराया राजवधाचे पाप
क्रोधाग्नीने त्या दुष्टाची झाली होती लाही
या झेपेला थोप घालणे कुणाही जमले नाही.

विद्युद्वेगे उभारलेला तलवारीचा हात
क्षणात वाटे अता नृपाची करील वाताहात.
समर्थ सावध तत्पर परि शिव-शरीर-रक्षक-दृष्टी
एक सारखी त्या दुष्टावर अखंड खिळली होती.
निमिषोन्मेषी त्याच्या नंग्या समशेरीची बिजली
भुजस्तंभ त्या नराधमाचा निखळुन पाडी खाली.
गरकन गिरकी घेऊन गगनी परतुन बिजली आली
शांत जाहली त्या दुष्टाचे उतरुन मस्तक खाली.
गर्दन तुटली, भुजा निखळली, कट्यार पडली खाली !
तरि हि शिवाप्रत भुंडी मूर्ती थैथै नाचत आली.

आणिक डाव्या हाति धडाने किती झटापट केली
वक्षावरती धड आदळता राजा पडला खाली.
नृपवक्षावर बघुन पसरली खलरक्ताची लाली
अशुभ शिवाचे झाले असली वार्ता चहुमुखि झाली.
होऊन बेदिल शिवसैन्याने मुंडी मुंडी चिरली
उठता राजा 'कत्तल थांबवी' अशी राजाज्ञा झाली.
असो; असे हे सुरतेवरती तुफान वादळ आले
मोठे मोठे तरुवरही उन्मळून खाली पडले.
खुरटी झुडपे वखारीची परि उभी राहिली ताठ
म्हणुनि घेतली डौले त्यांनी थोपटुनी ही पाठ.

मिरविति शेखी वखारवाले अजुनी त्या शौर्याची
स्पर्शाया त्या बोलति नऽहती छाती शिवराजाची.
होती तुफान वाऱ्याची त्या कोन दिशाच निराळी
सुडासाठी लुटीसाठी लाट उसळुनी गेली.
उचलुनी नेता डोंगर थकला शिव रत्नामोत्यांचे
काय तयांचे कापड होते घेउन चाटायचे?

एक ‘ अंथनि स्मिथ ’ धरला तो कशी बोबडी वळली?
मालाची मग कशी जहाजे स्वालिस पळुनी गेली?
होती इतुकी वखार मोठी धैर्याची बलशाली
तर का केल्या खांदेरीला पुढे तहाच्या बोली ?

ते जाऊ दे, कशास येथे अंग्रेजाचे नाम ?
काय जाहला याचा पाहू दिल्लीवर परिणाम.
सुरतेचे शिव–विक्रम जाता बादशहाच्या कानी
खवळुन गेले अंतरि त्याचे ते मन तापट मानी.
नाहि का दिला इतुके झाले तरि उलटा आवाज ?
खोल मनाचा बादशहा तो अथांग कावेबाज.
दुःख राग अपमान अंतरि गिळुनी सगळे काही
सम्राटाने वर्षियली शिव–भाळी स्तुति सुमने ही
यावा शिव निज छद्मजालि त्या दिल्लीच्या दरबारी
म्हणुन केली सम्राटाने शिव प्रशंसा भारी.

बोलविता नृप अचुक पडावा निज कपटाच्या पाशी
म्हणुन शिवाचे गाइ पवाडे तो नृप-मित्रापाशी.
मित्र शिवाचे होते ते नृप-मंडळ बोलवीले
मांडलीक ते अपुले म्हणुनी तयास आदेशिले:
“ पत्र लिहावे शिवराजाला–या दिल्ली दरबारी.
त्यात करावा सुरतेचा तत्प्रताप गौरव भारी.
भावी सुंदर उत्कर्षाची आश्वासनेहि द्यावी
जिवास नाही अपाय काही अशीहि जिम्मा द्यावी.
आणि लिहावे बादशहाची स्वारी प्रसन्न झाली
सन्मानावे तुम्हांस–मर्जी सम्राटाची झाली.

प्रचंड त्या तव पराक्रमांनी नाही झाला खेद
उलट तुझे ते विसरुन गेला बादशहा अपराध.

बादशहाची आज्ञा होता मति अशि अगतिक झाली.
म्हणुन तयांनी शिवरायाला तशीच पत्रे लिहिली.
केले होते बादशहांनी पदभ्रष्ट शास्त्याला.
दिधली दक्षिणराज्य प्रतिनिधिवस्त्रे मुआझिमाला.
तदनंतरही सम्राटाने कळणे अनिष्ट होते
ते लिहिण्याचे मुआझिमाच्या दैवी लिहिले होते.
लिहिले त्याने: " दक्षिणेतली राजधानि जरि मोठी
तरि औरंगाबादेला या वाटु लागली भीती.

शिवराजाने विजापुराची सेना सहा हजार
कारवारि अन् राजपुराही क्षणात केली ठार.
आणि तयाने बांधियलेही दरियाकिनारी किल्ले
दरियावरचे दळण मोडुनि करि आरमारी हल्ले
भूप शहाजी अजि हरपला म्हणुनी राजस्थानी
स्वतःस राजा मानुनि काढी निजनामाची नाणी.
जसवंताने केली त्याला जिणावयाची शर्थ
तरि इतरांसम महाप्रयत्नहि झाले त्याचे व्यर्थ
यात्रेकरूचे धनिक काफिले त्याने लुटले मोठे."
अशी धाडिली मुआझिमाने दक्षिणेतली वृत्ते

असे भयंकर एक दोन ना हजार त्याचे टोले
बादशहाच्या कानी जाता चित्त विकोपा गेले
बादशहाला बंडाळी ही आता असह्य झाली
शिवविध्वंसा त्याने जंगी वीरसभाही केली.
सम्राटाने निहाळिल्या किति वीररसाच्या मूर्ती
परि मनि ठसली रजपूताची एकच अभय छाती.
उज्वल मंगल दर्शनि त्याच्या तारामंडळ लाजे
मनी बिरमला कोहिनूरचा हिराहि त्याच्या तेजे.

दिवस असो वा रात्र पडो तन्मुखि रवि तळपत भासे
स्वप्निंहि तिमिर न संतत मनिमुखि चांदणे हासे.

नव्हते जेव्हा पुरे पाहिले बाराच पावसाळे
त्यावेळीही बालवीर हा खड्‌ग-युद्ध रणि खेळे
साठ उन्हाळे गेले तरि तो तोच समरिचा थाट
रणि तद्यावर विजयश्रीची कधी न फिरली पाठ.
किती देखणा संस्कृति-सागर, पंडित किती रणशूर
राजमोहन्या गाता गाता सरतिल सगळे सूर
शिवकांती जणु सवत वाटुनी घेइल उडि शिवभाली
म्हणून का ती भ्याली बिजली बांधुन कोंडुन घाली?
सम्राटाने नेमियली अशि दक्षिण विजयासाठी
भव्यदिव्य ती मिर्झा राजा जयसिंगाची मूर्ती.

बादशहाने जयसिंगाशी बसुन नाना रीती
हिताहिताच्या खलबतखान्यामधि केल्या गुजगोष्टी
हत्ती घोडे ढालि फिरंगा दौलत आणि इजाफा
नावाजोनी दिल्या-तशा त्या लढाईच्या तशरिफा.
आणि वेगळ्या मार्गाने तो दिलेरखान अमीर
बोलवुन म्हणि आणिला मोठा वजीर जोरावर.
बलाढ्य बळकट धिपाड होता कसला दिलेरखान
मत्तगजाचे सदाच अंगी संचरले अवसान
गजराजाच्या बरोबरीचे खाणे होते त्याचे
अगडबंब ते शरीर लाजे तयास हेडंबाचे.

उपदेशी त्या बादशहा तो अंतःपुरी बसुनः
" दख्खनच्या दिग्विजयासाठी धाडि तुला निवडून
मिर्झा राजा जयसिंगासह आता तुम्हीहि जाणे.
जाग बातमी राखुन कोठे दगा न बिलकुल खाणे.

मिर्झा राजा राजपुत आणिक हिंदू शिवाजी राही
दोघेही मिळुनि न जाणो करतिल फितवा काही.
म्हणुन सारखा स्वारीत असुदे हत्ती तुझा बिनीचा
खानजाद तू बादशहाचा खासा खांदानीचा.''
एके दिनि मग जयसिंहाची स्वारी बसली शांत
उसळुन आले मनी हजारो विचार एकांतात.

'' दक्खनच्या या मोहिमेत मज विजयश्रीची माला
मिळेल का ही अशि मनि भडके चितानीची ज्वाला ?
मांडीखाली उभा न राही ज्याच्या धिपाड घोडा
धाके याच्या मुकाट राही मत्तमतंगजशुंडा.
असा जयाने बलाढ्य खासा खान मारिला अंगे
आणि लाविला पळवुन शास्ता छाटुनि अंगुलि वेगे.
असा शिवाजी मर्द मराठा हुन्नरवंत शिपाई
मुत्सद्याची भरली त्याच्या रोमरन्ध्रि चतुराई.
फिरवित असता पट्टा खड्गहि न दिसे कुणा हत्यार
नेम न केव्हा फोडिल नरडे त्याची चपळ मण्यार.

दास्यशृंखलामुक्त करावी अपुली भारतमाता
आस एक ही सात्विक त्याची निशिदिनि जाळी चित्ता.
करिल पालथे उलथे मम खड्ग दिल्लिचे तख्त
न कळे कापवि त्यात आजच का हा बाका वक्त ?
म्हणुनि शिवावर जय मिळवाया अखिल मानवी दैवी
शक्तियुक्तिचे उपाय योजुनि या कार्याते लावी.
ठायी ठायी बसली कोटी कोटी जपानुष्ठाने
पूर्णाहुति संतर्पण करूनी द्विजास द्यावी दाने.
त्यासाठी घ्या नगदी नाणे रुपयांचे दो कोट
कोटचंडि करि अन् अर्चा शिव लिंगे अकरा कोट.''

दान धर्म सत्कर्म जपानुष्ठाने संतर्पण
असा चालला धूमधडाका अखंड महिने तीन.
शिवरायावर दुनिया सारी घालाया त्या चतुरे
साम-दाम-अन-दंडभेद हे उपाय केले सारे
करुन इतुके दक्षिणेस नऊ लाखाचा सरदार
रणा निघाला घेऊन ऐंशी हजार घोडेस्वार.
धिंगा घाली घोडा त्याचा दख्खनच्या मुलुखात.
आणि तयाने केला काही मुलुख पादाक्रांत.
शिवास केला भिववायाचा प्रयत्न आटोकाट
महाशूर परि शिवबाला तो मनात होता भीत.

कोंडाणागड आणि पुरंदरगड यांच्या दरम्यान
ढाल खड्ग करि ठेवुन त्याने अंति मांडिला ठाण.
सह्याद्रीचा सिंह समयि या राजगडावर राही
म्हणुन आले तिथेच मंत्री जासुद हालकारेही
आणि बोलले : " चहु अंगाने राजे रहा हुशार
आला गर्जत रजपुत घेऊन दरबारी दळभार
राजे आपण चातुर्याने अफजल गारद केला
शासन द्याया शास्ताखाना नवाच हुन्नर केला.
असे मारिले राजश्रींनी पराक्रमी सरदार
खरेच होते मोठे परि ते थोडे गैर हुशार.

म्यान जाणी जयसिंगाची परि नंगी समशेर
पळ न पापणी मिटते ती अशि जिती जागती धार. "
राजे वदले, " करिता काही वळेल रजपुत जाण
बेईमान परि हट्टी मोठा हरामजादा खान.
राज्य श्रीचे; भार श्रीवर ठेवुन आठवुन माय
पाहु होईल काय? तयाचा विचार आता काय ?

पुढे आपुल्या भव्य तळाहुन मोंगलचा रजपुत
सांगावा हा सांगायाला नृपासि धाडी दूत.
“ तुम्ही शिसोदे रजपुत कुळिचे एकच आम्ही तुम्ही
रण नच करिता जमले तर करु गोडगोमटे काही.”

ज्ञान कला ती कळसा गेली होती जयसिंगाची
शास्त्रकलांची मूर्ती होती अगाध पांडित्याची.
तशीच शास्त्रे रघुनाथाच्या ठायी निवास करीती
म्हणुन निवडिले भेटिस जाया विदग्धपंडित मूर्ती.
प्रसंग दुर्धर जाणुन धाडुन पंडित रघुनाथाला
निरोप दिधला मार्मिक मिर्झा राजा जयसिंगाला.
“ सरदारांच्या सरदारा तू राजांच्याही राजा
प्रतापशाली जयसिंगा हा प्रणाम घ्यावा माझा.

रघुकुलदीपकवंशाचा तू प्रकाश होऊन राही
तुझ्याच योगे रजपूतांचे मस्तक उन्नत होई.
तुझ्याच मोठ्या पराक्रमाने यवनोद्यानहि फुलले
तुझ्या जिवावर लक्ष्मी बर्बरवंशाचीही डोले.
म्हणति पराजय कशास जन्मी ठाऊक नाही तुजला
नाव तुझे किती साजुन दिसते तुझिया कीर्तिकृतीला!
बाहुबळे तू पकडाया मजवर आक्रम करुनी
आला दक्षिण जिंकायाला असेहि आले कानी.
रक्त हिंदूचे परि मुखचंद्रा तव न रक्तिमा देई
कृत्य तुझे ते कायम आणिल मुखास काळोखीही.

युद्धासाठी स्वये तुर्क तो येता जर या प्रांती
केली असती शिकार त्याची कुठेहि रातोराती.
परि तुजवर जर चालविली मी कुठार वा तलवार
उभयपक्षिही हानि हिंदुची होईल अपरंपार.

म्हणून आता डाव कोणता खेळू कळेना काही.
तुजसि मिळावे येऊन जर तर त्यातही पौरुष नाही.
शूर वीर तू आणि दयाळू देवाहुनही थोर
मग का आणिसि अपुल्या धर्मावर ही विपदा घोर?
पंचत्वाप्रत गेला विक्रमशाली अफजलखान
अयोग्य ठरला तसाच मोठा बलाढ्य शास्ताखान

म्हणून दिल्लीच्या सम्राटाने धाडियले का तुजला
पकडुन न्याया मजला माझे स्वराज्य जिंकायाला?
असशील जेता अजिंक्य गिळशिल विश्वाचाही गोल
म्हणून बच्चा सिंहाचा हा बनेल काय शृगाल?
का सिंहाशी उगिच सामना द्याया स्वारी आली?
कोल्ह्याच्याही चालीची तुज शीक न पुरती झाली
म्हणशील मोंगल दौलतिचा मी सेवक असे इमानी
तरि तव वर्तन शहाजहानासह तू ध्यानी आणी.
तुझ्यासारखा अजिंक्य योद्धा तूच खरा रणगाजी
परि का आला बादशहाच्या गुंतुन पाशामाजी ?

प्राण पित्याचे, बंधुपाश जो मानि न तख्तासाठी
सोडुन अपुली कुलमर्यादा दिलीस त्याच्यासाठी
पुरे कृपेची फुशारकी त्या नीचाचि ती प्रीत
उरी आपदापर्वत घालून हिंदूचा करी घात
जुझार सिंहाच्या कार्याचा घडे कसा परिणाम
छत्रसालबच्चाला केले छळून घामाघूम.
तुर्क देशीच्या मूठभरांनी हिंदूंच्या देशात
प्रस्थापावी प्रभुता अपुली; किती नवलाची बात?
प्रबलतेस या मुळीच त्यांचे पौरुष कारण नाही
अंश बुद्धीचा असेल तर तू डोळे उघडून पाही.

हिंदूहिंदूमधि पिकवी कलि बादशहा मायावी
तुझिही वेडी तृष्णा तुजला मोहक मृगजल दावी.
सिंहासिंहामध्ये लढाई लावुनी करि तो खेळ
परस्परांचे रक्त सांडुनी ते होती घायाळ !
चढवुन असल्या शौर्याच्या शिरी आयाळाचा साज
भ्याड गिधाडे मिरविती आम्ही जणु काही वनराज!
असला चाले बादशहाच्या कपटनितीचा खेळ
नवल नव्हे का तुज हा त्याचा डाव न कळला खोल.
बादशहाचा कपटवन्हि करि देहदिलाची आग
जबाब तुर्कीचा तुर्कीतच देणे आता भाग.

वनचरहि बघ पाळिती जगि या धर्मरणाचे बंध
सांगा करितो व्याघ्र कधी का सिंहासह गृहयुद्ध ?
हिंदू, हिंदुस्थान, हिंदुंचा धर्म रक्षण्यासाठी
तळहाती शिर घेऊन चल करू तू मी आटापीटी.
आशा माझी एकच तू कर जसवंताशी सख्य
त्या कपटचाचा पिच्छा घ्याया कर राण्याशी ऐक्य
निजकृत्यांच्या परिणामाचा मग तो करिल विचार
आटोपिल मग दक्षिणेतले तो कपटाचे ढेर.
तुझाच असता देश, कशाला आला घ्याया प्रांत
न कळे कसल्या जादूने तव बुद्धि जाहली भ्रांत ?

तू मी हिंदू, तू माझा, मी तुझा सहोदर भाऊ
आईसाठी लढता लढता मरुन दोघे जाऊ
अथवा मिळता विजय आपणा धरुन तुझा मी हात
सिंहासनी तुज बसवुन राजा करीन कुर्नीसात.
दक्षिण विजयासाठी येता तू जर तुझ्याचसाठी
पसरली असती मम हृदयाची मखमल कृष्णाकाठी.

पुष्पोद्यानातून आणिले मधुन मधाचे साठे
परि का घेऊन आलासी तू फुलांबरोबर काटे?
प्रचंड पौरुषपराक्रमाची मारिसि कशा बढाई ?
म्लेंच्छछळाने रडते आई तुझीच धाई धाई.

देश–देव–धन पवित्र पूजक राऊळ देऊळ पाही
गेली सगळी; नुरला त्याचा ठावठिकाणा काही !
असा चालला विनाश संतत; शोका सीमा नाही
मग इहलोकी स्वलोकचिन्हहि उरेल का ते पाही.
जन्मभूमिच्या संतापाने तप्त करी तरवार
पाजुन पाडित जनलोचनजल तयास दे तू धार.
रिपुरक्तामृत वेळी पाजुनि आईस जिव दे काही
जाण अता तरि गृहयुद्धाची ही वेळाही नाही.
बोल बोल तू आज हिंदूच्या धर्माची तुज आण
रक्त आईचे पिऊन तुझीही शमेल काय तहान ?

रण हिंदूशी करुन मस्तके हिंदूनी उडवावी,
गोष्ट कोणती योग्य अयोग्यचि तुझीच तू ठरवावी.
तिकडून तू अन् इकडून मी ही ऐसे दोघे मिळुनी
झेंडा अपुला नाचत नेऊ उत्तर हिंदुस्थानी.
लाटा उडवित नदी पहाडातुन सुटते रानात
तसाच घेऊन भालाइत मी उसळिन मैदानात.
इस्लामाचे नाव पुसेनहि भारतपटावरुन
बादशहाचा त्या दोन्हीही निःपात मी करीन.
घेऊन मेघासम गडगडत्या निजसेनेची साथ
तलवारीच्या पाण्याची मग करीन मी बरसात !

चहुबाजुनी सम्राटाचे सिंहासन वेढून
करुन अकुंचित टाकू तू मी लढाइचे मैदान.

उसळत गर्जत रणघोषांचा सेनातरंग नेऊ
जर्जरलेल्या दिल्लीच्या त्या घरात त्याच्या जाऊ.
बादशहाच्या नावातिल मग विरुन जाइल जादू
ना 'औरंग न जेबहि' उरुनी पडेल उघडा भोंदू !
न्यायपरायण परमेशाचे कृपासहाय्यहि घेऊ
भूगर्भामधि बांधुन त्याचे घर त्या तेथे ठेवू.
दोन दिलांची युति होता ती पहाड फोडुन जाई
निजकार्याचा गड मग चढणे मुळीच अवघड नाही.

बोलायाचे आहे माझ्या मनात जे जे काही
ते सगळे या पत्री लिहिणे व्यवहारोचित नाही.
असेल इच्छा खरी तुझी तर येइन भेटायाही
आणि तुझीही वचनमौक्तिके धरीन मस्तकि मीही.
वार्तासुंदरिचे मुख खोलुन बोलू खुल्या दिलाने
गुंता होता केशकलापी करीन साफ फणीने.
कार्यसिद्धीचा पथ एखादा तूही मजला दाव
अन् इहलोकी परलोकीही उजळू अपुले नाव.
अफजलवध मी केला म्हणुनी शंका धरी न लवही
मनात त्याच्या खरेपणाचा अंशहि नव्हता काही.

अफजल माझा घात कराया छपवुन निजतरवार
आला होता घेऊन कडवे हजार हबशी स्वार.
त्यास पाजिले नसते माझ्या खड्गाचे मी पाणी
तर जयसिंहा ! पत्र तुला हे लिहिले असते कोणी ?
भेटित धोका मानु नको तू ध्यानिमनीस्वप्नीही
देश-धर्म निजखड्ग याची ही मी आणहि वाही.
तशीच भीती तुजविषयीचीही मनि माझ्याही नाही
तुही माझा शत्रु न माझे मन मज देते ग्वाही.

जबाब धाडुन मजसि यथोचित दाविसि बंधुप्रीती
तर येइन मी सहज एकटा तुज भेटाया राती.

खिशात होते शास्त्याच्या ते लिखित तुला दावीन
संशयजल तव नयनी शिंपुन निद्रा दूर करीन.
खुल्या दिलाचा लिखा न माझा येइल तुझ्या मनाशी
तर सैन्याची तव या माझ्या गाठ असे खड्गाशी.
रवि अपुले मुख उद्याच लपविल संध्येच्या पदरात
अर्धचंद्र तो माझा चमकत येइल रणांगणात.
रक्षण कर निजधर्माचे हे अपूर्व आले पर्व !
होवो भारत सुखी तुझा हा कुशल असो तव सर्व."
पत्र वाचुनी विचार सांगुनि वकिला गौरवुनीया
जयसिंगाची स्वारी धाडी नृपास संदेशा या:

" थोर शिवाजी राजे, वाचुन पत्र जाहला मोद
सर्व खरे परि ऐका माझा अंतरातला शब्द
दिल्लीशाचा चढाव तारा, अतिशुभ ताराधीश.
अंत न होइल या कलहाचा धरून रणाचा सोस!
मनात माझ्या आपण घ्यावी बादशहाची भेट
चतुरपणाने शिजवुन तीतच घ्यावे अपुले बेत.
परि त्या आधी दिसू नये मुळि इकडे फितवा काही
म्हणुनी महिने चार सहा हे गनीम दमवा काही.
मजवर पाळत ठेवुन राही संगे तिन्ही त्रिकाळ
दिलेरखानहि बादशहाच्या तो नाकातील बाल.

गडागडावर दिलेरखानासह करि रण घनघोर
रणमद त्याच्या पुरा जिरावा रणात महिने चार.
तोलदारपण दावुन लढवा तुमचे किल्लेकोट
तहरह घडणे समयी घ्यावी इथेच माझी भेट.

वृद्धपणी मला अपयश न लगे! होईल ते पहिलेच
टळेल ते अन् सुटेल तुमचा अमुचा सगळा पेच.
देशासाठी धर्मासाठी करिता सगळे काही
राजे! मिर्झा राजे हे का मनात जाणित नाही ? "
बोलुन इतुके वस्त्रे उंची अलंकारही दिधले
राजगडि हा निरोप घेउन परतुन पंडित गेले.

जयसिंगाच्या शिबिरी नृपाचा दूत येऊनी जाई
आणि तयांची एकांतामधि झाली कुजबूज काही
पाहुन हिंदुस हिंदू मिळता यत्नहि जातिल वाया
मिर्झाराजापाशी येऊन दिलेर बोले हे त्या :
"दिवसामागुन दिवस चालले नुसते बसला काई ?
शोभत नाही सरदारा हे उठा चला या पायी.
नाहि लांब ते रणमैदानहि या गोटापासून
कोंडाणागड आणि पुरंदर इथेचि गड हे दोन.
इरेस घालुन जिव मी घेइन पुरंदराचा गडही
आणि जिणावा तुम्ही लढाइ लढून कोंडाणाही.

शिवाजिचे गड घेता ऐसे एकामागुन एक
आपोआपच तोही येइल घाशित आपुले नाक."
मिर्झा राजा बोले: "अवघड गड ! मिळतिल तर ठिक
नातरी पिकेल याही रानी हुरेवडीचे पीक.
गडि न लागता वरकड घ्यावा मुलूख काही काही
लौकिक जाता एकदाच तो परतुन का कधि येई?
दाणा वैरण दारुगोळा गडास जे जे येई
दळणवळण अन् रणबळ रिपुचे सोडुन सगळे काही.
रसदबंदि अशि करुनी घाला चहुतर्फांनी थोप
येतिल चालुन अपुल्या पायी गड मग आपोआप.

क्षणात रोखुन तीव्र दृष्टिची लाल विखारी चोच
तिथुन उडाला दिलेर मारुन ही बोलांची खोच.
" घ्या कोंडाणा वा मुखि घेउन घुंगट बसा असेच
पुरंदराचा गड हा घेतो जाऊन माझा मोच."
ढाल फिरंगा घेऊन गेला झटपट आपुल्या गोटा
गगने घुमली डुम डुम नादे डिंडिमगणही मोठा.
पायउतारा करुन कडवे पठाण पाच हजार
पेंढारी अन् आडहत्यारी बैले दहा हजार.
आणिक तोफेकडिल खलाशी मिळुनी लहानथोर
फौज आणिली पुरंदराच्या पदतळि वीस हजार.

संतापे अशि मारि भरारी दिलेर आकाशात
जयसिंगाचे मिस्किल मन परि हसे आतल्या आत.
पुरंदरावर महाडचा तो मुरारबाजी थोर
खडाच होता घेऊन कडवे लष्कर दोन हजार.
खानाचेही निर्भय निर्दय पठाण मोठे शूर
चढू लागले गड चहुतर्फा करावया रण घोर.
विद्युद्वेगे वरतुन सुटला खासा मुरारबाजी
सातशेकडे वीर मावळे घेऊनिया रणगाजी.
मोठे घोरंदर रण झाले! प्रचंड लष्कर मेले!
गर्जत बाजी खानाच्या त्या विशाल शिबिरी आले.

उरल्या सुरल्या साठ शिपायांसवे देवडी चढले
फिरंग फिरवित नाचत खानासमोर बाजी आले.
रक्त-घर्म-जल-बिंदु चमकती लाल धवल भेसूर
का रणदेवी घाली गुंजामोत्यांचा त्या हार?
महाभयंकर शस्त्राघाते झाले तनुचे जाळे!
बघुन बाजीचे शौर्य कौतुके खान तयासी बोले,

“ तुझ्यासारखा कधि न पाहिला रणि मर्दानी डौल
शूर शिपाया, तुझे न उमजे कसे करावे मोल ?
सात काळजापल्याड ठेवुन जपणे ज्या मर्दास
असा शिपाई इरेस घाली पिसाट राजा खास !

अजून मर्दा तू तरि सावर अपुला तोल
तुझ्याच जिवासाठी वाटे उचीत घे तू कौल.
गोलंदाजी भिरभिरविती माझा प्रचंड गोट
तुझ्या जिवाचा पतंग जाईल तुटून खाऊन गोत.
मुरारबाजी: ‘वाचा उगाच शिणवू नको मी कसला घेतो कौल?
रणात तुजला मारायाचा दिला शिवाला बोल.
पर्वा नाही जरि कायेची झाली राईराई
अन्य कुणाचा नाही मी त्या शिवाजीचाच शिपाई.
मरेन किंवा मारिन लढुनी रणि कसलाहि शिपाई
जिवास या त्या वाचुन तिसरा शब्दच ठाऊक नाही.

मेघमंडळातुन कडाडुन सुटता लोळ विजेचा
शांत होई का ठाव घेतल्याशिवाय पाताळाचा ?
तसाच हा शर शिवरायाच्या सुटलेल्या धनुवरचा
रणात रिपुचा प्राण घेतल्याविना न परतायाचा. ’
अशि बाजीची घोर गर्जना भिडली अस्मानास
ऐकुन काळिज खानाचेही उडून गेले खास.
रणावेश तो पाहून तेथून खान खाइ माघार
गरुड पाहुन निघुन जावी जशी नभातून घार !
उसळून आले परी शिपाई हजार आडहत्यारी
गर्जु लागली तोफांचीही भयाण तोंडे सारी.

छोटी तुकडी बाजीची परि चकमक झडली थोर
लढता पडले बाजीचे ते साठहि कडवे वीर.

एकच उरला मुरारबाजी तरि लढला रिपुशिबिरी
दिलेरखानावरी उफाळुन तुरंत गेली स्वारी.
आणि कडाडुन अता करावा अंगावरती वार
तोच पहा त्या खानाचीही किती शिताफी थोर!
क्षणात अंगे कमान घेउन चुकवुनिया तो वार
बाजिस केला पुरा तयाने मारुन उलटा तीर
बाजी पडता खान बोलला पाहुन त्या रणशौंडाः
"पहा खुदाने किती विलक्षण शिपाई केला पैदा !

असेच असले शिवाजीचे जर सैनिक रणझुंझार
कसा जिणावा गड अवघड हा पुरंदराचा थोर ?"
आणि बोलिला डोईवरचा उतरुन मंदिल खाली :
"घेइन गड हा तेव्हा मी ही बांधिन पगडी मौली."
गर्जून बोलेः " बाजी मेला. गडकरी गडावर खाली
आणि ढालिचा कोट करोनी बसला बुरुजाखाली.
जबाब दिधला खडा गडाने एकच मेला बाजी !
गडमाथ्यावर अजून गर्जति हजार तसले बाजी !"
राजगडावर वार्ता आली–" मुरारबाजी पडले. "
दिल राजाचे करपुन गेले, चिंता–व्याकुळ झाले.

आणि बोलले: " सल्ल्यासाठी या घडि बरवे जाणे
गड गेल्यावर मग तह करणे होइल लाजिरवाणे."

म्हणुन निघाले एकाएकी पुढिल विचारासाठी
जयसिंगाच्या गोटी आले निवान्त भेटीसाठी.
जयसिंगाप्रत जाउन शिबिरी रघुनाथाची स्वारी
प्रणाम करूनी बोलेः " आली भेटिस राजस्वारी."

भेटीचा हा निरोप येताक्षणी त्या सरदारास
उठुन देवडी बाहिर गेला पायउतारा खास.
तसेच राजे झटपट आले उतरून शिबिकेतून
स्वागतार्थ ती जयसिंगाची विनम्र झाली मान.

छातिस छाती भेटीसाठी भिडली बाहूतून
एका आसनि बसले दोघे हाती हात धरून.
राजे वदले: " चुकवा आता परस्परांचा घात
बसुनी आपण करू तहाची दोघे वाटाघाट.
रक्षण करि हे तुम्हां आणिले स्वराज्य शेल्यातून
आणि पुरंदरि चढवा तुमचे खुशाल उंच निशाण.
ठरतिल गड ते स्वये तुम्हांला देइन सगळे काही
मनात माझ्या यश त्या यवना कदापि देणे नाही."
नृपवचनी त्या रणमर्दाचा आला उर भरुन !
आणि तहाच्या शर्ती सगळ्या टाकियल्या ठरवुन.

आणि बोलला: " ठरले तुमचे अमुचे सगळे काही
परि पुरंदरि बादशहाचे कृपापात्र ते पाही.
खानासह त्या उपचाराचे बोलहि बोला काही
दिलेर आहे हटेल, डौली, छटेल, फार्मिदाही.
सुभानसिंगा घेउन जावे खानाच्या भेटीला
पुरंदराहुन परतायाचा हुकूम देतो त्याला."
तेहि जाहले पुढे पुरंदरि परि खानाची स्वारी
श्रेय न म्हणुनी मनगट चावुनि मनात जळली भारी.
चतुरपणाने अशि उलटवुनी ती वैऱ्याची रात्र
शिवरायांनी दिल्लीपतिला विनये लिहिले पत्र:

' गुन्हेगार मी अपुला आलो शरण घेउनी जीव
बादशहांनी केली माझी खरीच मोठी कीव.

शिक्कापंजादिके अलंकृत कृपापूर्ण फर्मान
धाडुन, दिधले जीवदान मज ! हा माझा किति मान !
मज गरिबावर बादशहांची दौडत आली फौज
आहे का कुणि पृथिवीवरती तियेस द्याया झुंज ?
तह करुनी मी बादशहांना दिलेहि किल्ले प्यारे
आता सद्‌यश बादशहाचे गाति तयावर वारे !
नाही आता सर्वस्वाचा घात करुन घेणार
लिहिले आहे जयसिंगांनी सगळे तपशिलवार.

प्रेमे सेवा करुन टाकून बंडाळीची खोड
अपुल्या अनंत उपकारांची करी काही फेड !
म्हणुन विनंती या दासावर दयार्द्रतेने पाही
ठरल्या बोली दोघे पाळू दिल्लित भेटिन मीही.
मी विजापुरी जयसिंगासह चालुन जाण्यासाठी
घरी तयारी करुन येतो लढाइ करण्यासाठी.
करुन पराक्रम विजापुराच्या या स्वारीच्या कामी
काढिन माझ्या चरितावरचा धुवून काळिमा मी !
विजापूरच्या स्वारीचे जरि झाले पुढती काही
तरि घडलेला हा तह मानुन आश्रय द्यावा पायी.

दख्खनची परि सुभेदारि द्या ती मज पंचीप्यारी
अर्पिन मोंगल दौलतिला मग जान नि जिनगी सारी !
संभाजीला बादशहांच्या खाशा फौजेमाजी
पाच हजारी मनसबदारी अन् द्या उमदे वाजी.
सम्राटांचे आज्ञावंदन, करणे सेवा चरणी
दख्खनचा हा राजा आता खरेच भूषण मानी.''
बादशहा तो लेख शिवाचा नीट निहाळुन पाही
आणिक बोले दिवाणजींना: " जबाब हा त्या देई:

बादशाहाच्या थोर कृपेचे होउनि उमेदवार
जयसिंगाची भेट घेतली हे जाणी सरकार.

अंगिकारिली नरमाई ही सोडुन सगळे बंड
पत्र माफिचे वाचुन आले खरेच घ्याना गोड.
कळविति इकडे अधिकारीही मोंगल सरकारास
जयसिंगासह करूनि तुम्ही तह दिलेत किल्ले तीस.
या दौलतिच्या आश्रयास या करुनी पश्चात्ताप
खरा भोसलेवंशाचा मग दिसेल साजुन दीप !
पेशकशीमधि तूट आणिती त्या शर्ती परि तुमच्या
रुचल्या नाहित, गमल्या नाहीत मुळीच माफीजोग्या.
बारा किल्ले आणि खालचा मुलुख मागता सारा.
परि तो आणिक निजामशाही मुलुख आम्हां प्यारा.

तळकोकणचा मूलूख आहे तुम्हाकडे जो चालू
शिरपेचातिल व्हावा अमुच्या तोहि हिऱ्याचा पैलू.
अदिलशहाचा तळकोकणचा मुलूख बालेघाट
बंदोबस्ता आला अमुच्या इकडिल सरकारात.
हा लाखाचा मुलुख पाच मग येईल आमुच्या हाती
परि त्या आधी जिंकुन घ्या तो तुम्हीच तुमच्या हाती.
त्यासाठी निजसेना घेऊन मिळुन जयसिंगास
बालेघाटी विजापुराचा मुलूख घ्यावा खास.
विजय मिळवूनी पेशकशीही अम्हांस द्याल तुम्ही ही
तर मग मुलूखहि तुम्हांकडे तो बहाल ठेवू आम्ही.

शिवराजे करू सगळे काही तुमच्या जीवासाठी
परि दिल्लीला निघून यावे खाशा भेटीसाठी."
अशी शिवाची बादशहाची पत्रे आली गेली
राजकारणी डाव पटावर चतुर जोडी खेळी.

आणि शिवाजी जयसिंगांची पुढे बैसली जोडी
दख्खनचा तो भूप बिलंदर मार्ग शोधुनी काढी
होता आग्रह जयसिंगाचा दिल्लीस जाण्यासाठी
बोले शिवबा, "जाइन मीही तुझ्याच शब्दासाठी
बादशहा परि आहे भारी खोल मनाचा कपटी
घातपात तो जिवास माझ्या करील काळ्यारातीं!

होशील का तर हमीदार तू माझ्या जीवासाठी
देवासाठी धर्मासाठी तुझ्याच देशासाठी ?
प्यार जिवाहून रामसिंगजी पुत्र तुझा तो मोठा
तसा शिवाजी, जयसिंगा, हा तुझाच छोटा बेटा.
प्राण घेतला माझा तरि मज त्याचे नाही काही
राखशील का माझ्या मागे स्वराज्य माझ्या भाई?
स्वराज्यसाधनि विघ्न न यावे म्हणून कृष्णास्नान
करून लेकुरा देवाधर्मा स्मरुन घे तू आण.
आणि गौरीहर पूजा करूनी उचलुन तुळशी बेल
जयसिंगाची मूर्ती बोलली अमोल हृदिचे बोल.

"जा शिवबा, जा, सम्राटाच्या जा तू भेटीसाठी
हा घे गहाण माझा जिव तू तुझ्याच जीवासाठी.
तुझिया जीवा बादशहा जर काही करिल अपाय
तक्त फोडुनी करीन त्या मी दे मा धरणीठाय.
घडेल हातून बादशहाच्या वचनभंग जर काही
तर दिल्लीची सेना माझी लढेल तुझियापायी.
दहशत दावुन बादशहाच्या गळा घालण्या फास
इथेच राहुन ठेविन माझी ही मी सेना खास.
शब्द तुम्हां हा शिवराजे घ्या, सोडुन द्या चिंतेते
आधी अमुचे शिर मग तुमचे जाइल जायाचे ते.

मयूर सिंहासनावरोनी उडवून शहाजहान
आला होता दिल्लीवर त्या कारागृहि कोंडून
तक्तासाठी केले त्याने बंधु पित्याचे खून
म्हणुन गमे त्या सिंहासन हलवावे दिल्लीहुन.
निवडुन मोठ्या हजार तोफा उडवून हजार बार
डौले नेला आग्र्याला तो दिल्लीचा दरबार.
बादशहाच्या मनास संशय-पिशाच्च बिलगुन राही
आणि करी तो निशिदिनि मत्सर आपुल्या छायेचाही
खोल मनाची घडण तयाच्या अनंत पाताळाची
तद्-हृन्मंदिर-रचना होती भुजंग वल्मीकाची!

नाक तयाचे श्वानाचे अन विषसर्पाचा दात,
नजर तयाची गरुडाची अन असे खुन्याचा हात.
जाया असल्या सम्राटा का शिवबा होते वेडे ?
अजुन न रसिका का उकले हे इतिहासातिल कोडे ?
तोडून टाकी एकच ज्याचा तलवारीचा हात
विजापुराच्या सत्तेचे ते तुफान झंझावात.
मोंगलसेनासागरिची जो उलटवी डोंगरलाट
तसाच ज्याने राठोडाचा लोळविला रजपूत.

असला राजा तयार व्हावा का हो तहारहास ?
किल्ले तेविस देऊन आता जायाला आग्र्यास ?
शिवराज्यावर तशि निकराची वेळहि आली नव्हती
तर मग केल्या तहारहाच्या कशास वाटाघाटी ?
गेला नव्हता दख्खनचा गड एकहि रिपुच्या हाती
तर मग केल्या तहारहाच्या कशास वाटाघाटी ?
आत्मरक्षणा तटबंदी त्या एक पुरेशी होती
तर मग केल्या तहारहाच्या कशास वाटाघाटी ?

तसाच होता अंगी तकवा तग दम धरण्यासाठी
तर मग केल्या तहारहाच्या कशास वाटाघाटी ?

जयसिंगाने करुन पाहिले रणात काही हात
परि शिवराजा अजिक्य दिसला कोकणच्या मुलुखात.
शिवरायाला खुल्या रणांगणि जिंकायाची हाव
मनात होती म्हणुन घेतली दक्षिणेस ही धाव.
सह्याद्री घर शिवसिंहाचे ! तिथे कशाचा ठाव?
समरपटावर सरदाराचा हरला पहिला डाव.
येतिल दक्षिण इस्लामाची राज्ये कशि हातात
अशीहि होती जयसिंगाच्या जिवास पडली भ्रांत.
शिवसाह्याविण गमले त्यासी यत्न व्यर्थचि लाख
तशात झाली आदिलशाही कुतूबशाही एक.

किल्ला एकच घ्याया लागत होते महिने महिने
चाळिस घ्याया लागतील किती वर्षे अल्ला जाणे
त्रैराशिक हे सोडाया ती सरदारांची जोडी
डोंगरखोरी नदीकिनारी बसून आकडे मोडी !
कळून चुकले बादशहाला समरि शिवाजी भारी
लहानमोठी प्यादी अपुली रणात हरली सारी.
ना सत ना गत राहिल केल्यावीण शिवाशी मैत्री
म्हणुनी घ्याया सहाय्य त्याचे दिल्लीस त्या पाचारी.
सम्राटाने शिवराजाला लिहिले होते अंती.
" पाचारण हे राजा केले तव सन्मानासाठी.

घडि न दवडता, मारुन मजला, यावे दिल्लीस थेट.
मानमरातब राखून देऊ तुम्हास खाशी भेट.
लोभ आमुचा पूर्ण तुम्हावर शंका मुळी नसावी.
सत्कारोनी निरोप देऊ खातरजमा असावी. "

इकडे शिव यश देइल लढता दक्षिण इस्लामाशी
या भ्रम-मधु-रसि जयसिंगाची रुतून बसली माशी.
शिवराजा राजनीतिपटु तसा चतूरहि भारी
तहान्वये विजापुरावर त्याने रचिली स्वारी.
ताथवटांनी फलटण असले किल्ले काही जिंकिले
पोशाखांचे कट्यारिंचेहि त्या नजराणे आले.

मोंगल सेना घेउन गेला अपुल्याहुनी प्रचंड
तरी विजापुरि झाला रसिका ! कसा तियेचा मोड ?
तिथून राजा निघून वेगे पन्हाळगडला आला
तिथेही त्याच्या त्या सैन्याचा कसा पराभव झाला ?
अल्प बळावर अदिलशहाला करि जो घामाघूम
हरला मोंगल घेउन यातिल कळेल का तुज गोम ?
घेइल कैसा राज्ये ती तो मोंगल दौलतिसाठी ?
ती घ्यायाची होती त्याला पुढे स्वराज्यासाठी.
मोंगल मोठा झुंजत होता लावुन पाया पाय
राजा नव्हता राजी द्याया त्या विजयाचे श्रेय.

परतुन आग्र्याहून येईतोवर स्वतःची स्वारी.
विजापुराची बळे ठेविली अशी अधांत्री स्वारी.
सवाल रसिका ! पुन्हा आपणा याहि कारणासाठी
सांगा, केल्या तहारहाच्या कशास वाटाघाटी ?
गोष्टींचा या साऱ्या गंभिर विचार करुनी चित्ती
सांग निघे का शिवबा घ्याया बादशहाच्या भेटी ?
थोर धुरंधर तारकवंशाच्या सन्मानासाठी
उभयपक्षिच्या हिंदुहिंदुच्या रक्तरक्षणासाठी.
विजापुराच्या संधिभंगपापाच्या सूडासाठी
अदिलशाहिचे कुतुबशाहिचे थडगे रचण्यासाठी.

सम्राटाचा प्रतिनिधी दख्खनि नेमुनि घेण्यासाठी
प्रतिनिधिपद ते स्वराज्यकार्या उपयोजाया साठी.
आग्र्यामाजी राहुन निरखुन सगळे अवतीभवती
परिस्थितीची ओळख पुरती करून घेण्यासाठी.
जोधपुराच्या अंबरमेवाडाच्या सहकार्याची
जुळणी मिळणी करण्यासाठी रणपटु राजपुत्रांची.
दिल्लीपतिवर आघाडी नव वर उघडायासाठी
अंती मोंगलसत्तेचे निर्मूलन करण्यासाठी.
यवनापासुन चौथ नि सरदेशमुखी घेण्यासाठी
प्यार जिवाहुन असलेल्या त्या स्वराज्य-सिद्धीसाठी.

मयूर सिंहासन दिल्लीचे उलथुन देण्यासाठी
जरिपटका अन् भगवा झेंडा दिल्लीत डुलण्यासाठी.
रंगत होते स्वातंत्र्याचे असले स्वप्न मनात.
वाटे त्या कधि अवतरते ते सत्याच्या सृष्टीत !
राजकारणी डाव मांडिला होता हा हृदयात.
दिसेल रसिका, तो जयसिंहा लिहिलेल्या पत्रात !
तरिहि बोलती कुणी कुणी शिवशरणागति झाली ही
त्या पढिकांना शिवचरिताचे सारच कळले नाही !

आता आग्र्याप्रत जायाची निघून राजस्वारी
म्हणुन घेतले बोलाबोली राजगडी अधिकारी.

थोर अबाजी सोनदेव अन् अण्णाजी दत्तोही
तसाच मोरोपंत पेशवा उभा समोरी राही.
तीन इमानी जीवांना त्या सांगुन सगळे सार
तयास दिधले सारे आपुले राज्याचे अधिकार.
आणि काढिले नवीन आज्ञापत्रहि निजमुलुखात
" सर्वांनी त्या अधिकाऱ्यांच्या वागावे शब्दात. "

चहुमुलुखामधि अपरात्रीही स्वारी धुंडुन आली
कुणी न होइल बेइमान ही मनास खातर पटली.
होइल वाइट साइट; परतुन येणे घडणे नाही
समजुन सावधपणी व्यवस्था केली सगळी काही.

नंतर मंदिरि जगदंबेच्या भेटीसाठी गेला
जगज्जननिच्या पदकमळी शिर ठेवि कितीतरी वेळा.
कथिला अंतर्हेतु आईच्या डोळ्या लावुन डोळा
आळवी– "बाळाभवती घाला थोर कृपाकवचाला."
प्रार्थनि दर्शनि समाधि जडली घडिभर करिता ध्यान
अभयाचे वरदान लाभता शिवास परते भान
वळलि पाउले जिजाउच्या मग आपोआप महाली
डोइ तिच्या पदि ठेवी जुळवुन कर शिरपेचाखाली.
आशीर्वादुनि उपदेशाचे शब्द बोलली चार.
आणि आइच्या हृदयी आला भरून गहिवर फार.

स्फुंदत वदली : " आज अंबिके ! बाळे सुखरूप आण
सोन्याचे खण नारळ घालुन ओटी तुझी मी भरिन.
बाळा ! सावध रहा ! घातकी गनीम काळचाराती
हाती साखर देउन ठेविल कातर मानेवरती."
गळलि टिपे टपटप नयनातुन ओठि बोलणी विरली !
अन् मातेच्या चमकेसरशी लेकुरास कवटाळी,
तशीच शंभुच्या कपोलकुंभी दिव्यसुधा भरलेली.
मायेच्या मृदुमृदुल मुखाने जिजा पोटभर प्याली.
वैरी चिंति न जे ते चिंती मन मायेच्या पोटी
वाटे कुठल्या दरबाराला बाळे आपुली जाती ?

बाळे आशीर्वचकवचांना घालुन अंगि निघाली
अंति शिवाच्या गोड मुखातुनि अशि रसवंती स्रवली.

"आइ ! मुले ही वीरजननिची ! अमुची चिंता नलगे.
स्वराज्यलक्ष्मी बांधुनशेल्यामधि घेउन येइन गे.
प्रवासमार्गी विरतिल विघ्ने स्मरता तुझी चरित्रे.
वात्सल्याचे वारे लोटुन काटे काढिल सारे
आतपि मायमेघ तुझे शिरि धरितिल छाया दाट
मांगल्याचे सडे घालुनी शीतळवीतिल वाट
तव नयनांतिल ओज तेज नित देइल मजला धीर
संकटसागरी दीपस्तंभासम दावील गे परतीर.

त्यातुन झाले अशभ काहि तर आस जिवाची पुरवा
जन्मोजन्मी पिता शहाजी आई जिजा दे देवा."
स्वये पारखुन नीट घेतले लष्कर हजार चार
अल्पसंख्य परि रणशौर्याच्या गुणात अपरंपार
तुरा शिरीचा दाट सायटे किंवा साखरपाक
फुलाफळातिल मधुर आसवे दिव्य सुधेचा अर्क
तसे शेलके वेचक निवडक अगदी सैन्य सुरेख
सवे घेतले जाताना जणु वीररसाचा पाक
तसेच अव्वल राजनीतिपटु मुत्सद्दीही काही
विश्वासातील कारकून अन हुशार हुजरे काही.
असा निघाला धूर्त चतुर तो शूर शिवाजी राजा
वाटे कपटी बादशहाच्या, अमोल कामाकाजा.

बादशहाच्या सहिशिक्क्यांनी तिकडुन भूषविलेली
सगळ्या महालमोकाशांना ताकिदपत्रे आली.
सम्राटाच्या भेटीसाठी निघे शिवाजीराजा
मानमरातब ठेवा त्याचा समजुन मुलगा माझा.
सुभेदार अन फौजदार ते समोर मार्गोमार्गी
खडीच ताजिम देऊन जावे भेटीस जागोजागी.

राजा मानी! नका करू कुणि त्याची आनाकानी
अदब बजावित द्यावे त्याच्या दळास दाणापाणी.

ठायी ठायी अविरत उठवा सत्काराची झोड
तथा जपावा जणु अपुल्या तळहातावरचा फोड!
गोड गोड द्या सुधेसारखी दुधामधाची खाणी
शिंपा भवती चंदन अत्तर गुलाब वाळापाणी.
अश्व नृपाचा उभा राहिला औरंगाबादेला
सुभेदार परि मुजरा करण्यासाठी वरती न आला
धाडुन दिधले नृपा भेटण्या हलक्या अधिकाऱ्याला
न कळे राजा गमला त्याला का परसातिल पाला!
वाटखर्चीचा पहिला हप्ता देऊन राजाहाती
या गावी त्या गौरविणेची बोली ठरली होती.

सुभेदार मनि म्हणे–"कशाला करू मी हांजी हांजी
घरास माझ्या येऊन घेइल गाठभेट तो माझी.
तसाच इकडे मानी राजाचा जाउनिया रणगाजी
थेट उतरला जयसिंगाच्या विशाल वाड्यामाजी.
ध्यानिमनी कधि साहिल शिवबा हा असला अपमान ?
बाजुस व्हाया होई उतावळ तलवारीची म्यान.
क्षणात सुटला दौडत दूतहि त्याचा सुभापतीला.
सांगू लागला गर्जुन त्याच्या जहाल संदेशाला:
" सम्राटाचा भूप शहाजादा मानुन द्या मान
बादशहाचे सुटले आहे ना तुज हे फर्मान ?

काय वाटले तुला असे मी बंदा तुझा गुलाम ?
दैवी लिहिले, अरे तुझ्या तू करणे मला सलाम.
रुबाब जाइल म्हणून बसला तू का धरुनी ठाण ?
मोंगल मुलुखी अतिथींची का रतिभर नाहि गुमान ?

सम्राटाज्ञा तुडविलीस तू, नवल ना, पायाखाली
जाणिसि परि त्या पायि कुणाची मानहानी तू केली ?
असले नोकर मस्तवाल अन् नादानही जयाचे
नकोच बघणे या जन्मी त्या तोंडहि बादशहाचे.
परत चाललो याच पावली पाहुन असल्या रीती
कुणा घालिसी तुझी तुझ्या या बादशहाची भीती ?"

चालत आली अपुल्या पायी मग लाखाची थैली
सुभेदारही करि राजाला लवून मुजरा खाली !
स्वागत केले राजानेही त्याचे इतमानाने
परत भेटही दुसऱ्या दिवशी दिली तयाला त्याने.

डौले डौले अश्व नृपाचा मग आला आग्र्यास
राजस्वागत करण्या होती उभीच नुसती वेस !
ना सम्राट न अमात्य त्याचा ना मंत्री ना तंत्री
शिवराजाला सामोराही कुणी न आला द्वारी !
नाहि म्हणाया सम्राटाने तिथे रामसिंगाला
धाडुन दिधले होते एका लहान अधिकाऱ्याला.

चमत्कार हा बघुन नृपाच्या मुखात औंढा आला
क्षणात एका पुढील सारा प्रकार ध्यानी आला !
सैन्याच्या उपवनिच्या होता संगे पुष्पपराग
अवमानाचा असल्या यावा कसा न त्याला राग ?

चिंताजड मन होउन झाला राजा खिन्न विषण्ण
मंद पाउले टाकित गेला तसाच वेशीतुन.
आणि उतरला सैन्या संगे शिवबा रणबाजी
जयसिंगाच्या विशाल सुंदर भव्य हवेलीमाजी,

आग्र्याला या शिवरायाच्या आगमनाच्या समयी
ऐश्वर्याने दिपेल राजा असे करावे काही.
म्हणून वैभव सम्राटाने जमवुन अपरंपार
जन्मदिनोत्सव अपुला करण्या भरविला दरबार.
प्रचंड वैभवसामर्थ्याचे तयी प्रदर्शन भरवी.
हार न जाऊ जगात कोणा दिमाख ऐसा दावी.
भव्य चौथरा संगमरवरी रत्नखचितसा शोभे
स्थान तयावर मयूर-सिंहासना बसाया लाभे.
हासत होती हीरक-माणिक मौक्तिकपंक्ति विलोल
भेट पहाया जणु का आले अनंत तेजोगोल.
सहस्त्राक्ष का उघडुन अपुले सुंदर हजार डोळे
शिवराजाची सम्राटाची भेट पहाया आले.

" पृथ्विवरती स्वर्ग कुठे जर असेल तर तो येथे,
तर तो येथे, तर तो येथे; जगात इतर न कोठे ! "
अशी टपोरी सुवर्णाक्षरे भव्य द्वारावरती
प्रेक्षकनेत्रां आकर्षोनी डौले झळकत होती.
दरबाराचे वजीर सारे सजवुन घोडे हत्ती.
आले घालुन सर्वांगावर विशाल कवचे मोठी.
हिरे माणके रत्ने मोती अपार ते भांडार
अंगी धारुन शोभु लागले लक्ष्मीचे अवतार.
शिराशिरावर शिरपेचांची स्पर्धा चाले भारी
सुंदर वसने भरजरतारी झळकु लागली सारी.

फुलला मौक्तिक-मणि-सुमनांनी दरबाराचा बाग
तरवारीच्या पाण्याची कारंजी जागोजाग !
दरवळला किती पुष्पशशिचा सुगंध अपरंपार
चहुबाजूंनी चाले गुलाबपाण्याची कनुधार.

पाच पानडी हीना चमेली गुलाब वाळा खस ही
दिव्य अत्तरे दरवळली केवडा नि मोतीयाही !
सुचवु लागला सम्राटासम गंभीर नौबतखाना
उभा राहिला हात जोडुनी सभेत राणा राणा.
घोषु लागले दुंदुभिनादे बाहिर भव्य द्वार
सम्राटागमि दरबारामधि दुमदुमले ललकार.

असंख्य मुजरे कुर्निसात ते घेउन दाटीवाटी
येऊन बसली सिंहासनि ती बादशहाची मूर्ती.
कुणी सांगतो दगा न व्हावा म्हणुनी शिवास भिऊन
तो शंकात्मा गुपचुप आला मागिल दारातून.
सम्राटाने आत्मरक्षणा अंगि जिऱ्याची कुडती
दक्षपणाने घालुन केली खंबिर कंबरबस्ती.
झळकत होता शिरी हिऱ्याचा मोत्याचा शिरपेच
तशिच ठेविली बादशहाने जवळ हत्यारे पाच.
कवच धरिले सकळ निजांगे सूक्ष्मपर्णी शोधून
तरी गमे शिव बसला अंतरी का खंजीर धरून?

सम्राटाने शिवास गणिले होते सैतानात
गमले येईल तख्तावर तो उडून चाळिस हात.
म्हणुन ठेविले शूर शिपाई भवती हजार दोन
तख्ताभवती नाचत होत्या कट्यारि हातातून.
जनानखाना जमला होता लेवुन लेणी गोड
राजदर्शनासाठी बसला टपून पडद्याआड.
दरबाराची वेळ जाहली राजा द्वारी येई
राजदर्शनोत्कंठा उत्कट सभेस लागून राही.
सह्याद्रीचा सिंह उफाळुन गरुडाच्या गर्वात
उभा ठाकला चहुतर्फांनी पहात दरबारात.

महाप्रतापी राजपुरुष तो अतिशय तेजःपुंज
देशचि तेजः संकर्षाचा गमे असे ते ओज.
दिनेश्वराची साध्वी गेली भांबावून दिनश्री
गगनातुन कशि येथे आली पतिराजाची स्वारी ?
शिवराजाचा बालचंद्रही शोभे डाव्या अंगी
गमे नृपाच्या कमरेवर जणु कट्यार चमके नंगी.
दिसता राजा बादशहाची नजर बावरी होई
प्रभा दिव्य ती पाहुन सारी सभाहि टकमक पाही.
दिसता राजा, मयूरसिंहासनिच्या शिखरस्थानी
थिजून गेले नाच नाचता मोर पिसे उभवोनी.

राजमूर्तिते रामसिंगजी नेई थोडें पुढती
नृपसुत घेउन बादशहाच्या सन्मुख भेटीसाठी.
आले आडवे कठडे सोन्याचांदीचे ते तेथ
सम्राटाच्या सन्निध जाऊन शिवास देईनात.
शंभु भवानी शहाजि यांचे ठेवुन भाव मनात
तिथुन नृपाने लवुन केला तीनदा कुर्नीसात.
तसेच मोंगल सरदाराने करुनी मुजरे सात
रीतिरिवाजा धरुन केली राजाची रुजवात.
सम्राटाचा पन्नासावा जन्मदिनोत्सव तोही
म्हणून दिधला राजाने त्या उंची नजराणाही.

मस्तक उन्नत करुन वाघ मग डोळयां डोळा भिडवी
बादशहावर किरणे बांधुन अखंड टक शिव लावी.
बादशहा मग बोले : “आवो आवो शिवाजिराजे.
आनंदुन मन गेले पाहुन तुम्हाहि शंभूराजे.
कुशल असे ना घ-घ-घ-घ घरचे सगळे काही राजे?
पुढे सांगू हळु हळु अमुच्या मनात आहे जे जे !”

राजभीतिने बावरलेली बादशहाची दृष्टी
धावु लागली सैरावैरा सभेत आसऱ्यासाठी
नजर घाबरी बादशहाची फिरली आसमंतात
परि तिज दिसली शिवरविबिंबे हजार तलवारीत !

स्तंभी स्तंभी हिरेमाणके चमकत विलसत होती
परी त्यामाजी बादशहाला दिसे शिवाची मूर्ती.
झुंबर झाडे बिलोरि अरसे संगमरवरि कमानी
ठायी ठायी त्या सम्राटा दिसे शिवाजी मानी.
नवरत्नांची माला कंठी करीत होती हास
तीतहि राजप्रतिबिंबांचा गळयास भासे फास !
दृष्टि अपुल्या झगमगणाऱ्या मझलीनच्या झग्यात
लपुन बसाया आली परि तिज शिवाजि दिसला त्यात
काय जाहले न कळे कोठुन कोण कसे त्या भिववी;
सम्राटाच्या नयनी खेळे बसुन मायादेवी ?

बादशहाची नेत्रवंचना ही का दुसरे काय?
का बिंबप्रतिबिंबाचा त्या कळे न साधा न्याय ?
नजरानजरी करी जिवाचा पुरा घागऱ्याघोळ
सम्राटाच्या मुखांतरी ते लुळेच पडले बोल.
उजव्या हाती अमीर होते दूर तिथे जाउन
उभे रहाया बादशहाने शिवास केली खूण.
लगेच तिकडे रामसिंगने नृपास शंभुस नेले
राजे आणिक राजपुत्र ते नियुक्त जागी आले.
बादशहाचा कुशलप्रश्नहि नव्हता पुरता झाला
तयास अपुला जबाब द्याया पुरा न वेळहि आला.
तोच आपणा बादशहाने झटपट केले दूर
बघुन रीत ती राजा झाला मनात भारी चूर.

त्यात नेमिल्या जागी येउन बघतो आसपास
अमीर हलके उभे न उरली सीमा संतापास.
पुसिले भवती पाहुन करुनी ताठ मान नी पाय
कोण पडोसी ? यांची दौलत दानत दर्जा काय ?
जबाब देई विनम्रतेने रामसिंग सरदार :
"अमीर अमुचे पंचहजारी असती मनसबदार.
अपणावरचे शेजारी हे जोधपुराचे राणे,
महाराज जसवंत सिंगजी असति उभे अदबीने."

क्रोधाग्नीच्या ज्वाला उठल्या राजमुखातुन अंती
"बादशहाची मानायाची अम्हांस ही का रीती ?
ज्याच्या खाली नेमियली ही जागा आम्हासाठी
रणात त्यांनी अम्हां दाविल्या हजार वेळा पाठी.
पळुन रणातुन लपून बसणे अपुल्या उंबरघाटी
हीच जयांची जगात गाजे उदंड कीर्ती मोठी;
त्या या भेकड नामर्दाच्या वाऱ्यास क्षणभरही
सह्याद्रीचा सिंह रहाया मुळीच राजी नाही.
नामदारखानाविण एका मर्द न दिसे कुणीही
हाति बांगड्या भरून पळाल्या रणात भागूबाई !

सम्राटाने उल्लंघियली सीमा अपमानाची;
रामसिंगजी ! झटकन अपुली कटचार द्या कमरेची !
हात जोडुनी उभे रहाया का मी तुमचा कैदी ?
स्वतंत्र जागी बसावयाची अम्हास का ही बंदी ?"
सह्याद्रीच्या वनराजाची अशी गर्जना झाली
मधि गाळण उडाली दरबाराची प्रचंड खळबळ झाली.
अस्फुटपणि ही शब्दाशब्दी सम्राटाच्या कानी
पडता पुसिले : काय जाहले ? काय जाहले ? त्यांनी.

रामसिंगजी चतुरपणाने वदले बादशहांना
खाविंदांना का चिंता जरि झाला काहि करीणा ?

दख्खनचा हा वाघ जंगली बहुत असे हयवान
गर्मा होऊन पडला त्याच्या जीवास थोडा ताण.
खळबळ दिसता बादशहाच्या मनि आशंका आली
भलतेसलते होइल का ही उरात धडकी भरली.
आणि बोलला, "जा राजाला घेऊन डेरीयाला
आधी बाहिर नेउन शिपा गुलाबपाणी त्याला.
अताच त्याच्या मुलाजमतिची हाजत नाही काही
ठरेल तीही पुढे कधी तरि दिवसामासांनीही."
आज्ञा होता रामसिंगजी नृपास घेउन गेले
राजपुत्र नी राजाचेही लोक हवेलिस गेले.

राजा जाता निघून होता ना गाठी ना भेटी.
बादशहाला खऱ्याच झाल्या संतोषाच्या कोटी !
आणि बोलला, " डोळा दिपला नजरानजरी होता
कोण विलक्षण तेज तयाचे तसाच त्याचा ताठा.
खरेच गमले उडुन घालतो झडप आमुच्या तक्तो
निघून गेला बरे जाहले आफत टळली मोठी. "
बोलुन इतुके क्षणात केला दरबारहि बरखास्त
ठेवि नृपाच्या डेऱ्याभवती खडी लष्करा शिस्त.
पुलादखाना नेमुन केली खबरदारिची बात
"डेरे ठोकुन राजा भवती खडा रहा दिनरात.

त्यासाठी तू हे घे कडवे लष्कर हजार पाच
हलेल कैसा असा घाल तू गळ्यास त्याच्या काच."
सम्राटावर राजाचा परिणाम जाहला घोर
बंद जाहले कायमचे त्या ते दुनियेचे दार.

कुणी सांगती कथा भेटिच्या स्थानाची खरी न्यारी
भेट न झाली वैभवशाली ठरलेल्या दरबारी.
वाटा चुकल्या वेळा हुकल्या दोनहि दरबारांच्या
वेळा सरता तेथुन उठल्या स्वाऱ्या सम्राटाच्या
नेमियलेल्या अधिकाऱ्यांच्या गैरसमजुती झाल्या
मोंगल मोंगल घाली गोंधळ वाटेचा वाटाडचा.

दिवाण–ई–आम, दिवाण–ई–खास मधि ती घडली नाही
शिवराया त्या चुकामुकीचा अर्थ कळला काही.
दरबाराला शेवटच्या ये दिल्लिपतीची स्वारी
होइ भेट शिव सम्राटाची अंति स्नानागारी.
राजस्तानी कागदपत्री बादशहाची भेट
स्नानागारी घडली ऐसे स्वच्छ नोंदिले वृत्त.
रामलालची दफ्तर पत्रे संशोधकांस साची
खरीच गमती एक कसोटी विश्वसनीयत्वाची.
भेट कुठेही घडली असली तरी तिचा परिणाम
जो घडला तो कायम ठरला निर्णय निश्चय ठाम

असा शेवटी दख्खनचा तो गरुड महत्त्वाकांक्षी
सम्राटाच्या कपटपंजरी अडकुन पडला पक्षी!
तोडायाला काळाची ती मगरमिठी वा कोंडी
तोहि मराठा धिमा गडी परि युक्त्या शोधुन काढी.
प्रथम धाडिले अपुल्या वकिला राघो बल्लाळाला
सादर केला अर्ज नृपाचा त्यांनी बादशहाला.
खऱ्या न केल्या बादशहांनी ठरवियलेल्या बोली
या गादीच्या सेवेची ही सुसंधि वाया गेली.
स्वारी नाही, शिकार नाही, जाणे येणे नाही
असल्या पाहुणचाराची या जिवास गोडी नाही.

तूर्त तरी या दौलतिचे नवकार्यहि काही नाही
तुम्ही अम्ही ती घेउ हिरावुन पुढेहि आदिलशाही.
सख्यसलोखा टिकता राहिल या गादीचा मान.
कालौषधिने अपमानव्रण येइल हाहि भरुन.
वाट पाखरासम जयसिंगहि माझी भिरभिर पाही.
म्हणून लेकुरा जाया द्यावा परवाना लवलाही."
कुरु कुरु बोले बादशहाचे कलम गोड हे पाही:
"धीर धरावा! मनासारखे होईल सगळे काही."
सम्राटाच्या जीवास इकडे संभ्रम जडून राही
की राजाला या वचनातील इंगित कळले नाही.

दिलादिलांचा दरिया दरिया दुनियेतील धुंडोनी
प्याला होता राजाही बारा बंदरिचे पाणी !
काही दिसांनी पुन्हा शिवाने लिहिले सम्राटाला,
मिठी कराया ढिली टाकिले आमिष हे मगरीला.
इथेच राहुन अम्ही करावी कायम सेवा काही.
अशि जर मर्जी खाविंदांची मान्य असे मज तीही
मनात मनिंच्या खरेखुरे जर असेल असले काही
तरि हा सेवक सम्राटाच्या शब्दाबाहिर नाही !
दिल्लीपतिच्या बाहुबळावर देशि विदेशि कुठेही
या दौलतिच्या उन्नतिसाठी धुंडु दिशाही दाही.

बादशहांच्या वैभवशाली या शिरपेचासाठी
मीही माझ्या प्यार जिवाचे बनविन माणिकमोती.
साम्राज्यातिल काटे काटे काढुन सगळे काही
पायाखाली मम हृदयाचा पसरिन गालीचाही.
पाताळीचा शेषहि आणिन अपुल्या शयनासाठी
महेंद्र आणिन छत्रचामरे मस्तकि धरण्यासाठी.

स्वारीवरती परदेशामधि द्यावे मज धाडोनी.
अशि चाले मनि गुणगुण आपुल्या असू द्या कानी.
शिपाइ माझा एक एक हा जणु शौर्याची खाण.
करावया द्या परवाना मज लष्कराची ने आण.

हुकमत माझी लष्कर माझे असेल तर हा स्वार.
घालील पायाखाली काबुल आणिक कंदाहार.
परंतु हेही बादशहाच्या नसेल येत मनास
तर हे लष्कर माझे येथे ठेवू मीहि कशास ?
धाडुन देतो इथून आता सेना माझी सारी.
उगाच खर्चुनि का चारावा तिज मलिदा सरकारी ?
म्हणून तिजला गावी जाया आज्ञा द्या लवलाही.
माझ्या लोका दक्षिणच्या ही हवाहि सोसत नाही.
तळमळेल घरधनीण माझी ! आइहि माझ्यापायी.
कुटुंबवत्सल मीहि इथे त्या आणविन सगळ्यांनाही."

राजा अगदी असाह्य दुबल होइल जाता फौज
म्हणुन वाटली बादशहाच्या मनास मोठी मौज.
शिवनाशाचे सकल मनोरथ जातीलहि सिद्धीस
सापसुरळिचे भय मग कुठले उरेल साम्राज्यास ?
असल्या पापी विचारलहरी आल्या मनि बहरुन
बादशहाही गेला भारी मनात आनंदून.
म्हणुन तयाने दिली मान्यता जाया नृपसेनेस
गमले आपोआप नृपाच्या गळ्यास पडतो फास
उलगडली नच पहाडच्या त्या चुव्याची तोड
अन यमुनेतिल मगरीने ते आमिष गिळले गोड !

गुप्त मुलाखत घेउन राजा अपुल्या सेनापतिंना
सांगी सारे समजावुन ञणि निघून जाया त्यांना.

नेमियलेल्या नेताजीच्या जागी प्रतापराव
महाप्रतापी सरनोबत तो ! योग्यच त्याचे नाव.
जा म्हटले तर जाईना ! ते पाउल हले न तिळही
जीव तयाचा घोटाळे किति शिवरायांचे पायी.
आणि बोलला कळवळुनी जीव, "असल्या रिपुच्या धामी
टाकुन राजा ! तुजला नाही मुळीच जायाचा मी.
मायबाप सुतसुरादिकांचे सुटले माया-पाश
सात पिढ्या परि तुटणे नाही या चरणांचे पाश!

नेत्र नको तू विस्फारु मजवरती, राजा, रागे.
सोसेना जे घडेल त्याचा विचार माझ्या मागे
त्यातुन जावा निघून देह हा गमेल तर तलवार
घेउन टाकी माझे छाटुन तुझ्याच हाती शीर."
नंतर बोले धैर्यशांतिचा अगाध सागर राजा :
"तुम्हा सांगतो–जा सगळे जा जगवाया जीव माझा !
दुराग्रहाने रहाल येथे तर होइल निःपात
तुमच्यासंगे माझाही पण होइल कायम घात !
इथुन माझ्या सुटकेसाठी म्हणून तरि जा सारे.
पाठ करावी लागे तैशी वाहिल जैसे वारे

सोडुन आग्रा लपवुनि शस्त्रे अगदी साधी भोळी
नाना सोंगे रुपे घेउन जा हिंडा भवताली.
पुढे तुम्हाला हळुहळु कळविन मी माझे सगळे बेत
सुटकेचेही यत्न करोनी मिळविन मी यश त्यात."
राजकारणी दूरदृष्टिचे ऐकुनि बोल नृपाचे
काही झाले समाधान त्या सेनापति हृदयाचे.
अंति बोलला : "अंबे ! तुझिया पदरी अमुचा प्राण
गहाण ठेवुन जातो त्याला जपून गावी आण."

राजाज्ञेने सोडुन आग्रा एक एक ते गेले
कुणी संन्यासी, कुणी बैरागी, कुणी फकीरहि झाले.

अपुले घोडे, अपुली शस्त्रे मिळतिल काळच्या राती
ऐशा स्थानी ठेवुन हेरांकरवी वृत्ते घेती.
आग्र्यामाजी शिवराजाचा श्वास जसजसा चाले
तसे हजारो बैराग्यांचे हे दळ हाले डोले.
राजे बसले, उठले, निजले, सगळे त्यांना कळले
हेरांचे जगि असले कधि कुणि विणिले नाही जाळे.
असा संकटी डगे न शिवबा धीर धिमा रणगाजी
डाव बांधुनी मनात केली फिरुन त्याने अर्जी:
"गुरुदिन मंगल पवित्र म्हणुनी करितो मी उपवास
दानधर्मही करावयाची जिवास मोठी आस !

ठाउक आहे बादशहांना माझी शंकर भक्ती
जगदंबेस तशीच माझी श्रद्धा उत्कट मोठी.
म्हणुन बेलाफुलाफळांचे आणवुन हारे थोर
श्रीशंभूची बांधिन म्हणतो त्रिकाळपूजा प्यार.
फुले फळे आणिक मेवामिठाइ हरदिनि खास
देवाधर्मासाठी धाडिन करून हस्तस्पर्श.
आता मोंगल दरबाराचा झालो मी उमराव
म्हणुनी भेटिस येऊ द्यावे तुमचे मोठे राव.
मांडलिक ते या गादीचे देशदेशिचे राणे
त्यांना प्रेमे देइन म्हणतो मानाचे नजराणे.

म्हणून पूजापत्री आणिक मेवा देवादाना
हरदिनि आणुन धाडायाचा द्यावा मज परवाना."
रामसिंगजी अन् बाळाजी अवजी चिटणिस चतुर
हे वळवाया मंत्र्यांनाही झटले वारंवार.

अखेर वळला अर्थमंत्रि तो थोर रहुल्लाखान
विनवुन बोले सम्राटा : द्या राजविनंतिस मान.
कर णे दानधर्म, राजाचा हेतप्रीत न अन्य
सहजासहजी बादशहाने विनंति केली मान्य.
राजाला ही दिली अनुज्ञा का कुलुपाची किल्ली ?
का वेशीच्या दरवाज्याची दिंडी त्या उघडिली?

एकामागुन एक करंड्या सुटू लागल्या पाही
देवापायी दानापायी कधी अमीरापायी.
शरामागुनी शर सुटती रणि गणति जशी त्या नाही
तशा करंड्या असंख्य सुटल्या पळभर त्या खळ नाही.
देउळराउळ मशीद तक्या आणिक कबरस्थाना
धाडि मिठाई परि फकिरा मुरशिद– गोसाव्यांना.
मेवा मिळता वानु लागली लहान मोठी सारी
खराच दिसतो सात्विक धार्मिक उदार राणा भारी.
मार्गोमार्गी पेटाऱ्यांची किति चालें रहदारी
चौक्यावरती येउन पडली भलती जोखमदारी.

जोखिम मोठी म्हणून केला कधी न कानाडोळा
पेटारे ते कसुन तपासुन पाहि पहारेवाला.
होते पलिते पाजळलेले निशिदिनी घोडेस्वार
भंवति शिवाच्या तळपत होती कट्यार पाच हजार.
तेल घालुनी डोळ्यामाजी बघती करुनी तपास.
नेम न केव्हा लाविन राजा गळ्यास वाटे फास.
जाब पुसावा हटकुन दिसता कुणीही येता जाता.
मुंगीलाही वाट मिळेना कडक पहारा मोठा !
कलेकलेने दिनानुदिनि जशि येइ वृद्धि चंद्रास
वा लाटांवर लाटा सुटती भरतीच्या दरियास

अथवा निर्मळ गगन–पटावर एकामागुन एक
संध्यासमयी ठुमकत येती कशा चांदण्या लाख ?
तशाच बघता बघता जाता दिवसामागुन दिवस
मिष्टपेटिका संख्या लागे हरघडि वाढायास!
तपासणीमधि घडिभरही दम पुढे मिळेना झाला
एक तपासुन होतो तोवर खडाच दुसरा झाला.
पेटारे तरि किती पहावे? चौक्या भरून गेल्या
बघता बघता त्याहि बापुड्या अंती व्याकुळ झाल्या.
अशा कारणे होऊ लागली ढिलाइ आपोआप
त्यात कळवि नृप बादशहाला तपासणीचा ताप.

रागे रागे अर्जी खरडुनि धाडियल्या तक्रारी:
“ किती पहारेकरी कितीदा तपासती पेटारी ?
खाविंदांनी दिधला मेवामिठाइचा परवाना
परि तो तुमचा दिसे पहारेकरीच मोठा शाणा !
किती सारखे पेटारे तो उलटुन पलटुन पाही
का साम्राज्यी जन्मांतरि त्या मिठाइ मिळली नाही ?
वेडा कुठला ! बाहेरुनहि किती निहाळुन पाही
का वाटोळी वेळूची कधि डाली पाहिलि नाही ?
इथे माणसे लहानमोठी अशीच का ही सारी
ज्याच्या त्याच्या मतास खाई आशंका–कृमि भारी.

दानधर्म या तपासण्यांनी वेळी साधत नाही
देवा माझ्या नियुक्त वेळी मिठाइ पोचत नाही.
प्रभात काळी नैवेद्याला धाडियलेला मेवा
नवल नव्हे का सायंतनिही मिळे न माझ्या देवा ?
बादशहाच्या परवान्यांना मूल्य नाही का येथ ?
नातरि कळवा माझा मीही करीन बंदोबस्त.

बादशहाने खवळुन जाता असा मराठा मर्द
उठविली सक्ती तपासणीची हा होता उपमर्द.
त्याहि कारणे अधिक शिथिलता आली तपासणीत
त्यातुन होता नृप चौकीचा करीत ओला हात !
असो, अशा या येता डाली अमीर डुलवित माना
मिटक्या मारित खाउ लागले तो उंची नजराणा.
बोलु लागले सज्जन दुर्जन आणि पहारेवाले
ठेवावे त्या कोंडुन ऐसे काय नृपाने केले ?
पुढे गोकुळाष्टमीस आली यात्रा दाटोदाट
जमले मथुरा गोकुळवृंदावनि बैरागी लाख.
याच मुहूर्ती सह्याद्रीच्या सिंहा ग्लानी आली
कण्हू लागली शय्या त्याच्या व्याकुळ कायेखाली.
एकाएकी वनराजाला कुठुन वेदना आली ?
दाढा मिटल्या! नखे गळाली ! अयाळ पडली खाली.

राजशिरीच्या उंच तुऱ्याचा तोल अकल्पित जाई
स्वातंत्र्याच्या मंदिराचा कळसच का कल खाई ?
एकाएकी ज्योत दिव्याची अशी मंद का झाली
कुठुन कशाची रविबिंबावर दाट साबली आली ?
पंख पसरुनी पोपट पंजरतळि का पडला खाली ?
व्याधकरातिल गरुडाची का फडफड बंद झाली ?
क्षुब्धजलाब्धिस एकाएकी कशी स्तब्धता आली ?
शांत सागरी कशि पोलादी नौका उपडी झाली ?
समुद्र मंथुनि सुरादिकांनी रत्ने उचलुन नेली
हालाहल शिवमुखि पडणे ही सटवाईची बोली.

विषप्राशनी शिवदेवाला ही का झापड आली ?
कैलासाच्या शिखरी शिखरी डळमळ डळमळ झाली.

त्यात मुलाची माया नयनी उचंबळोनी आली
सरदारांच्या मुखमंडलिही चिंताभ्रे घन आली.
बाळाजी अवजी, तानाजी मालुसरे, राघोजी.
थोर निराजी, हिरोजी फर्जंदहि होते त्यामाजी.
उशापायथ्या हकीम बसले उपचारहि बहु केले
परि मुळी नव्हते जे दुखणे ते वाढत वाढत गेले!
आत सारखी ओढ लागुनी पडे नृपाला शोष
कुणी फिरकला अंगणि तरि त्या होउ लागला त्रास

चौकीदार कथिले : "द्यावा त्रास न मुळि राजास.
अरतुन परतुन फिरू नये कुणि राजाच्या आसपास."
जयसिंगाचा इमानि बेटा रामसिंगजी मोठा
अहोरात्र त्या राजासाठी खडाच पायी होता.
मिर्झा राजा जयसिंगाच्या धरुनी शिरी वचनाते
मांडी त्याच्या मान ठेवुनी राजे आले येथे.
भंगुनि वचने कोंडुन कारागृहात राजालाही
चांडाळाच्या पापाचे का रांजण भरले नाही?

भलेबुरे शिवजीवा होता होइल कसला खेळ ?
बादशहावर दुनिया सारी ठेविल कायम बोल."
बोलु लागले असले काही सरदारहि रजपूत
पसरलि चिंताछाया साऱ्या त्या आग्रा शहरात !
मुळिच भरवसा नाही राहिला सम्राटाच्या वचनी :
गाजावाजा सारा गेला बादशहांच्या कानी.
अंतःपुरात बसलेली ती खवळुन इतुक्यामाजी
नागिण बोले बादशहाला, "फिराद ऐका माझी.
पुण्यात बोटे माझ्या पतिची छाटिली त्या दुष्टाने
तसाच मुलगा माझा तेथे चिरला याच खुन्याने.

घडि न दवडता नराधमा त्या द्या माझ्या कबजात
केल्याविन का सोडिन त्याचा फोडन नरडे अंत ?"
तोच कुणि दिला एक लखोटा बादशहाच्या हाती :
"कळते केली बादशहाने वचने अपुली खोटी ?
भाक दिली मी शिवराजा हो–'रक्षिन तुमचा प्राण'
खाविंदांनी मनि घ्यावी ही रजपुतांची आण."
तसाच दौडे स्वार चहुखुरी रामसिंगच्या गोटी
लगबग काढुनि एक लखोटा दिला तयाच्या हाती.
"सावध! होइल घातपात बघ शिवास काळचाराती.
तुझ्या पित्याचा जीव गुंतला भाके शिवबासाठी!"

मारावा तरि कठीण सोडुन द्यावा तरि तो जाच
असा अता मनि बादशहाच्या पडे दुहेरी पेच !
जनमनसागर खळबळुनी किती उठले असे खळाळ
परंतु राही बादशहाचे संथच पाणी खोल !
बादशहाच्या मनास संशय–पिशाच्च बिलगुन राही
आणि करी तो निशिदिनि मत्सर अपुल्या छायेचाही !
खोल मनाची घडण तयाच्या अनंत पाताळाची
तद्-हृन्मंदिर–रचना होती भुजंग वल्मीकाची !
नाक तयाचे श्वानाचे अन् विषसर्पाचा दात
नजर तयाची गरुडाची अन् असे खुन्याचा हात !

नाहि काढिले इतुके झाले तरि उलटा आवाज
खोल मनाचा बादशहा तो अथांग कावेबाज !
मुत्सद्देगिरि भरली त्याच्या रंध्रारंध्रामधुनी
कपटनाटकी खलनायक तो पुराच कारस्थानी.
खेचुन काढिल कोळी मासा अनंत दरियातून
छेदुन पाडिल कुणी धनुर्धर गरुड गगनातून.

शोधुन काढिल पिनाकपाणी महातपस्वी कोणी
घाव घालुनी काढिल कोणी भूगर्भातिल पाणी !
अशक्य अद्‌भुत असेहि केले अचूक कोणी काही
अगाध मन परि बादशहाचे कुणाहि कळले नाही.

शिवास कोंडुनि मारायाचा धरुनी हेतु मनात
तयास न्याया सांगि फिदाईखानाच्या इमल्यात.
तिथे योजिला प्राणघातकी भलता कपटी डाव.
गुप्तहि इतुका की न कळावा खुदास त्याचा ठाव !
बुद्धिबळाचा डाव रंगला होता तद्‌ हृदयात.
वजीर हत्ती घेरत होते राजाला दिनरात !
गमे तयाला पुरी नृपाच्या गळ्यास बसली तात
आता अगदी हाता आली राजावरची मात !
दिल्लीपति हृत्सागरि टाकी नव्या विचारी पाशा
शोधु लागला रामसिंगही त्याच जळातिल माशा !

धनतेजाच्या बुळा मारुनी खोल खोल पाण्यात!
शोधि पटाइत पाणबुड्या तो विषमणि अब्धितळात.
अर्थ–मंत्र–बळि नागकन्यका वश करि कावेबाज
हाती घेऊन आला वरती नागमण्यांचा साज!
अधि कान्यांच्या मृदंगमुखि पडता कणकेचे गोळे
गोडगोडसे आतुन त्याला हवे हवे ते आले !
राजस्वस्तिक्षेत्रनिमित्ते आला शिवा पुसाया
हळुच बोलला : क्षणही येथे राहु नको शिवराया.
लोटाया तव जीव यमाच्या कराल दाढेमाजी
उदईक नेतील शिवबा तुजला नव्या हवेलीमाजी.

म्हणती बांधिले तुझ्याचसाठी ते मानाचे स्थान.
परि ते कपटी बादशहाचे नवीन कारस्थान

अंतर्भागी श्वासासाठी हवा न शिरकायाची
असली रचना तुझ्याचसाठी केली त्या इमल्याची.
दवडशील तू इथेच जर हा आता सायंकाल
दिसेल का पुनरपि नयनाला हा दख्खनचा लाल ?
नृपप्रसंगावधान संकटि ऐन भरा या येई
तशीच वर्णिल कोण तयाची तत्परता चतुराई ?
गुप्तमीलनस्थान ठरविले क्षणि नगराबाहेर
शिवास घोडा तिथे ठेविती जिवलग घोडेस्वार.

हेरांना चहुफेर सांगुनी देशावरती सगळ्या
क्षणात एका लाख योजना शिवरायांनी केल्या.
नाना जिन्नस मेवा केला खरीद बाजारात
आणिक झटपट भरला मोठ्या दहाही पेटाऱ्यात.
अन् बोलावुन हळुच घेतले हिरोजि फर्जंदास
अंगावरचा साज उतरुनी तो चढवियला त्यास.
घालि अंगठी काढुन अपुली मग हिरुच्या बोटात
फिरवि तयाच्या तोंडावरुनी मृदु मायेचा हात.
शेला घालुनि अंगावर त्या मंचकि निजवी शांत
दिसू दिला अंगठिचा त्याचा अर्धा उघडा हात

आणि जयाचा राजावरती होता जिव कुर्बान
त्याहि 'मदारी म्हेतर' मुलग्या बसवि चुराया चरण.
आणि बोलले : " पडल्या पडल्या सावध रहा हिरोजी.
माझ्या सुटकेसाठी होई घडिभर तूच शिवाजी.
वरी संकटी उडी घातली हिरु तू माझ्यासाठी
सोडुन जाता तळमळते मन तुझ्याहि जीवासाठी.
काळ्या राती गहाण ठेविति माझ्यासाठी जीव
लोटुनि संकटि त्या जाणे हे कसले निर्घृण दैव ?

क्षणी इमानी थोर हिरोजी आतुन पुटपुटलाही:
"तुझ्याविना जिव माझा राजा कवडीमोलहि नाही.

पळ न थांबता निघा निघा जा सुखरुप राजगडी जा.
ओवाळुन तुजवरुनी राजा ठेवियला जिव माझा."
अशी किती किती बिनमोलाची वचने पुटपुटलाही.
काय सांगु ती अर्थ तयांचा शब्दी मावत नाही!
राजपुत्र नी राजे प्रार्थुनि मग अंबेसि मनात
पेट्या घालुन त्यामधि बसले निवान्त पेटाऱ्यात!
मिठाइचे ते पेटारे मग ठेवुन आगेमागे
पेटारे हे दोन चालले मधेच लगबग वेगे.
जीवननौका नाचे ज्याची नित वादळवाऱ्यात
आज तयाला श्वसनास:ठिहि झुळूक नाही आत.

होते नंग्या समशेरीचे भवती खडे पहारे
तरिहि न शिवले मनास त्यांच्या काही संशयवारे.
चौकीवरचा एक पहारेवाला परि त्या पाहे.
'कोण तुम्ही रे? कुठे चालला? कसले हे पेटारे?".
ते मोलाचे मजूर खाउन खजूर होति फितूर
टेकुन चटकन ओझे खाली बोलति त्यास हुजूर.
"पेटाऱ्यामधि या हातांनी आम्ही मेवे भरले.
हा राजाचा मेवा खासा खाशा वजिरा चाले.
चार बुचुकल्या घ्या की तिकडे कुणी मरो वा वाचो.
मायबापही तुम्हीच अमुचे ! कुणा न बोलायचो."

तरी पाहिल्या पुऱ्या तपासुन डाली पहिल्या दोन
नुरली शंका दिसता मेवामिठाई उंची छान.
पेटारे मग पुढे चालले झपझप पाउलचाली
जगदंबेच्या थोर कृपेच्या उदंड छत्राखाली.

असे चालले पेटारे मग येइ मीलनस्थान
गेले ठेवुन मेवा तेथुन मजुरही परतून.
ते मिळण्याचे ठिकाण होते सुंदर एकान्तात
मेवा घ्याया शिवशाहीचा आला उजवा हात !
करंडचातुनी दोघे उठले परि ती बेडर मूर्ती
निघून गेली सांगुन, 'येतो जाउन यमुनाकाठी.'

काळी रात नि:त्यात भयंकर झालेली बरसात
तुडुंब भरुनी उसळत होती यमुना काठोकाठ !
राजा राही बघत किनारी नृत्य नदीचे वरुन
पोहत होते परि मन त्याचे विचार लहरीतून.
श्रीशिवदर्शनि आला गहिंवरुनी यमुनेचा ऊर
आनंदाचा पूर भरे का तिज हा अपरंपार.
आला भरात तांबुस काळचा पाण्याचा तो खेळ
भिववित होता भल्याभल्यांना तो यमुनेचा डौल !
खदखद हासे ! थयथय नाचे ! उंच उडया घेउन,
भवरा करुनी लाटांचा कटि पदर धरी अवळून.

अपार जळ किति जवळ परी तिज लागे कसलि तहान !
कोणासाठी किनारी ये पुन्हा पुन्हा उसळून ?
अर्पायाला जिवलगास जी ठेविलि हृदयि जपून
ती मणिमोती कोणासाठी देइ इथे उधळून ?
लाट नाचरी यमुनेची भिरभिरुनी झिम्मा खेळे
टाळिस टाळी देउन माना, मुरडुन नौका डोले !
नौका बांधुनि बसला होता कोळी एक किनारी
नृप विनवी त्या, 'ने मजला तू पलीकडेच्या तीरी.'
कसरत पाण्यावर करणारा पटाईत तो कोळी
वदे, "काळि या जाउ नको तू, पिसाट यमुना झाली.

वसुदेवाच्या बाळाही हे जळ अजि शमणे नाही.
रात सरु दे ! ओसरु दे जळ ! डोई अमुशा येई.
लाट फुटोनि टाकि उसासे काळा पिवळा फेस.
हे जळलक्षण कुणावरी तरि संकट सुचवी खास !
पाण्याची ही धार भयंकर वाटे विश्व–विनाशी
पळात एका समिंदराच्या तळात वाहुन जाशी."
शिवराजे सांगती तयाला: "मुलगा पल्याड मरणादारी
भेटिस मुकता पडेल जाणे मज वरच्या दरबारी.
पोरबाळ तुज नाही कारे ! करुणा आटली सारी ?
त्वरा करोनी ने मजला तू पलीकडेच्या तीरी.

सोड नाव ती नाव घेउनी श्रीहरिचे यमुनेत.
ना तरि लोटुनि तिला स्वये मी नेइन रे वल्हवीत !
आणिक सांगिन बादशहाला धरुनि जिवाच्या मोहा
अंतकाळाच्या भेटीस नेइ न चुकार-नावाडी हा!"
वल्ही घेउनी नाव हकारी सांभाळुनिया तोल
नावाड्यासह सुखरुप गेला राजा यमुना पैल.
अन् उजवा कर ठेवुनि नौकादंडी शपथा मार
की सम्राटा कथिन शिवाजी इथुन गेला पार

आणि बोलला– ओळखिले का मज कोळ्यांचा राजा?
निरखुनि बघ मज नीट गड्या मी असे शिवाजी राजा
आण घेउनि नावाड्याच्या दृष्टीबाहिर गेला
पुरात टाकुन उडी पुन्हा तो अल्याड पोहत आला!
शोधायाला निघतिल आपणा दक्षिणपथि सरदार
म्हणुन निघाले उत्तरमार्गे घेउन घोडेस्वार.
आग्रा सुटल्यापासुन अवघ्या सहाच घंट्यामाजी
राजस्वारी दौडत आली पवित्र मथुरेमाजी.

आप्त पेशव्याचे कृष्णाजी, काशीजी नि विसाजी
कुणास ठाउक कसे नेमके आले मथुरेमाजी.
तिथे पोटच्या गोळ्याचे मग रक्षण करण्यासाठी
सुपूर्त केले संभाजिस त्या त्रिवर्गबंधूहाती

आणि बोलले—हृदयसंपुटी सांभाळा ही ठेव
भलेबुरे जर झाले माझे तर हा तुमचा देव !
देशि न आणा स्वाक्षरिची मम पत्रे आल्यावीण
तोवर अगदी झाकुन ठेवा हृन्मंदिरि हे रत्न.
व्यूह भेदुनी सह्याद्रिप्रभु मथुरानगरिस आले
परि रसिका, बघ आग्र्यामाजी धांदल कसली चाले !
रात्रीचे ते प्रहर चार अन् दिवसाचेही तीन
राजमंचकी शेला घेउन हिरोजि राहि निजून.
रात्र उलटली, दिवस उतरला, आणि वाजले तीन
तरि राजाच्या हलचालीची काही दिसेना खूण.

वेळ लोटला किती तरी कुणि येत जातही नाही
आज कुणाचा कसा मुळीही इथे राबता नाही.
इतुकी कसली पार बिघडली तबियत राजाची ही
असे लागले बोलायाला लोकहि काही बाही.
चौकीवरचे लोक किती तरि घडिघडि पाहुन गेले.
पाहतात तो शेला घेउन शिवराजे निजलेले !
“राजे इतुके निद्राकुल का ?” पुसती वारंवार
पोर सांगतो : “शिवराजाचे फारच दुखते शीर.”
पायि चोळणा मुंडासे शिरि मग अपुले चढवून
उठुनि चालला पोर घेउनि हिरुही कोठीतून.

जाता जाता चौकीदारां सांगितले निक्षून :
“याच पाउली दवा घेउनी येतो मी परतून.“

शिर राजाचे दुखते हिंडू न द्यावे कुणि आसपास
कोठडित कुणी जाइल तर त्याला मना करावी खास.
तिथून हिरुची स्वारी भिडली रामसिंगच्या गोटी
एकान्तामधि कथिल्या त्याला अपुल्या सगळ्या गोष्टी.
आणि बोलला गुपिते ही तू हृदयसंपुटी ठेवी
तुझ्या जिवावर जातो आता खुशाल अपुल्या गावी.
जबाबदारी टाळाया करि बादशहाशी युक्ति
नातरि खापर दोषाचे तो फोडिल तुझिया माथी.

आणिक झटपट धरिला अपुल्या मग देशाचा मार्ग
धीट मवारी म्हेतर मुलगा चाले मागोमाग.
रामसिंगजी करि मग जाउन बादशहाला अर्ज
नृप आजारी ! झाले त्याचे दर्शन मजला वर्ज्य.
कसे वाहते त्याचे तारेवारे कळतहि नाही
भलेबुरे जर झाले तर मजवरती जोखम नाही.
मुळापासुनी चौकीवरती हुकुमत माझी नाही.
क्षमा करावी कैफियत का रुचेल खाविंदा ही ?
बादशहाही बोलेः " त्याचा तुम्हा इलाखा नाही
राजा बंदी अमुचा त्याच्या दरम्यानहि तुम्हि नाही.

चौकी दिधली अलाहिदा त्या तुम्हां इतल्ला नाही
राजाविषयी बोल तुम्हावर मुळीच कसला नाही."
असा लोटला वेळ तरि कुणा खरे कळे ना काही.
शिवमंदिरि त्या मुळिच कसली हालचालही नाही.
इतुक्यामाजी एक पहारेवाला पुलादखाना
येउन बोले होउन कासावीस नि केविलवाणा.
"शिवपुन्यात का आज दिसेना चिटपाखरुही कोणी.
गेलो राजक्षेम पुसाया शिवमंदिरि मी म्हणूनी.

कुणि तरि मंचकि पांघरलेला दिसला शेला नीट
राजे निजले काय पहाया जिवास केले धीट.

शेल्याखाली बघता दिसला मउ गिरद्यांचा गोळा
चाचपताना ये आशेचा हाती चोळा मोळा.
कळत न कळता सहज डिवचता जसे मधाचे पोळे
शोषुन मध ते गगनि पसरते मधमाशांचे जाळे.
तसेच शिवपूर–मधुकोशा कुणि भृंगे घेउन गेले
आणिक पडले बादशहाच्या हाति रिकामे पोळे.
वृत्त सांगता घर्मबिंदुंनी सकलांगहि डबडबले.
बोले: "गेले कोठुन कोठे राजे ते निजलेले."
उठुन खाडकन ताड ताड झणि उडवित गेला बाजी.
पुलाद गाठुन शिवपुरि शिरला राजमंदिरामाजी.

डोळेगावाची तो अपुली बडी कवाडे खोले
परी तांबडे पिवळे झाले क्षणात त्याचे डोळे.
तुफान वादळ उठले हृदयी ! गंगाजमना जमल्या
अंधी डोळ्यापुढती आली अति बाहुल्या फिरल्या.
तरी जिवाचा कसाबसा तो तोल तसाच धरुन
बादशहाला जाउन कथिले घालुन खाली मान.
सम्राटाच्या मुखातुनी झणि त्यावर उडली लाही
पुलादखाना वाटे अंगी कडाच कोसळलाही.
सणसणले शर का शिरि फुटली अग्निरसाची लाट !
का कडकडुनी शिरी भयंकर झाला विद्युत्पात ?

अग्नियंत्रमुख का गुलिकांची सोडी स्फोटक माळ
का कोसळुनी पडला खाली आकाशाचा पूल ?
फडा उभारुन सहस्र तोंडी वाटे डसला शेष
काय टाकिले क्रूर यमाने भवति भराभर पाश !

पुलादखाना दिल्लीचा तो गमे न दौलतनगर
प्रकट जाहला नरसिंहाचा गिळावया अवतार
ज्वालामुखीचा स्फोट जाहला गर्जे कर्दनकाळ!
ऐका रसिका! त्यातील काही बादशहाचे बोल:
"पुलादखाना! नीचा! वाटे मनास काही लज्जा ?
निमकहरामा सांग कसा तो पळून गेला राजा?

पुन्हा पुन्हा तू आम्हां करिसी कशास कुर्निसात ?
या क्षणि उडवू या खड्गाने का तव छकले सात ?
छेद शिराचा करावयाची शिक्षा पुरेल का ही ?
वाहुन आण कुराणाची तू बोल खरे लवलाही.
अंती ठरली खरीच माझ्या मनिची का हुरहुर ?
चतुर नृपाने केले दुष्टा तुलाहि काय फितूर!
ना भाऊ ना बाप न पुतण्या मानियला जगतात
अशाहि माझ्यावरी नृपाने पुरती केली मात!
शिवरायाने तुरी देउन पुरी फजिती केली.
आज लाविले सम्राटा या पहावयाला खाली

काय करावे? गरुड उडाला हातातुन गगनात!
माझ्या आशाकांक्षा गेल्या खचून पाताळात
गेली दिल्लीपतिप्रतिष्ठा! खंत भरे हृदयात.
पुलादखाना! तृप्तशलाका खुपसू का नयनात ?
गजपदि बांधुन घोळू तापल्या वाळू मैदानात?
बाणाग्रांच्या शय्येवर का निजवू तुज दिनरात ?
भयाण जागी वनवृक्षावर उलटा टांगुन ठेवू ?
बुबुळे गळुनी पडतिल असले चटके फटके देऊ ?
कडेलोट करु? जितेपणी का चिणु तुजला भिंतीत ?
का बांधुन तुज घालुन उकळू तेलाच्या कढईत ?

हात, पाय, शिर, नेत्र, कर्ण या अंगा एका एका
तोडुन वेशीवरती टांगू करून खांडोळी का ?
बोल जोवरी नाहि जाहला गगनमणीचा अस्त
खरे सांगशिल तरि तुज सोडुन करीन बंदोबस्त."
"खाविंदांचा मीहि शिपाई मानि तसा इमानी."
पुलाद बोले : "खांडा, तोडा, परि न गैरइमानी.
कुणी काहीही सांगतील जरि खाविंदांच्या कानी
होति पहारेबंदी ! केली मुळी न आनाकानी.
वाड्याभवती मशालि होत्या पाजळल्या दिनरात.
मालुम नहि पडती प्रभुजी है क्या अंदरकी बात ?

कडक पहारा निशिदिनि असता ते राजाचे भूत
भूमित झाले गडप उडाले का नकळे गगनात !
नवल वाटते राजा बाहिर घेईल कैसा धाव?
नव्हता जाया याया मुंगी-माशीला शिरकाव;
खास कुठे तरि लपून बसला असेल तो आसपास.
राजा गेला या वृत्तावर जडेच ना विश्वास.
बाहिर जाया छिद्रहि नव्हते त्याचा हलका श्वास
खरोखरी दिङ्मूढच झाला:हा चरणाचा दास!
करिल चेटक्या शिवराया तो शहाण्यासही वेडे.
घरा पळाला का लपला हे मनास नुकले कोडे."

"असेल बसला लपून तर तो करील मजला ठार,"
बादशहा ते त्वरे म्हणाला, "हवेत भवती स्वार.
आणिक सोडुन लष्कर सगळे शोधा आटोकाट
घालुन बेडचा कायी त्याला खेचा दरबारात.
शोधिल त्याला देइन मोगल साम्राज्याचे मोल
फिरु लागला मम जीवाच्या ब्रम्हांडाचा गोल !

दक्षिण पश्चिम पूर्व दिशांना फेका घोडेस्वार
त्यातुन दक्षिण दूरप्रांती द्या शोधाचा भर फार.
बघता बघता देइ तुरी करि राजा चतुर हुशार .
वेषधारणी असे शिवाजी अतिशय वाकबगार.

"असा शिवांगी अष्टपैलुचा भरला हुन्नर भारी.
कुणा न सोडुन तुम्ही तपासा कसुन सोंगे सारी
जंगम जोगी, संन्यासी अन् बैरागीही शोधा
नानकपंथी, गोरखपंथी, फकीर, शहाणा, वेडा.
चहु दिशि सुटले दोन लाख अन् साठ हजार स्वार
दक्षिणमार्गी परी लोटला तो मोठा दळभार.
त्या मार्गावर धरुन आणिले हिरोजि फर्जन्दास
तशाच त्याहि छोटया मुलग्या मदारि मेहतरास.
"सांग शिवाजी कोठे ? नातरि उडविन शिरिची फाक !"
सवाल झाले जळफळणाऱ्या बादशहाचे लाख.

'निजवुन मज तो गेला कोठे उडवुन नयनी धुळ,
माहित नाही' हा हिरोजिचा कायम एकच बोल.
' चरण चुराया सांगुन गेला कोठे घालुन झूल
माहित नाही' हा पोराचा कायम एकच बोल.
" मुसलमान तू" म्हणे बादशहा, "दाविन तुजला सूळ
कुराण उचलुन हाति फरासा खरेच तू तरि बोल."
चरण चुराया सांगून गेला कोठे घालुन झूल
महित नाही' हा पोराचा फिरुन कायम बोल !
शिवसेवक ते ! अणुभर त्यांचे ढळले नाही इमान.
कौतुक करुनी बादशहाने दिले तया जिवदान.

तिसऱ्या दिनि रघुनाथ कोरडे, त्र्यंबकपंत डबीर
धरुन आणिले सम्राटाच्या न्यायासनासमोर.

क्रोधाग्नीचो ज्वाला उठली, " काय नृपाची वाट ?"
कुणि न सांगता तया ठेविले कोंडुन महिने आठ.
अशी चालली शिकस्त इकडे पूसतपासाची ती
मथुरा नगरी जाउन भेटू नृपास यमुनाकाठी.
चल रसिका मजसंगे तुजला नृप ना वळखायाचा
परिचय नाही तुजला त्याच्या नवीन पोषाखाचा.
दाढी डोई मुंडुन त्याने केश काढिले पाक
भगवे नेसुन सर्वांगावर दाट चर्चिली राख.

करी कमंडलु, दंड, मृगाजिन, अंगि न वळखायाचा
असा धारिला वेष हुबेहुब फटिंग गोसाव्याचा.
मग संन्यासी राजस नाचू लागे हरि-भजनात
मिसळुन चाले गोसाव्यांच्या विरक्त मेळाव्यात.
असे एकदा नदीस गेले राजे स्नानासाठी
कष्टी झाले मनी अनास्था बघून यमुनाकाठी.
सहज बोलले, 'बहु जन येती येथे यात्रेसाठी
द्रव्य कारणी लावा येथे सुरेख घाटासाठी."
राजशब्द हे ऐकून तेथील चोबे चकित झाले
नवल कुतूहल वाटुन त्यांनी नृपास सवाल केले :

'तुम्ही विरागी संन्यासी ना ? आला तीर्थासाठी ?
तर मग तुम्हांस घाटाच्या का हव्यात वाटाघाटी ?
निराजीने त्या चोब्याच्या कानी कुजबूज केली
स्वारी गंगापुत्राची क्षणि मनात विरमुन गेली !
जीभ चावुनी घालुन खाली शिर माफी मागितली
क्षणी नेमणुक तिथे उपाध्या म्हणून त्याची झाली.
चतुर निराजी शिवराजाचा होता न्यायाधीश
अनेक विद्या पढला होता पंडित तो बहुभाष.

म्हणूत तयाला शिवरायाने केले मुख्य महन्त
मेळा जिवलग मित्रांचाही मिसळे शिष्यगणात.

मुलुख–मुशाफर कृष्णाजीही मग गोसावी होई.
मेळ्याला त्या दखवनि नेण्या बनला वाट्याड्याही.
संतांचा त्या पाहुन उत्कट हरिभक्तीचा छंद
वाटे सकला तुटला त्यांचा खरोखरी भवबंध.
राजस्कंधी झणझण झणझण एकतारि ती चाले.
अद्वैताची मंजुळ वाणी चिपळी छनछन बोले !
विश्वव्यापक मानवतेचा धर्म न मानव पाळी
साधुसंत हे पूर्ण विरागी कोण तयांचा वाली ?
ब्रम्हात्मैक्यज्ञान शिकविते मनुजा विराटवाणी
स्थिरचर पुरुषा विश्व गमे निर्विकार ब्रम्हवाणी.

मूक जिवांच्या मायानगरी कुठली विराट वाणी ?
वेदान्ताची पोपटपंची जाणि न मैनाराणी!
सृष्टि निर्मुनी चालविते त्या अतर्क्य विभुशक्तीस
या विश्वाच्या संसाराची चिंता रात्रंदिवस.
झाडावरच्या राघुस घाली कोण पेरु अंजीर ?
कुणी बांधिले तया रहाया महाल हिरवेगार !
पाणी वगळुन दूध प्यावया हंसा पढवी कोण ?
सुंदर रंगवि मोरपिसारा चतुर चितारी कोण ?
तकतकते घर चिवट पांढरे जुनाट तुळईखाली
कसे बांधिले पुस जा तेथे कातण रहनेवाली.

साखर तोंडी धरुन धावता डोंगरकड्यावरोनी
पायि मुंगिच्या घुंगुर वाजे मुकुंद ऐके कानी.
तप्त धरेवर चालत जाता पोटी धरुनी पाय
हळुहळु नेई काट्यावरुनी अल्ला गोगलगाय.

असली सुंदर कवने गाई जाता जाता रचुनी
होते शिवबा सत्कविगायक तसेच तत्त्वज्ञानी !
एकतारिचा वेणुदंड हरिभक्तश्रवणे चित्ती
विशुद्ध होउन अंतरि हालति हीरक माणिक मोती.
मागित भिक्षा, रामरहिमा गर्जत मोठ्या बोली
साधुमंडळी करीत भजने प्रयागतीर्था आली.

धर्मकर्मही उरकुन तेथुन संतमंडळी सुटली.
मोक्षपुरी ती पवित्र वाराणसीहि आता आली.
राजविमोचनवार्ते होती नगरी दुमदुमली.
नवलाखांच्या नवसांची शिवमंदिरी वाणी घुमली.
बादशहाचा कट्टा वैरी कैदेतुन सुटलेला
पकडायाच्या फर्मानांना होता ऊतचि आला.
अशात गागाभट्टाच्या गृहि राजस्वारी आली.
राजदर्शने वेदमूर्ति ती वेदा विसरुन गेली.
गागाभट्टा नेउन केली प्रभाति गंगातीरी
यात्रेकरुची लहानमोठी व्रतवैकल्ये सारी.

शिजवुन केला नैवेद्यहि तो घेउन मोठे भांडे
गंगाप्रसाद वाटायाला दिलाहि वाडेकोडे.
इतुक्यामाजी 'शिवास पकडा' अशि हारोळी उठली
तो त्या गंगाद्वार-गयेच्या मार्गे स्वारी गेली.
मार्गोमार्गी रक्षण देउन धोक्यापल्याड नेले
इतरांसम त्या गागांनीही नृपा सहाय्यचि केले.
कटक-चंद्रपुर-देवगडाहुन इंदुरबोधन झाले.
गोदातटाकि हिंडुन भागानगरि विजापुरि आले.
भागा नगरप्रदेशि असता संभ्रमणाते वळले
हे वैरागी कडोळ नामक लहान गावी आले.

"अन्न न पाणी भुकेस काही पोट खपाटिस गेले
म्हणुन पाटलाघरि मिळते का काहि पहाया गेले.
शिवबा बोले दिसता तेथे वृद्ध तयाची आई :
"देई भुकेच्या तोंडा तुकडा, तू धर्माची आई.
तान्हेल्या मुखि घाला कोणी एक दयेचा थेंब.
या धर्माच्या बीजा फुटतिल अमर सुखाचे कोंब.
वेल मांडवा जाउन येतिल त्या मोत्यांचे घोस.
उद्याच येइल इंद्रभुवनिचे सुंदर रुप घरास.
देवावरती भाव ठेवुनी फिरतो गावोगाव.
पाण्याविन बघ बुडेल येथे ही साधूंची नाव ?"

थोर तापसी बघुन दयेने हृदय तियेचे द्रवले.
घरात नाही द्याया काही भरुन आले डोळे
आणि बोलली कळवळुनी ती हणुन कपाळी हातः
"कुणि मेल्यांनी नेले माझे उचलुन भरले ताट !
मध्यरात्रीची घोड्यावरुनी केली धावाधाव.
जाळुन पोळुन लुटिला त्यांनी अमुचा सगळा गाव.
शिवाजिचा तो 'आनंद्या' अन 'तेलंग्याही' होता.
नेले सगळे येथुन त्यांनी जे जे आले हाता.
थोर मनाने गोड करोनी घ्याल तरी बोवाजी,
बसा आणिते चटणीभाकर भुकेस खा ती माझी.

आगीमाजी करपुन गेल्या माझ्या गरीब गाई
हळहळतो जीव तुम्हास द्याया दूधताकही नाही.
काळिज फाटुन जाते स्मरता ती काळाची रात
खरेच होइल बरे शिवाजी मरेल जर आग्र्यात."
बोलुन इतुके आणायाला गेली थाळीपाणी.
राजे हसले परि नयनांमधि रोखुन धरले पाणी.

शब्द नव्हते ते शिवहृदयावर घाव घणाचे पडले
वैराग्याचे राजस कोमल हृदय विदारुन गेले.
परि त्या मोंगल मुलुखी उठला फिरुन हा रणघोष.
ऐकुन राजस संन्याशाच्या मनास झाला तोष.

शिवशोधामधि विरुन आणाया युद्धाग्नीचे लोळ
उठवायाचा शिवशांच्या हा मुत्सद्यांचा खेळ !
समोर झाली शिवनिंदा ती, नव्हती सांगोवांगी.
निराजीस तो त्या ग्रामाची नोंद कराया सांगी.
छाटच्या पसरुनि गोसाव्यांचे सैन्य बैसले खाली
थाळी येता गोळेगावा करून वेढा घाली.
किती लागली गोड भाकरी गाईच्या गोठ्यात!
उशास धोंडा घेउनि काढी तिथेच शिवबा रात.
पुढे जेधवा राजगडावर राजा सुखरूप जाई
म्हातारीच्या गावी काही घडले का ते पाही.

तिथे फाटल्या आकाशातून पडल्या होत्या स्वाती
पहृत्सागरि बनले होते त्याचे सुंदर मोती.
बंडाळीच्या हानीने जे रडले धाई धाई
त्या सुजनांची केली पुरती शिवबाने भरपाई.
पाटिलबाबा चावडीत जरि बसला हुरडा खात
प्रासादाग्रें गेली त्याची डौलाने गगनात
म्हातारीच्या कणगी भरल्या सोन्याच्या दाण्यांनी
तसेच रांजण तिचे हासले खऱ्याच मणिमोत्यांनी.
गोठा गेला गजबजुनी घरि आल्या खिलारी गाई.
असा तिच्या त्या उपकाराचा नृप झाला उतराई.

विजापुराहून राजस्वारी गोकर्णाला गेली
सह्याद्रीचे घनवन तुडवून राजगडाला आली.

काय मार्ग हा दीर्घ किती! मैलांचा हजार दोन
तरि मथुरेहुन चालत आला दुडदुड पायी दोन.
ओढे नाले नद्या अरण्ये डोंगरकडेकपार
तुडवित आला सोसत वारे पर्जन्याची धार.
राजगडाहुन गेला होता अंबारीत बसून
त्यावेळीचे वैभव त्याचे टाकी मन भुलवून.
परि येताना रक्षा फासुन बैरागी होऊन
अंगि मृगाजिन नेसुन आला चालत दंड धरुन

हे बैरागी सोंगाडे! गडि दगाहि करितिल काही
म्हणुन तयांना राजगडावर येउ दिलेहि नाही.
गडपदतळी त्या बाले किल्याबाहिर बैराग्यांना
लावायाला दिला आसने कसाबसा परवाना
लगेच एका वटवृक्षातळि धुनी पेटली त्यांची.
घरिही न चुकली रक्षाशय्या शिवबाच्या नशिबाची.
वायुलहरिंनी पानोपानी परि वर कुजबुज केली.
का न कळे त्या शाखा शाखा लगेच लवल्या खाली.
फांद्यावर त्या व्याघ्रांबर कृष्णहरिजिन काळेपिवळे
आणि कमंडलुवर अडकविले उदकांनी भरलेले.

मयूर–कुक्कुट–पद्म–गरुड आदि पर्ण–सुमांच्या राशी
एका मांडीवरति आसने शिव करि चौऱ्याऐंशी.
पाट हिऱ्याचे पिकविति ज्याच्या मळ्यात माणिकमोती
तो राजा बघ वटवृक्षातळी पडे उपाशी पोटी.
देई जो नृप हिरेमाणके याचकास दारात
भिक्षा मागत फिरता त्याच्या काय पडे पदरात ?
कधी गुराखी मेंढपाळ कधि होऊन त्याचा वाली
उरला सुरला सुकावाळका भाकरतुकडा घाली.

ज्याच्या उदरी जाया चाले स्पर्धा पक्वान्नांची
कंदमुळे अन् रानफळे अजि शमविति भूक तयाची !

सह्याद्रीभर झगमग झगमग ज्याची तळपे ज्योत
होती उत्तर हिंदुस्थानी रिपुनयना दिपवीत
तो दख्खनचा स्वयंप्रकाशी प्रदीप देवघरात
रातीमागुन रात काढितो भयाण अंधारात
लालमहाली बसणाराचे पाहुन असले हाल
दुःखाश्रुंनी वनदेवीचे प्रभाति भिजले गाल.
"वडपुजेला तुझ्या पावलो पहा सोयराबाई "
लाख जिभांनी वड वदला परि बोली कळली नाही.
तसेच अपुला जनक हाच का म्हणुन बघाया नयनी
पटपट बसली पायापाशी शिवराज्यातिल नाणी.

ओळख पटली अंतरि परि त्या वदण्या वाचा नाही.
तळमळुनी मनि तशीच उपडी धुळीत पडली काही.
स्थितीत या ऋषिकुमार कोणी राजगडाहून खाली
प्रसन्न चित्ते जाता दिसला घेउन भरली झोळी.
अवती भवती कुणि न पाहुनी बालमूर्ति ती आली.
मुकाट चाले ठेवुन उघडी राजासन्निध झोळी.
हाक मारिली शिवबांनी : "तू बटो कुणाचा कोण ?
वणवण फिरूनी कणकण जमवुन तू हे आणिले अन्न ?
भान भुकेचे दिसे न तुजला नाही ऊन तहान
बाळा! पाठिस पोट मिळाले! कशास करिसी दान?

बोलुन चालुन फटिंग आम्ही त्रिशूल हाति धरून.
धटिंगणांच्या गुणवाणांनी बायांना भिववून
ओले सुकले तुकडे याचुनि खातो ते चघळून,
त्यात मिळाली कालच आम्हां भिक्षा पोट भरून.

आम्हां नाही संसाराच्या चिंतेची भुणभुण
धरणीशय्या गगनाच्छादन, नाही कसले न्यून.
शिवपदि बांधिलि या साधूंनी निजदैवाची दोरी
हळू डुलू दे वाऱ्यावर ती गगनी अशिच अधांत्री.
शिवराज्यामधि साधूपायी का करिसी भुकमारी ?
उचल शिदोरी नातरि शापिन जरि तू राजद्वारी."

"अद्‌भुत संता ! थोर महंता !" वंदुन बोले बाल :
"भस्माच्छादित तरि वाचू का विशाल तव हे भाल ?
तसेच तुझिया शाप-शब्दि जरि गमले विष ज्वलंत
अंतर्दृष्टिस दिसते माझ्या अमृतचि भरले आत !
लहान मी तरि नृपमणिखनीतिल रत्नपारखी नामी
भोळिभाबडी म्हातारी का कडोलगावाची मी ?
प्राण सहाय्या द्यावा येता आर्तजनाची हाक
आहे समर्थ-शिष्याला त्या सद्‌गुरुची ही शीक.
बालशिष्य तुज सहाय्य झाले मार्गी हातोहात
मी तर साधो ! मथुरेपासुन तुझ्याच पाठोपाठ.

देशासाठी ज्या देहाचा चंदन तव झिजलेला.
आणि जयाचा सुगंध माझ्या दिलात दरवळलेला.
त्या देहाच्या शांतीसाठी तृप्तीपुष्टीसाठी
स्वर्लोकाहुन आणुन वाढिन पीयुष ताटीवाटी.
कशास करिसी बालवंचना सांगुन–'भरले पोट'
ठाउक आहे रे अन्नाचा कण न तुझ्या उदरात.
तुज सोन्याचा ताट पाट का मिळला साखरभात ?
कवळी कवळी पाने खाउन काल काढिसी रात !
सुत परतावा घरि सुखरूपचि हा मनि जडुनी ध्यास
व्रतस्थ माता विप्रा देई अन्नदान सुग्रास.

त्यातुन आणिला तुजसाठी हा खासा घरचा घास
माझ्यासाठी करू नको तू मुळीच अट्टाहास.
तीन मास या मुखास माझ्या नाही अन्न स्पर्श
राजगडावर जाशिल तेव्हा सोडिन हा उपवास !
आईच्या मृदुमृदुल करांनी केलेला मधुपर्क
कसा न खाइल नऊ नवसांचा तिचाच प्यारा लेक ?
घेशिल तू जर - विदित मला - जे उलटच्या अंबारीत
बसविशील तू तुझ्याच मागे मलाही अंबारीत.
त्या सौख्याचा मानाचा मज अणुभर नच अभिलाष
स्वातंत्र्याचा आत्मा तू जग एकच मनिची आस."

बोलुन इतुके बाळ उडाला तेथुन हरणावाणी
बघता बघता कुठे दडाला गिरिवर कुहरस्थानी
बाल भाषणी सह्याद्रीचा भरून आला ऊर;
वाहु लागला तद्हृदयातुन कृतज्ञतेचा पूर.
सदा न राजा राज्य करेगा सदा न बाग बहारा
सदा न बागे बुलबुल बोले सदा न मौज बजारा.
राज्य छोडके राजा चल गै हटिया छोड पसारी
गुरु छोडके चेला चल गै दुनिया कोन बिचारी.
असे दोहरे भजनी गीते पदे अभंगहि काही
गाउ लागला तालसुरावर राजस गोसावीही.

हृदयंगम ते भजन किती तरि आल्या गेल्या मोही
घटका घटका विद्वानांचा थवाहि डोलत राही.
या भजनाची वार्ता गेली जिजाबाइच्या कानी
सांगितले तिज दासींनीही आणिक अधिकाऱ्यांनी
गडाखालती बैरागी कुणि आले वैष्णवपंथी
देवांची मनमोहक मोठी सुंदर भजने गाती.

आम्हां नाही संसाराच्या चिंतेची भुणभुण
धरणीशय्या गगनाच्छादन, नाही कसले न्यून.
शिवपदि बांधिलि या साधूंनी निजदैवाची दोरी
हळू डुलू दे वाऱ्यावर ती गगनी अशिच अधांत्री.
शिवराज्यामधि साधूपाशी का करिसी भुकमारी ?
उचल शिदोरी नातरि शापिन जरि तू राजद्वारी."

"अद्भुत संता ! थोर महंता !" वंदुन बोले बाल :
"भस्माच्छादित तरि वाचू का विशाल तव हे भाल ?
तसेच तुझिया शाप-शब्दि जरि गमले विष ज्वलंत
अंतर्दृष्टिस दिसते माझ्या अमृतचि भरले आत !
लहान मी तरि नृपमणिखनीतिल रत्नपारखी नामी
भोळिभाबडी म्हातारी का कडोलगावाची मी ?
प्राण सहाय्या द्यावा येता आर्तजनाची हाक
आहे समर्थ-शिष्याला त्या सद्गुरुची ही शीक.
बालशिष्य तुज सहाय्य झाले मार्गी हातोहात
मी तर साधो ! मथुरेपासुन तुझ्याच पाठोपाठ.

देशासाठी ज्या देहाचा चंदन तव झिजलेला.
आणि जयाचा सुगंध माझ्या दिलात दरवळलेला.
त्या देहाच्या शांतीसाठी तृप्तीपुष्टीसाठी
स्वर्लोकाहुन आणुन वाढिन पीयुष ताटीवाटी.
कशास करिसी बालवंचना सांगुन–'भरले पोट'
ठाउक आहे रे अन्नाचा कण न तुझ्या उदरात.
तुज सोन्याचा ताट पाट का मिळला साखरभात ?
कवळी कवळी पाने खाउन काल काढिसी रात !
सुत परतावा घरि सुखरूपचि हा मनि जडुनी ध्यास
व्रतस्थ माता विप्रा देई अन्नदान सुग्रास.

त्यातुन आणिला तुजसाठी हा खासा घरचा घास
माझ्यासाठी करू नको तू मुळीच अट्टाहास.
तीन मास या मुखास माझ्या नाही अन्न स्पर्श
राजगडावर जाशिल तेव्हा सोडिन हा उपवास !
आईच्या मृदुमृदुल करांनी केलेला मधुपर्क
कसा न खाइल नऊ नवसांचा तिचाच प्यारा लेक ?
घेशिल तू जर - विदित मला - जे उलटचा अंबारीत
बसविशील तू तुझ्याच मागे मलाही अंबारीत.
त्या सौख्याचा मानाचा मज अणुभर नच अभिलाष
स्वातंत्र्याचा आत्मा तू जग एकच मनिची आस."

बोलुन इतुके बाळ उडाला तेथुन हरणावाणी
बघता बघता कुठे दडाला गिरिवर कुहरस्थानी
बाल भाषणी सह्याद्रीचा भरून आला ऊर;
वाहु लागला तद्हृदयातुन कृतज्ञतेचा पूर.
सदा न राजा राज्य करेगा सदा न बाग बहारा
सदा न बागे बुलबुल बोले सदा न मौज बजारा.
राज्य छोडके राजा चल गै हटिया छोड पसारी
गुरु छोडके चेला चल गै दुनिया कोन बिचारी.
असे दोहरे भजनी गीते पदे अभंगहि काही
गाउ लागला तालसुरावर राजस गोसावीही.

हृदयंगम ते भजन किती तरि आल्या गेल्या मोही
घटका घटका विद्वानांचा थवाहि डोलत राही.
या भजनाची वार्ता गेली जिजाबाइच्या कानी
सांगितले तिज दासींनीही आणिक अधिकाऱ्यांनी
गडाखालती बैरागी कुणि आले वैष्णवपंथी
देवांची मनमोहक मोठी सुंदर भजने गाती.

आज्ञा झाली जिजामाइची: "आज गडाच्या वरती
बंदोबस्ता ठेवुन आणा त्यांना भजनासाठी."
सभामंडपी भजनसुधेची तुडुंब भरली पोई
भान हरपुनी त्यामधि अंबा डुंबत डोलत राही.

गाता गाता या अर्थाची एक पंक्तिही आली
"तू विश्वाची खरी माउली पाखर मजवर घाली."
बैरागी शिवचरण तेच ते फिरुनी फिरुनी घोळी
देहदिलाचा तोल सुटोनी लोटांगण तिज घाली.
लगेच उडुनी निराजिनी अभिवादुनि केली वाणी.
" उठा माउली, शिवबा अपुला आला आग्र्याहुनी. "
लगबग जाउनि कुणि पंचारति आणा नवरत्नांची
माणिकमोती ओवाळोनी काढा दृष्ट तयाची !
घरा परतली स्वातंत्र्याची लक्ष्मी नउ नवसाची
शिव–पद–रज द्या शिरि ठेवाया लेणी नवलाखाची."

उठुन धावली आई वेगे शिवही दौडत जाई.
मायलेकरे मिठी मारिती ! जनगण टकमक पाही !
मंगलदिनि त्या शिवराज्यामधि झाला ब्रम्हानंद
मार्गमासिका पाचकलांचा हसला चिमणा चांद !
तोफांचा गडगडाट झाला गडगडावर साऱ्या
साखर सोने उधळुन नाचे ती दख्खनची दुनिया !
सह्याद्रीच्या कुडीत परतुनी प्राण पुन्हा तो आला
महाराष्ट्रही नवचैतन्याने अवघा भारुन गेला.
स्वातंत्र्याच्या उन्मादाने सह्यगिरीची वेडी
नाचू लागे डोलू लागे गवताचीही काडी !

सह्याद्रीच्या वनावनातुन गे, सुंदर वनराणी
हासत नाचत डोलत गाई शिवयश तू फुलराणी.

फुलाफुलांच्या वेण्या गुंफुन गा गाणी वनबाळे
नाच निर्झरा स्फटिकांचे परि घालुन घुंगुरवाळे.

मोरा! मोरा! झगझगणारा पसरुन भव्य पिसारा
शिवयशमहिमा गाउन गाउन पहाड घुमवी सारा.

पावन पवना! दिव्य धावना! वनावनातुन वाही!
शिवकीर्तीचा सुगंध संतत दिगंति वाहुन नेई.

असो! वेळ किति मुक्ति कहाणी गातच बसलिस तूही
तुज मैने का शिवयश गाता भानच उरले नाही ?

असेच राज्यारोहणगानहि माझ्या कविताबाळे
तुझ्या बोबड्या बोलांनी तू गाशिल का लडिवाळे?
सुवर्ण–सिंहासनि शिवराजे येउन बसले पाही
चल दरबारी आहेरांची कोण उडाली घाई?
आयुष्याचा अस्तकाल हा; नुरे भरवसा जीवा
म्हणुन अता ते नच जमले तर जन्म दुजा दे देवा!
अखंड गाया शिवचरित–जे इतिहासाचे लेणे
आस पुरवि ही देवा, द्याया हे देशाचे देणे.

# बिल्वदल

भाग ३

स्वराज्य–संकल्पकास
श्रद्धांजली

स्वराज्य-कार्योद्योग चालवी त्या शिवरायापायी
लाल जाहली होती शहाजीवरती आदिलशाही.

शिवरायांच्या राजकारणी चित्त घालणे चोरी !
तरि करुनी ते घेइ शहाजी सावधगिरिही भारी.
वृत्त-दर्पणी शिवलीलाप्रतिबिंबे हरघडि पाही !
तशि निजवृत्ते शिवबाला तो गुपचूप धाडुन देई.
पंकी जन्मुन लेप तयाचा कमळा लागत नाही
तसा शहाजी राजकारणी वागुन निर्मळ राही!
नांदुन बीजामधि तो दावी वृक्षामधि मुळी नाही.
हा ब्रम्हाचा खेळ जगामधि मायाा पाहुन राही.
पुत्रप्रतापवार्तादुंदुभि घडिघडि कानी आली.
हर्षभराने वृद्ध पित्याने मनात पिटली टाळी.

चिणून भिंतित - म्हणती - कोंडिला होता कोनाड्यात
तरी तयाच्या गोड गुदगुल्या सुटति तिथे अतड्यात.
सत्तासागरि अदिलशहाच्या स्थितिगतिने पडलेले
तसेच डोले शहाजिचे ते जहाज नांगरलेले.
कैद कपाळी अणिति पित्याचे प्रताप त्याचे त्यास
श्रीशिवविक्रमकुठार तोडी ते कारागृहपाश.
शहाशहांना थरकविणारी ती सिंहासनभेदी
दक्षिणगगना ऐशी चमके रवि–चंद्राची जोडी.
पुत्रभेटिची शहाजिच्या किती; जिवास लागे ओढ
वाटे जाउन करीन केव्हा स्वयेचि कौतुककोड.

सकल स्थितिगति पाहुन एके दिनि शिव बसला शांत
लढता लढता थांबविला निजरणरथ मैदानात.
अंगिकारिले शिवरायांनी तहारहाचे बंध
बादशहाचा वैराग्नीही केला क्षणभर थंड.
शांतिचंद्रिका रम्य पसरली राजकीय गगनात
दिव्य तेज ते अपुले बसला बादशहाहि पहात.
ही सोन्याची संधि साधूनी सिंहासनासमोर
उठुन बोलला एके दिनी शिवपिता शहाजी थोर.
" बादशहावर या दासाचे हक्टक असती काही
वाहियली मी किती निष्ठेने सेवासुमने पायी.

एक मागणे मागायाची वेला गरिबा आली
अन् दरबारी अजुनी माझा शब्द न पडला खाली.
स्वप्नी येउन मम नवसांच्या देव-देवता वदल्या
तुझ्याच तुजला नवसांची का विस्मृति घडली राया ?
सेवा प्रभुची ज्या करिसी तू त्याच्या दौलतिसाठी
घालून आणा नवसुन आम्हां तूच न धरिले वेठी ?

सटीसंकटी उभे राहिलो तुजला धरुनी पोटी
शब्द फुकाचे साजुन दिसतो का मर्दाच्या ओठी ?
नवस फेड ते येउन येथे तुझिया थकली काया
नातरि ही प्रभुसेवा त्वत्प्रभुसहही जाइल वाया.

बोलुन इतुके चार देवता गेल्या दिशांस चारी
त्या घडिपासुन चैन पडेना जिव चुटपुटतो भारी !
तपे उलटली दोन येउनी येथे मज वरदाई
कुलस्वामिनी जगदंबेचे दर्शन घडले नाही !
जाऊ का मग नवसासाठी निजकुलधर्मासाठी
या दौलतिचे अभीष्टचिंतन त्या घरि करण्यासाठी ? ”
उपकारांच्या बहुभाराने डुलवून अपुली मान
बादशहाने सन्मानाने दिले तया फर्मान:
“ जा ! राजा ! जा ! खुशाल जा परि पुत्र तुझा बंबंद
आवरुन सहजासहजी सगळे घाल तया प्रतिबंध.

अंगिकारि तो बादशहाची वजिरी का ते पाही,
तर देईन त्या उभी अशीच्या अशीच पाच्छाई ही !
सावध राही ! गुंतुन पडशिल तू मोहाच्या जाली
वाइट ठरल्या पुत्राचाही लोभ तुटे कधि काळी ?
शर्त एक ही——सरता कार्य परतुन ये लवलाही
तुजविण राजा विजापुराचे पानहि हालत नाही.”
राजे वदले: “ माझ्या हाती नच त्याचा आचार
तरि अपुल्यापरि उपदेशाच्या गोष्टी सांगिन चार
मधून विस्तव जात न असला त्याचा माझा द्वेष
पोरापायी तोडियले मी जिजाउचेही पाश !

मत्तगजासम पुत्र ! तयावर चाले ना अंकूश
म्हणून तर मी नवाच केला कर्नाटकला वंश !

खाविंदांना विदित असे हो बापा म्हणे न बाप
अवघड झाले बापा त्याच्या पापा म्हणणे पाप.
तरि त्या पुंडा सुधारावया बोलिन ऊर भरून
यत्नाचा हळुवार हात मी पाहिन सुखि फिरवून !
परतायाचा शब्द आपणा देइ शहाजी राजा
निरोप देउन हुजरत घ्यावा मुजरत मुजरा माझा."
मुहूर्त पाहुन सोडि शहाजी कर्नाटकची वेस
सवे घेतली द्वितीय भार्या तुक·इ, वेंकोजीस.

मजला मारित दृष्टिपथामधि येता तुळजापूर
अफजलखाना आठवताना आला नयना पूर !
स्वराज्यकार्या सद्यश येता शिवरायाच्या हाता
सुवर्णलक्षप्रतिमा वाहिन जगदंबेच्या माथा.
अशा बांधिल्या होत्या हृदयांतरि नवसाच्या गाठी
म्हणून थांबले तुळजापुरला मायभवानीसाठी.
घडवायाला अष्टभुजेच्या प्रतिमा सुंदर फार
आणिले होते कर्नाटकचे चतूर कारागिर.
लक्षभराचे सोने वाहुन तिथे देविचे कोड
पुरवुन केली महोत्सवाने निजनवसाची फेड.

प्रवासमार्गी कुठे कशि असे स्वारी पूज्य पित्याची
घेई वार्ता उत्कंठेने शिव घटके घटकेची.
आणि शहाजीराजे शिरले शिवराज्यी हे वृत्त
कळता प्रेमानंदभराने डुले शिवाचे चित्त.
गुढ्या तोरणे भव्य कमानी उभवी ठायी ठायी
मणिमोत्यांच्या शृंगारांनी दिपुनि शशीरवि जाई !
राजदर्शनासाठी सगळे माणिक मोती ल्याले
शिवबांची दौलत बसली उघडुन अपुले डोळे !

'पुत्रपित्यांची व्हावि भेट ही देवालयि नवसाची;
विधी पाळावा,' पुरोहितांनी सल्ला दिधली साची.

स्थान भेटिचे ठरवुन जेजुरि, तेथिल मंदिरात
हत्ती घोडे नौबत धाडुन, पहात बसले वाट.
कर्नाटकची राजस्वारी वाजत गाजत आणिली
छबिन्यासह शिवराजाचा सरनौबत मुजरा घाली.
मंदिरी मांडुन चौरंगावर नव काशाचे ताट
ओतियले घृत त्यामधि साजुक निर्मळ काठोकाठ.
जिजा, शिवाजी, शिवभार्यादिक बसली ताटापाशी
आणि तयांची प्रतिबिंबे त्या तुपात पडली खाशी.
बुडी मारिली राजदृष्टिने विशाल घृतमृत ताटी
पाणबुड्याला हारवलेली दिसली माणिकमोती!

सरता दर्शनविधि शिव पडला जन्मपित्याचे पायी
वात्सल्याचा पाट पित्याच्या बघ नयनातुन वाही !
मंगल आशीर्वाद पित्याच्या निघे दाटल्या कंठी
मुलास उठवुन दोहातांनी कवळुन धरिले पोटी.
जिजाऊस तर तो भाग्याचा दिन सोन्याचा वाटे
सावित्रिस जणु गमावलेला सत्यवान तो भेटे !
किती वरसांनी भेटिस आला कर्नाटकचा नाथ
तया न्यावया शिबिकेचा किती अपूर्व केला थाट !
तबकडि कमान घडविलि आणवून उंची हस्तीदंत
दंडमुखावर विरजत होते सुवर्णसिंहललाट.

दंडामागिल अंगी शोभे शार्दुलमुख सोन्याचे
खुले पिंजरी जडित केळिचे फुलाकृती कलशांचे.
जरी झालरी जडीत गोंडे झळकति कोनी चारी
जरिदांड्याचे घोस रुप्याचे! खुले खुलोरी भारी

चकमक चकमक करी विलोरी अयन्याचा शृंगार
त्यात खोविला मोराचा वर विंझण हिरवागार.
भरजरि दांडिस दोनहि बाजुस मखमालिचा गलेफ
हार फुलांचा घालुन मांडिलि वर जडिताची तोफ.
महाराष्ट्रिचे मुख्य यान हे शिवबा आणवी तेथ
आदरभावे बसवी बावन बिरुदांचा धनि त्यात.

पूज्य पित्याच्या पूत पादुका शेल्यामाजी धरुनी
अति अदबीने शिबिकेसंगे शिव चाले अनवाणी.
वाजत गाजत डोलत आला छबिना डेरीयास
जडिताच्या नव भव्य नृपासनि बसवी स्वारिस खास.
समोर शिवबा तळहातावर अडवि धरुन तलवार
जानु लववुनी मर्यादेने वदले दाटुन उर:
"माझ्यापायी देहदंड किति तुम्ही सोशिले राजे!
खंत वाटते जीवा या बहु काळिज तुटते माझे!
घडले माझ्या हातुन मोठे अपराध न जे व्हावे
दयानिधे! त्वां निष्ठुर होउन शासन मजला द्यावे."

बोलुन इतुके केली पुढती अपुली प्रिय तलवार
स्तब्ध राहिले वाकवुनी शिर समोर राजे थोर!
ऐकुन वच हे भूपशहाचे क्षणि पाझरले नेत्र
पितापुत्रसंवादश्रवणी गहिवरला दरबार.
रणसंहारे बनली होती कठीण वज्राहून
वितळुन गेली मने होउनी ती मउ मेणाहून !
सुखदु:खाच्या गोष्टी झाल्या राज्यविचारहि झाले
मसलत झाली राजे दोघे राजगडावर गेले.
सार्वभौमभूपती शोभे अशि दौलतिची मोठी
कोशागारे भव्य शिवाची पाहुन थिजली मूर्ती !

किल्लेकोट नि लष्कर यांची ऐकुन सर्व कहाणी
गडागडावर जाउन त्यांची केली कसुन पहाणी.
कसे असावे कुठे असावे किल्ल्याचे दरवाजे
तोफांनाही कुठे कसे तटि बळकट कोंदण साजे.
वेगे-वेगे गनिमाची वर फौज दौडता आत
फसगत होउन व्हावि तयाची कशी कड्याहुन लोट.
अशि गडरचना रणचतुराने सुचविलि ठायी ठायी
तशि पंतांच्या पाठीवरती प्रेमे थापहि देई.
पागा पाहुन अश्वगजांचे गुण सांगितले काही
शस्त्रास्त्रांची कोठारेही युद्धदृष्टिने पाही.

शिवराज्याचा कोनकोपरा सकळ निहाळुन पाही.
राजनीतिचे सांगायाचे कथिले सगळे काही.
स्वराज्य सगळे पाहुन गेला संतोषुनिया भूप
आणि मुलाला कर्नाटकच्या छिजा दिल्या अपरूप.
आणि कराया गौरव त्याचा अपुली पंचीप्यार
दिव्य भव्य नवरत्नखचितशी दिली तया तलवार.
पूजेसाठी मांडि देवघरि; तिला भक्तिचे भाव
मायभवानीसम शिव दावी ठेवुन 'तुळजा' नाव.
अंति पन्हाळी येता वदले वृद्ध शहाजीराजे:
"जपा जिवाला! विजापुराला पाउल वळते माझे."

गहिवरले मन शिवबाचे! मिठि गळा घालुनी बोले:
"नाव नको ते! हाल जिवाचे काय पुरे नच झाले?
बाळजिवाला वृद्ध पित्याची ही तुटि सोसव नाही!
कामधेनु ही सह्याद्रीची हंबा फोडुन राही!
देहि उडाले जिथे आपुल्या कारंजे रक्ताचे
लोळ भडकले अंगाभवती जेथे प्रळयअग्नीचे.

मानेवर नित जिथे राहते पाते तलवारीचे
चित्र दिसे ते जिथे यमाच्या भीषण दरबाराचे.
जिथे जिवाचा घास कराया भैरव भवती नाचे
तिथेच आपण पुनरपि आता कशास परतायाचे?
आणि पाहिले तर राजे हे करिता जाण्यासाठी
दुःखमूळ हे मम हृदयातुन जाइल का कल्पांती ?
अता शिवाजीकडे वाकड्या नजरेने इवल्याही
पहावयाची अदिलशहाच्या दिलात ताकद नाही.
गोद्विजभारतधर्म नाशुनी म्हणविति पालनवाले
बडे बापके बेटे आपुल्या घरी विजापुरवाले !
स्वातंत्र्याची लक्ष्मी हाका मारित येइल दारी
अंगिकारिता बादशहाची कशास ताबेदारी ?
कायम मोडुन जावळीस तो चंद्रराव वर जाई
तिथेच निजला भूमातेच्या कुशीत अफजलभाई.
तुम्हा बांधिले त्या बाजीचा वंश ठेविला नाही
काय तयाचा ठावठिकाणा मिळेल पाताळीही ?
त्या समागमे आलेला तो कपटनाटकी स्नेही
तलवारीचे पाणी प्याला मुस्तुफ उरला नाही,
पळत्या वीरावरी रणी मी हात टाकिला नाही
म्हणुन रुस्तुम सुटला ! तसले ब्रीद कुळाचे नाही.
बेटा फाजलखान पळाला चिंध्या बांधुन पायी
पळता झाली भुइ थोडी त्या बलाढ्य शास्त्यालाही.
किरण बांधुनी 'सह्याद्रीचा उंदिर' धरण्या आली
ती दिल्लीची बिल्ली भिउनी मरणाआधिच मेली.
सांगति त्यांना शिवाजी दिसतो स्थळि जळि दिशात दाही
बादशहाचा घोडा पाणी नदीत प्याला नाही.
जो तो बोले उगे रहावे अपुल्या बसल्याठायी
तरिहि शिवाच्या करणीची का खातर पटली नाही ?

भीति कशाची ? प्रताप माझा म्हणुनी सांगत नाही.
जगदंबेच्या थोर कृपेची पाखर मजवर राही.
जन्मकालि मम दर्याखानावरी तुम्ही गेलेले
घरात घुमले घुंगुरवाळे कानि न तुमच्या आले !
बाळपणीचे लाड राहिले पुरवायाचे माझे
द्या मोबदला आज तयाचा इथेच राहुन राजे.

राज्यश्री शिरी धरा ! घाली का गुडघा कधि पागोटे ?
ही वडिलांची मांडी माझे उसे असू द्या येथे !
जायासाठी अंगि घातला तो हा उतरा साज
हट्ट लाडक्या बाळाचा हा एकच पुरवा आज."
नयनि भरे जळ शिवमुद्रा ती पाहुन केविलवाणी
धूर्त धुरंधर चतुर शहाणा वदे शहाजी वाणी:
" व्हावे आग कुणी, कुणी पाणी अपुल्या देशापायी.
स्वराज्य–कल्पक लेकाला हा हेका साजत नाही !
गुंतुन पडता इथे, वेचिले प्राण तिथे ज्यासाठी
तंजावर नी त्रिचनापल्ली येतिल कशि या हाती?

वचन मोडिता बादशहाचा होईल कोप भारी
घशात घालिल कर्नाटकची दौलत माझी सारी !
स्वराज्यवृक्षा तव दुखविल ती कोपकुठार विखारी
नातरि खिदमत बादशहाची मलाहि कुठली प्यारी?
मधुशब्दांच्या चवऱ्या ढाळुन घालुन त्रिझणवारे
बादशहाला रंजविले मी गुलाम म्हणुनी कारे?
कर्नाटकाची दौलत माझी मान तुझ्या राज्याची
स्वराज्यकार्या तुजलाही ती होइल बहुमोलाची
रक्तबीज मी मराठियांचे रुजवियले त्या ठायी
की त्याहि बळे उभे करावे स्वराज्य अपुल्या पायी.

त्या कार्याला यश द्यायला झाला तव अवतार
स्वातंत्र्यध्वज फडकावुन तू धर्म आपुला तार.
त्यासाठी मी बादशहाच्या नांदिन नजरेखाली
भोगिन दुःखे सगळी माझ्या भालावर लिहिलेली !
देशासाठी धर्मासाठी झिजु दे माझे हाड
पर्वा नाही जरी शहाजी गेले लाख करोड !
धन्य जयाने देशकुळाचा नवभाग्योदय केला
असा प्रतापी शककर्ता नृप तू मम उदरी आला.
सोड मिठी ही मिठी नव्हे ती सुरी गळ्यावर वैरी
राज्यनाश ती करील राया, माया वाइट भारी.

ताबेदारी बादशहाची तुम्हा न बाधायाची
काय भाकरी केवळ खाया केलि चाकरी त्याची ?
वैदिकपंडित शास्त्रीगायक साधुसंत कवि भाट
दावित नाहीत हिंदुराज्य का माझ्या दरबारात ?
संस्कृति धर्म नि शास्त्रकलांचा नच का मी अभिमानी ?
जयरामाच्या द्वादश जिव्हा गर्जतील की कानी.
परराज्याची वृद्धि स्वलोकहानिहि घडली हाती
मर्म न कळते का मजला ते शल्य रुते हृत्प्रांती.
हिणवु नका कुणि मजला म्हणुनी अदिलशहाचा दास
तसाच होता परिस्थितीचा ग्रीवेभोवती फास.

इकडे आड नि विहीर तिकडे जन्मकुंडली आली
पेचपिळाची स्थितीच माझ्या पाचविला पुजलेली.
त्यातुन त्याचा दास खरा मी काही माझा तोच
कर्नाटकच्या इतिहासाला जाउन पुस जा तूच.
अदिलशहाचा शह मजला का माझा अदिलशहाला ?
का कपटाने मुस्तुफ राती ससैन्य मजवरि आला ?

नुकता डोळा लागुन होती पहिली पहाट झाली
रात रंगली नर्तनि! होता चांदहि कलला खाली.
येइ धराया शिबिरासह मी असता निद्राजाली
पाप पाहुनी चांदणिमागुन चांदणि निघुनि गेली.

सांगुन येता तर उतराया त्या दुष्टाचा तोरा
होता माझ्या तलवारीचा एकच बस फटकारा.
संधि-विग्रहे आसन-संश्रयि यान द्वैध-गुणांनी
उभा आडवा कर्नाटक तो मुठीत आणिला कोणी?
रणदुल्लाच्या तलवारीने राज्याला जो मुकला
वीरभद्रशिरि त्या सोन्याचा मुकुट कुणी चढवीला?
तशिच निजामी बुडेल तर ती जिवा काचणी जडली
चुरील दख्खनदुनिया मोगल उभी वरंटचाखाली.
दास्य-कर्दमी पिचून गेली दख्खन तशी अभागी
तर रुजवावे स्वातंत्र्याचे बीज कोणत्या जागी ?

म्हणुनी आदिल कधी निजामहि घेउनिया शिर हाती
रोखुन धरिला मोगल मोठा मीच नर्मदाकाठी.
डुले बाहुले निजामशाही कर्त्यापुरुषाहाती
म्हणुन पाहिले राज्यासन ते येते का मम हाती.
चांदबिबीने धडा घातला बाई चतूर धीट.
आणि गिरविली मलिकानेही तिचीच वळणे नीट
बेटा त्याचा थेट काढि त्या वळणाची वेलांटी
सकळावर मी कडी कराया हिंमत धरिली मोठी.
परसत्तेच्या तुफान दरियामाजि जिवाभावाची
दिली लोटुनि नौका माझ्या स्वराज्यसंकल्पाची

फितूर फत्तेखान होउनी हुसेन झाला कैदी
निजामशाही मुलुखी झाली अनायकी बेबंदी.

आणि चालली होती जेथून राज्याची आबाद
तोहि मोगलाहाती गेला दुर्ग दौलताबाद !
शिद्दी अंबर दडपुन बसला दंडाराजापुरीस
सिद्दी साबा करी गिळंकृत तळकोकणचा देश
हाताखाली घाली सोलापुर शिद्दी रेहान
जुन्नरचाही धनी बने श्रीनिवास तो बलवान.
चार दिशांना सुटले चारहि सरदारांचे वारे
आपआपल्या प्रांतापुरते मालक बनले सारे.

जागिर देइल त्यास मिळावे ही उडि सरदारांची
सत्ता घ्यावी, राज्य करावे, –हिंमत नव्हती त्यांची
राज्यसाधना साधावी मज गमे संधि ही नामी
म्हणुन मानिली निजामशाही मनात माझे घर मी.
पेमगिरीवर फडकविले मी निशाण माझे उंच
दिली निजामी नावाखाली जिवाजिवाची पोच !
निजामशाही सलतनतेमधि चौऱ्याऐंशी किल्ले
बाद दौलताबाद जाहला ! काय तयाने झाले ?
निजामशाही पुनः उभी मी करीन माझ्या हाती.
राजधानिची जागा जुन्नर जुनी अजूनी हाती.

असे बोललो, ‘ त्यासाठी द्या सेना मज लवलाही
अदिलशहाला, मुरारपंता, खवासखानालाही !
मुरार जाळो पूर्वि पुण्याची जागिर माझी मोठी !
तरि गौरविले मी त्या भीमा–इंद्रायणिच्या काठी !
विजापुरी मतभेदाच्या रणि झाले जरि शिरकाण
पाच हजारावर घोड्यानिशि आला अंबरखान.
जुन्नर चाकण नगर त्रिंबक नाशिक संगमनेर
पुणे मारुनी दौड घेतला मुलूख मी चौफेर.

बेविसहजारि मनसबदारी बेटी दिल्लीवाली
पेमगिरीवर नाचत आली पायी पैंजणवाली

स्वतंत्र माझ्या बादशाहिच्या उभवायासि निशाणा
दिला झुगारुन तो आलेला मोंगलचा नजराणा !
बालमूर्तजा अंकी घेउन सिंहासनि मी बैसे
त्या मज कोण्या बादशहाची अंतरि खिदमत सोसे ?
परि घर फिरले ! घर फिरताक्षणि फिरला घरचा वासा!
पेमगिरीहुन टाकियलेला पडला उलटा फासा !
लाख लाख तो मोंगल घोडा मागे दौडत येई
नाही निजामशाही पाठी नाही आदिलशाही !
तोंड रणाचे उत्तरि पाडुन आलो हळुहळु खाली
माझ्यापाठी दौडुन मोंगल जमान पिंगा घाली.

अंति मूर्तजा घेउन लढलो एकलाच माहूली
किर्र रानि त्या बरसातीमधि एकच दंगल झाली !
जिथे उगवते शेवाळे खग-पृष्ठी वर्षाकाळी
तिथे नवल ना जर देसूरी जिवांस बुरसी आली !
दिवसांमागे दिवस लोटले ! महिन्यांमागे महिने
लढा तुटेना जमान बोलवि तहास केविलवाणे.
परि किल्ल्यातिल ती म्हातारी बेगम अधीर झाली !
राजी होइना ती खायाला सूळावरची पोळी !
बालमूर्तजासह बेगम ती गेली मोगलाहाती
म्हणुनि तहाने मोही माझे पुणे राखिले हाती.

राजकाज हे असे खेळलो ! ओळख आतिल गाठ !
महिने झाले सहा ! धरू दे विजापुराची वाट."
आदरुनी हे वच शिव ठेवी डोइ पित्याचे पायी.
आशीर्वादुनि त्यास शहाजी जाइ आपुल्या राज्यी.

पुत्रभेट ही अखेरची हे नव्हते ध्यानी स्वप्नी
बसवापट्टणि काय जाहले देवा दो वरसांनी ?
पुत्रप्रतापसूर्याचे जे तेज चढे मध्यान्ही
नयनि पहाया भूप शहाजी बहु दिन जगला नाही.
बेदनूरचे भद्राप्पा नि शिवाप्पा पाळेगार
गांजित होते विजापूरचा मुलूख वारंवार.

आज्ञा होता अदिलशहाची त्या संहारायास
निघे शिहाजीराजा घेउन सेना अपुली खास.
चहु अंगांनी त्यास चढविला सैन्याचा गळफास.
तलवारीने केला एकच त्या दोघांचा घास
बेदनूरचा कार्यभाग जरि सरला सगळा काही
या ठायी त्या ठायी कोठे कुठे बखेडा राही.
म्हणून वाटेवरी शहाजी तळ देउनिया राही.
शूर शिपायी ज्यावर राही उभी विजापुरशाही.
लहर लागली मृगयेची त्या रमता मोहीमेत
बेडर छाती वाघाची ती ! काळिज नव्हते तीत.

शिबिरापल्याड घनवन होते भयाण भेसुर भारी.
सेवक घेउन गिरिकांतारी दौडत सुटली स्वारी.
नदीकिनारा सोडुनी जाता का ओरडली राई ?
का कुरकुरली कानी कळले न तुंगभद्राबाई.
गडगडणारा मेघासम हय कर्कश का खिकाळी ?
आणि अमंगल खग वृक्षाच्या कोटरि घुंघुट घाली.
एकाएकी सूर्याभोवती मंडळ पडले दाट.
भेसुर भीषण धूसर छाया का पसरे गगनात ?

दुर्लक्षुनि दुःश्चिन्हे राजा दौडे वाऱ्यासरशी
आडविले वनदेवीनेही कंटकमय करपाशी.

झंझावाते वनी श्वापदे उठलि भयंकर सारी
गजेंद्रगर्जनि नरेंद्रगर्जनि दिशाहि घुमल्या चारी
रानि रंगली ऐका रसिका करुणकथा ही मोठी.
वाघ लागला होता एका सुंदर हरणापाठी.
परि राजाचा घोडा अडवा येता त्यावर जाई.
नृप धैर्याचा मेरू त्या तिळभर डगमगला नाही.
निमिषोन्मेषी शर राजाचा व्याघ्र छेदुन जाई.
बाण दुजा नयना क्षणि भेदी ! प्राण तयाचा घेई !
बावरलेली गोजिरवाणी दौडे मूर्ति मृगाची
पाठिस लागे राजस्वारी सत्तर वयवरसाची.

अश्व नृपाचा विद्युद्वेगे सुटला हरणामागे
मुरड खारिची कधि वाघाची झेप घालि तो वेगे.
दिसे तिथे मृग नसे ! असे तो जिथे दिसेना होई
क्षणात पळतो, क्षणात लपतो, ती भलती चपळाई.
शरामागुनी शर सुटले परि एकहि मृगा न ठेपे.
बोलुनचालुन हरिणदौड ती वाऱ्याची गति मापे.
भरात आली शिकार; झाला राजाही बेभान.
भडोळ्यात ह्या अडकुन पडला, कोसळले अस्मान.
एकाएकी कडकडला ध्वज तिकडे शिबिरामाजी
अन् थरथरल्या देवांच्याही मूर्ति राउळामाजी

चोरखळीचा गचका बसता उलथुन पडला स्वार.
न पेलणारी कुणाहि पडली कमरेची तलवार.
रिकिब सरकली लगाम सुटला, हातुन गळले चाप
आणि उरिशिरि अश्वाची ती बसली कणखर टाप!

ती घोड्याची टाप कशाची ? काळाची ती झेप.
गेला स्वराज्य-संकल्पक त्या जडे चिरंतन झोप
खरे भडोळे झुडुपाखाली झाकुन बसले अंग
का भूचे ते भूपति पडता हृदय फाटले सांग.
दुःखावेगे भडकुन वारा तुफान झाले भारी
धरणीवर शिर आपटुनी वनराई रडली सारी.

दृश्य पाहुनी तोल जाइ तरि उधळुनि गुलाल गगनी
निरोप देई रविराया त्या मावळत्या किरणांनी.
राजगडावर चिता भडकली ! जीजा सती निघाली.
"मासाहेबा ! थांबा" विनवित पाया शिव मिठि घाली.
हिरा हरपला तिकडे ! इकडे खाण हिऱ्यांची जाई.
शिव बोले: "या लेकूराचा विचार केला काई ?
दिधला आशीर्वच : 'राज्याचा तू संस्थापक होई.
पाहू दे तुज नयनी राजा.' का मग अशि ही घाई ?
आजवरी मी रान जिवाचे केले कोणापायी ?
स्वराज्यलक्ष्मी घरास येता कुणी बघाया नाही.

राज्याभिषेकधारा पडतिल शिरि मम त्या तू पाही.
तळमळणाऱ्या डोळ्याचे तव फिटो पारणे आई.
हेहि न रुचता पतिभक्तिने जाशिल सती अताच.
चितेत दुसऱ्या तिकडे माझी पडेल उडिही तोच.
धेनूमागे वळती वेगे वत्साचेही पाय
तिथे लेकरू माय जिथे- हा असे जगाचा न्याय.
जाऊ का मी ? जाऊ दे का लयास अपुले राज्य ?
वंशाचा क्षय होइल ! अग्निप्रवेश ठरावा त्याज्य."
करी पतीची प्रतिमापूजा दुःखी जीजाबाई.
कुंकुमकरंड हाति निरंजन तबक फुलाचे घेई.

पूजा झाली ! बाळे पाहिलि ! आणि पापणी मिटली.
शिवबासाठी काया ठेवुन सती मनाने गेली.

आणिक जेथुन दिसे दूरचा सुरम्य बालेघाट
सृष्टिसतीचा मखमालीचा सुंदर हिरवा थाट.
ते सुपवित्र स्थान कुलोचित शिखरशिंगणापूर
स्मृतिछत्राने जागवि मोठा दख्खनचा सरदार.
शतके गेली; तरि जा ऐका राजे पडल्या जागी
स्वातंत्र्याचे नाद स्फुरती अजुन त्या भूभागी.
ती सैतानी वाऱ्यानेही नाही विझली वात
वीज चमकली रायगडी ती याच दिव्याची ज्योत.

REFBK-0023591
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३५९१
(स्थळ प्रत)

रियासतींचा इतिहास राजे घडवीत असतात; आणि इतिहासकार तो जिवंत ठेवीत असतात. दोन्हीही माणसेच. इतिहास घडविणारी आणि इतिहास जगवणारी ! यात आणखी एक तिसरा प्रकार आहे...

.. इतिहास जगणारी माणसे ! कै. पु. वा. गोवईकर हे या तिसऱ्या प्रकारातले होते.

छत्रपती श्री शिवाजी महाराज हे कै. गोवईकरांचे नंदनवन होते. छत्रपतींचे चरित्र आणि इतिहास ही त्यांची निःश्वसिते होती. साताऱ्या-सारख्या आडबाजूला त्यांचे उभे आयुष्य वकिली करण्यात गेले. बुद्धी कायद्याच्या रूक्ष चौकटीत अडकलेली आणि मन मात्र तीनशे वर्षांपूर्वीच्या काळात राजांच्या बरोबर सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत संचार करीत असलेले. अशा अवस्थेत, वयाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्षी महाकाव्यासारखे पुस्तक लिहिण्याची त्यांची तडफ पाहिली की वाटते, अशा वेडाची संजीवनीच माणसाला जगवीत असते.

भारताच्या काही भागात छत्रपतींबद्दल अजूनही अनेक गैरसमज, पसरलेले आहेत. ते नाहीसे व्हावेत; राजांच्या निर्मळ चारित्र्याचा, देव–देश–धर्म यांबद्दलच्या त्यांच्या कल्पनांचा देशाबाहेर डांगोरा व्हावा, म्हणून गोवईकरांनी 'The Dawn of Independence' सारखे सुंदर पुस्तक इंग्रजीत लिहिले. स्वतःच्या खर्चाने प्रकाशित केले. भारताचे भूतपूर्व पंतप्रधान पंडित नेहरूंनी त्या पुस्तकाबद्दल प्रशंसोद्गार काढले होते.

राजांच्या चरित्रावरील कै. गोवईकरांचे हे चौथे पुस्तक. वकिली चिकित्सक बुद्धी आणि काव्यमय भाषा यांचा सुंदर समन्वय इथे झालेला आहे. ऐतिहासिक सत्याला कुठेही बाधा न आणता इतिहास रंजक करून तो जनसामान्यांपर्यंत पोचविण्याचे हे कार्य गोवईकर वर्षानुवर्षे करीत आले. मराठी रियासतीवर कोसळलेल्या जबरदस्त तीन संकटांची कथा ते या पुस्तकात सांगत आहेत.

आता अवधारि जो जी ।